# जनमाध्यम

epaper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

✦ अमरावती, मंगळवार १५ सप्टेंबर २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ १०

# 2029 पूर्वी समान नागरी कायदा

## भाजपशासित राज्यांसाठी अमित शहा यांची घोषणा

**मुंबई/प्रतिनिधी :** देशातील भाजपशासित किंवा मित्रपक्षांची सत्ता असलेल्या २१ राज्यांमध्ये २०२९ पूर्वी समान नागरी कायदा लागू केली जाईल, असे केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी रविवारी जाहीर केले. राष्ट्रीय नागरिकत्व पडताळणी (नॅशनल रजिस्टर ऑफ सिटिझन) देशभर करण्याबाबत राष्ट्रीय लोकशाही आघाडीतील घटक पक्ष तसेच विविध संघटनांशी सध्या चर्चा केली जात असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

देशात समान नागरी कायदा लागू करण्याचे आश्वासन भाजपने आपल्या जाहीरनाम्यात दिले आहे. यानुसार भाजप किंवा मित्रपक्षांची सरकारे असलेल्या सर्व २१ राज्यांमध्ये समान नागरी कायदा पुढील लोकसभा निवडणुकीपूर्वी म्हणजेच २०२९ पर्यंत लागू होईल, असे शहा यांनी पत्रकार परिषेदत सांगितले. या वेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे आदी उपस्थित होते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या २५ वर्षांच्या कारकीर्दीच्या सन्मानासाठी देशभरात १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर या काळात देशभर सेवा संकल्प अभियान राबविण्यात येणार आहे. या अभियानाची घोषणा केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी पत्रकार परिषदेत केली. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कारकीर्दीत घेतलेल्या निर्णयांचा लेखाजोखा शहा यांनी मांडला.

देशात कधीही झाले नसते असे मुस्लिम समाजातील तिहेरी तलाक रू ढीविरोधातील कायदा, कश्मीरमधील ३७० आणि ३५ (अ) कलम हटविण्याचा निर्णय तसेच नक्षलवादविरोधी कारवाई आणि ईशान्य भारतातील शांतता करार हे महत्त्वाचे निर्णय पंतप्रधान मोदी यांच्या कार्यकाळात झाले. दहशतवादाविरोधातील यापूर्वी मुळमुळीत धोरण सरकारचे होते. मोदी सरकाच्या काळात दहशतवादी कारवाया करणा-यांना जशास तसे उत्तर देण्यात आले. त्यासाठी त्यांनी ऑपरेशन सिंदूरचा दाखला दिला.

**एक-एक घुसखोर शोधून देशाबाहेर काढणार**

देशातील घुसखोरीच्या प्रश्नावर बोलताना अमित शहा यांनी देशातील अवैध घुसखोरांना हद्दपार करण्याबाबत सरकारची भूमिका ठाम आहे. देशातील एक-एक घुसखोर शोधून त्याला देशाबाहेर काढू, असा निर्धार त्यांनी व्यक्त केला. राष्ट्रीय नागरिकत्व पडताळणी (एनआरसी) मोहिमेबाबत बोलताना मात्र त्यांनी या मोहिमेची निश्चित कालमर्यादा जाहीर केली नाही. याबाबत राज्य सरकारांबरोबर समन्वयाने निर्णय घेतला जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. मणिपूरमध्ये जनगणना पुढे ढकलून राष्ट्रीय नागरिकत्व पडताळणी मोहिम राबवावी, अशी स्थानिक पातळीवर मागणी असल्याचेही त्यांनी निदर्शनास आणले.

**भ्रष्टाचार, जातीवाद, परिवारवादाचे उच्चाटन**

२०१४ पूर्वी देशाचे राजकारण भ्रष्टाचार, जातिवाद आणि परिवारवाद या तीन बाबींनी ग्रासले होते. २०१४ नंतर देशात विकासाभिमुख राजकारण सुरू झाले. या तीन बाबींचे उच्चाटन झाल्याने गेल्या १२ वर्षांत देशाने अर्थव्यवस्था, परराष्ट्र धोरण, राष्ट्रीय सुरक्षा, पायाभूत सुविधा आणि गरिबी कल्याणाच्या क्षेत्रात मोठी प्रगती केल्याचे सांगताना देशातील २५ कोटी नागरिक गरिबीतून बाहेर आल्याचा दावा त्यांनी केला.

**सेवा संकल्प अभियानात १२ प्रमुख उपक्रम-** जनसेवा हीच प्रभुसेवा हा सेवा संकल्प अभियानाचा मंत्र आहे. जनभागीदारीतून २०४७पर्यंत विकसित भारताची निर्मिती करण्याचे उद्दिष्ट समोर ठेवण्यात आल्याचे सांगताना ➪(पान २ वर)



## संपूर्ण देशभरात आजपासून गणेशोत्सवाला सुरूवात

**मुंबई/प्रतिनिधी :** संपूर्ण देशभरात आजपासून गणेशोत्सवाला सुरूवात झाली आहे. मुंबई, ठाणे, पुणे, कोकण, मराठवाडा, विदर्भासह राज्यातील इतर सर्वच भागात बाप्पाचं आगमन झालेलं आहे. लाडक्या गणरायाचं ढोल ताशांच्या गजरात, फटाक्यांच्या आतषबाजीत आणि बाप्पा मोरया जयघोषात घरोघरी गणपती बाप्पाचं आगमन झालं आहे. राज्यभरात लाडक्या गणपती बाप्पाचं उत्साहात स्वागत करण्यात आलं. मुंबईमधील बाप्पाच्या स्वागतासाठी भाविकांची लगबग पाहायला मिळत आहे. लालबागच्या राजाच्या दर्शनाला भाविकांनी सकाळपासून गर्दी केल्याचं दिसून येत आहे. दुसरीकडे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह हे सध्या मुंबई दौ-यावर असून आज ते लालबागच्या राजाचं दर्शन घेणार आहेत. उद्धव ठाकरे हे देखील आजच लालबागच्या राजाचं दर्शन घेणार आहेत.

## गृहमंत्री अमित शहा यांनी मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानी घेतले गणपती बाप्पांचे दर्शन

**मुंबई/प्रतिनिधी :** केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी मुंबईतील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अधिकृत निवासस्थान वर्षा येथे बाप्पाचे दर्शन घेतले. अमित शहा आज मुंबईत असून, त्यांनी आपल्या कुटुंबासह मुख्यमंत्री फडणवीस यांच्या गणपतीचे दर्शन घेतले. वर्षा निवासस्थानी दाखल झाल्यानंतर अमृता फडणवीस यांनी अमित शहा यांचे औक्षण करून पारंपरिक पद्धतीने त्यांचे स्वागत केले. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, त्यांच्या पत्नी अमृता फडणवीस आणि दिविजा यांनी शाह कुटुंबाचे आतिथ्याने स्वागत केले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे देखील या विशेष प्रसंगी उपस्थित होते. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि त्यांच्या पत्नीने मनोभावे बाप्पाचे दर्शन घेतले. हा दौरा राजकीय महत्त्वाचा असला तरी, तो गणेशोत्सवाच्या पारंपरिक उत्साहात पार पडला.

## गोव्यात UCC लागू करून दाखवा-औवेसी

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी २०२९ पूर्वी भाजपच्या नेतृत्वाखालील NDA या सर्व २१ राज्यांमध्ये समान नागरी कायदा (UCC) लागू करण्याची घोषणा केल्यानंतर राजकीय वातावरण तापले आहे. AIMIMचे प्रमुख असदुद्दीन औवेसी यांनी शाह यांच्या घोषणेवर प्रश्न उपस्थित करत भाजप, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि अमित शाह यांच्यावर गैर-हिंदूंवर हिंदू कायदा लादण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप केला आहे. UCCचा वापर केवळ मुस्लिमांना लक्ष्य करण्यासाठी केला जात असल्याचा दावाही औवेसी यांनी केला. औवेसी यांनी गोव्यात होणा-या विधानसभा निवडणुकीचा संदर्भ देत अमित शाह, भाजप आणि RSSला UCC लागू करण्याचे आव्हान दिले. औवेसी म्हणाले, गोव्यात विधानसभा निवडणुका होणार आहेत. मी अमित शाह, भाजप आणि RSSला आव्हान देतो. पुढे या आणि गोव्यात UCC लागू करून दाखवा. तसेच, गोव्यात उभे राहून उत्तराखंड, गुजरात आणि आसाममध्ये लागू करण्यात आलेल्या कायद्याप्रमाणेच UCC गोव्यातही लागू करणार असल्याची घोषणा करा, असे आव्हान त्यांनी दिले. तुम्ही खरोखरच गोव्यात ➪(पान २ वर)

## पंतप्रधान मोदी यांच्यामुळे मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा -अमित शहा

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र हे देशातील बहुभाषिक राज्य आहे. येथे अनेक भाषा नांदत आहेत. मात्र, काही लोक दुसरी भाषा शिकण्यास नकार देत आहेत असे वक्तव्य गृहमंत्री अमित शाह यांनी एका कार्यक्रमात केले आहे. पंतप्रधान मोदी यांच्यामुळे मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याचेही ते म्हणाले. त्यावर मनसेने संताप व्यक्त केला आहे. महाराष्ट्रात येउन अमित शाह यांनी मराठीचा अपमान करु नये, महाराष्ट्र हे मराठी भाषिक राज्य आहे. हवे तर अमित शाह यांनी संयुक्त महाराष्ट्र लढ्याचा इतिहासाचे पुस्तक आम्ही अमित शाह यांना पाठवू असा इशारा मनसेचे प्रवक्ते गजानन काळे यांनी दिला आहे. महाराष्ट्र हे मराठी भाषिक राज्य आहे याचा विसर अमित शाह यांना पडला आहे. महाराष्ट्र हे बहुभाषिक राज्य आहे असं ते म्हणत आहेत. महाराष्ट्र आणि मराठी माणसांचा अपमान करणारे विधान अमित शाह यांनी हिंदी भाषा संमेलनात येउन करु नये असा इशारा मनसेचे प्रवक्ते गजानन काळे यांनी दिला आहे. ते पुढे म्हणाले की एका बाजूला ते म्हणतात गुजरातमध्ये गुजराती बोलली जाते हिंदी येत नाही आणि दुस-या बाजूला ➪(पान २ वर)

## दिशा सालियन प्रकरणात अखेर मुंबई पोलिसांकडून गुन्हा दाखल

**मुंबई/प्रतिनिधी :** बॉलिवूड अभिनेता सुशांत सिंह राजपूतची माजी मॅनेजर दिशा सालियन हिच्या मृत्यूबाबत मोठी बातमी समोर आली आहे. दिशा सालियन प्रकरणात अखेर मुंबई पोलिसांकडून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अत्याचार आणि हत्येचा ठपका ठेवत मुंबई पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. सीबीआयने सतिश सालियान यांच्या जबाबावर हा एफआयआर नोंदवल्याची माहिती आहे.दरम्यान, दिशावर अत्याचार करून हत्या केल्याप्रकरणी तब्बल सहा वर्षांनी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मनोरंजनविश्वापासून अगदी राजकीय वर्तुळात खळबळ माजवणारे दिवंगत सेलिब्रिटी मॅनेजर दिशा सालियन मृत्यू प्रकरणावर मुंबई उच्च न्यायालयानं नुकताच निकाल देत या प्रकरणी सीबीआय अधिकारी नियुक्तीचे आदेश दिले होते. तसेच, या प्रकरणी इठर अंतर्गत गुन्हा दाखल करण्याचे आदेशही मुंबई उच्च न्यायालयानं यावेळी दिले. ८ जून २०२० रोजी मुंबईतील मालाड येथील ➪(पान २ वर)

## मोर्चा स्थगित, एकटेच मुंबईला जाणार

**जालना / प्रतिनिधी-** मनोज जरांगे पाटील यांनी आज आंतरवाली सराटीमध्ये पत्रकार परिषद घेत मोठी घोषणा केली. मुंबईला जाण्यासाठी मराठा समाजाची जी तयारी सुरू आहे ती थांबण्यास त्यांनी सांगितले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सणावाराच्या आडून डाव टाकला आहे. मराठ्यांच्या पोरांवर दंगलीचे गुन्हे दाखल करण्याचा डाव आहे, असे ते म्हणाले. आपल्याला मुंबईत आंदोलनासाठी परवानगी नाकारली आहे. मात्र, मी उद्या एक-दोन गाड्या घेउन मुंबईला निघणार आहे. मी एकटाच आंदोलन करेल, मग तरी परवानगी देतील ना, असे जरांगे पाटील म्हणाले.पुढे बोलताना ➪(पान २ वर)

## मुंबई पोलिसांनी दुस-यांदा परवानगी नाकारली

**मुंबई/प्रतिनिधी :** मराठा आरक्षणासह इतर मागण्यांसाठी मनोज जरांगे पाटील यांनी मुंबईतील आझाद मैदानात उपोषण करण्याचे जाहीर केले. त्यासाठी त्यांनी मुंबई पोलिसांकडे आंदोलनास परवानगी देण्यासंदर्भात अर्ज केला. पहिला अर्ज नाकारण्यात आल्यानंतर जरांगेंनी दुसरा अर्ज केला होता, पण दुस-यांदा आंदोलन करण्यास परवानगी नाकारण्यात आली आहे. त्यामुळे जरांगेंना धक्का मानला जात आहे. आता मनोज जरांगे काय भूमिका घेतात, याकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे. अंतरवाली सराटी येथे उपोषण करत असलेल्या मनोज जरांगे यांनी मुंबईतील आझाद मैदानात उपोषणाला बसण्याची घोषणा केली. त्यांनी मराठा समाजालाही मुंबईत येण्याचे आवाहन केले. पण, मुंबई पोलिसांनी त्यांना आंदोलन करण्यास परवानगी नाकारली आहे. त्यामुळे जरांगेंच्या मुंबईतील आंदोलनाबद्दल नवे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. दरम्यान, मुंबई पोलिसांनी मनोज जरांगे यांना गणेशोत्सवानंतर आंदोलन करण्याचा तसेच आझाद मैदान सोडून इतरत्र उपोषण करण्याचा पर्याय सूचवला असल्याची माहिती आहे. याबद्दल मात्र पोलिसांकडून कोणताही दुजोरा मिळू शकलेला नाही.

**आंदोलनाच्या परवानगीचा दुसरा अर्जही नाकारला-** १९ सप्टेंबरपासून मुंबईतील आझाद मैदानात आंदोलन करण्याच्या परवानगीसाठी मनोज जरांगे यांनी अर्ज केला होता. पोलिसांनी १२ सप्टेंबर रोजी अर्ज फेटाळला. त्यानंतर मनोज जरांगे यांनी १३ सप्टेंबर रोजी दुसरा अर्ज मुंबई पोलिसांकडे केला होता. मुंबई पोलिसांनी बेमुदत उपोषणाच्या परवानगीसाठीचा दुसरा अर्जही फेटाळून लावला आहे. गेल्या वर्षी म्हणजे २०२५ मध्ये मुंबईत झालेल्या आंदोलनावेळी जवळपास ५००० वाहने ➪(पान २ वर)

## पत्रकार तरूण तेजपाल यांचे गोवा न्यायालयात आत्मसमर्पण

**पणजी/प्रतिनिधी :** तहलकाचे माजी संपादक-इन-चीफ तरुण तेजपाल यांनी २०१३ च्या बलात्कार प्रकरणात सोमवारी गोव्यातील म्हापसा न्यायालयात आत्मसमर्पण केले. बाम्बे उच्च न्यायालयाने दोषी ठरवल्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने त्यांना तीन आठवड्यांत आत्मसमर्पण करण्याचे आदेश दिले होते.आत्मसमर्पणानंतर तेजपाल यांना उत्तर गोव्यातील कोलवाळ मध्यवर्ती कारागृहात पाठवण्यात आले, जिथे ते १० वर्षांची सक्तमजुरीची शिक्षा भोगतील. सर्वोच्च न्यायालयात त्यांच्या दोषसिद्धी आणि शिक्षेविरुद्धच्या अपीलावर २२ सप्टेंबर रोजी सुनावणी होणार आहे. २५ ऑगस्ट रोजी सर्वोच्च न्यायालयाने तेजपाल यांची आत्मसमर्पणातून सूट देण्याची याचिका फेटाळून लावली होती. न्यायमूर्ती आलोक अराधे यांच्या खंडपीठाने त्यांना ➪(पान २ वर)

## विनयभंगाच्या गुन्ह्यानंतर संजय गायकवाड आक्रमक; फडणवीसांवर थेट गंभीर आरोप

**बुलडाणा/प्रतिनिधी :** बुलडाण्यातील राजकारणात महायुतीतील अंतर्गत संघर्ष पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेचे आमदार संजय गायकवाड यांच्यावर दाखल झालेल्या विनयभंगाच्या गुन्ह्यावरून आता राजकीय वातावरण तापले आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते आमदार अंबादास दानवे यांनी गायकवाड यांच्या अटकेची मागणी केली होती. या पार्श्वभूमीवर संजय गायकवाड यांनी प्रथमच या प्रकरणावर प्रतिक्रिया देत थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. आपल्यावर दाखल करण्यात आलेला विनयभंगाचा गुन्हा पूर्णपणे खोटा असल्याचा दावा आमदार संजय गायकवाड यांनी केला आहे. हा गुन्हा रद्द करण्यासाठी आपण उच्च न्यायालयात दाद मागणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. गायकवाड यांनी बुलढाणा जिल्ह्यातील पोलीस प्रशासनावरही गंभीर आरोप केले. बुलढाणा जिल्ह्यातील पोलिस मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दबावाखाली काम करत असल्याचा आरोप त्यांनी केला. त्यामुळे या प्रकरणाला आता राजकीय संघर्षाची किनार मिळाली आहे.

बुलडाणा जिल्ह्यात अवैध धंदे सुरू असल्याचा आरोप करत आमदार गायकवाड यांनी पोलिसांच्या कारभारावर प्रश्न उपस्थित केला. जिल्ह्यात दरोडे आणि चोरीच्या घटना वाढल्याचा दावा त्यांनी केला. या मुद्द्यांविरोधात शिवसेना उद्यापासून रस्त्यावर उतरून आंदोलन करणार असल्याचा इशाराही त्यांनी दिला.दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या खासगी स्वीय सहाय्यकाच्या वाढदिवसाच्या आयोजनावरूनही गायकवाड यांनी प्रश्न उपस्थित ➪(पान २ वर)

## हुथी बंडखोरांचा आणखी 2 बेटांवर कब्जा

**सना :** येमनमधील हुथी बंडखोरांनी दक्षिण लाल समुद्रातील आणखी दोन महत्त्वाच्या बेटांवर कब्जा केला आहे. येमन सरकारच्या म्हणण्यानुसार, हुथींनी ग्रेटर हनीश आणि लेसर हनीश बेटांवर आपले सैनिक तैनात केले आहेत. ही बेटे बाब-अल मंदेब सामुद्रधुनीपासून सुमारे १६० किमी उत्तरेला आहेत.यापूर्वी, गेल्या आठवड्यात हुथींनी लाल समुद्राच्या किना-यावरील मोखा बंदर शहर आणि बाब-अल मंदेबमधील मायून बेटावरही कब्जा केला होता. या दोन्ही ठिकाणी सौदी अरेबियाच्या पाठिंब्याने असलेल्या यमनच्या ➪(पान २ वर)

## ‘आम्ही १७ खासदार भाजपामध्ये जाणार आहोत’

### एनसीपीआयचे खासदार भाजपामध्ये प्रवेश करणार; बंडखोर खासदाराचा दाव्याने खळबळ

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** तृणमूल कॉंग्रेसमधून बाहेर पडून एनसीपीआयमध्ये प्रवेश केलेल्या २० बंडखोर खासदारांपैकी १७ खासदार दुर्गापूजेच्या आधी किंवा नंतर भाजपामध्ये प्रवेश करतील, असा दावा बंडखोर नेते आणि कूचबिहारचे खासदार जगदीश चंद्र वर्मा बसुनिया यांनी सोमवारी केला. त्यांच्या दाव्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. बसुनिया हे या १७ खासदारांपैकी एक आहेत. जून महिन्यात या खासदारांनी नॅशनलिस्ट सिटीझन्स पार्टी ऑफ इंडियामध्ये प्रवेश केला होता. मात्र, त्यांच्या या दावा इतर बंडखोर खासदारांनी लगेचच फेटाळून लावला असून, असा कोणताही सामूहिक निर्णय झालेला नाही, असे काही खासदारांनी म्हटले.

**भाजपाने स्वतःला केले दूर-** दुसरीकडे, भाजपानेही या दाव्यापासून स्वतःला दूर केले आहे. पश्चिम बंगालचे भाजपाचे प्रदेशाध्यक्ष समिक भट्टाचार्य यांनी स्पष्ट केले की, कोणाला फक्तप्रवेश करायचा आहे म्हणूनच पक्ष कोणालाही पक्षात घेणार नाही. चालू वर्षातील मे महिन्यात झालेल्या विधानसभा निवडणुकीत तृणमूल कॉंग्रेसच्या पराभवानंतर, या २० खासदारांचा गट NCPI मध्ये विलीन झाला आणि भाजपाप्रणीत NDA ला पाठिंबा जाहीर केला होता. सध्या या खासदारांवर अपात्रतेची कारवाई प्रलंबित असून, त्या वादाच्या पार्श्वभूमीवर हे वक्तव्य आले आहे. विधानसभा निवडणुकीत तृणमूल कॉंग्रेसचा पराभव झाला आणि ममता बॅनर्जीविरुद्ध बंडखोरी करून NCPI मध्ये सामील झालेल्या बसुनिया यांनी पत्रकारांना सांगितले की, १७ खासदारांनी एकत्र भाजपामध्ये जाण्याचा निर्णय घेतला आहे. ही संख्या पक्षांतर बंदी कायद्याच्या कारवाईतून सुरक्षित राहण्यासाठी पुरेशी आहे.

**‘आम्ही आधीच भाजपामध्ये जाणार होतो’-** ‘आम्ही १७ खासदार एकत्र भाजपामध्ये जात आहोत. २० सदस्यांपैकी दोन तृतीयांशपेक्षा जास्त सदस्य पक्ष बदलत असल्याने, आमच्याविरोधात ➪(पान २ वर)

जनमाध्यम
paper www.janmadhyam.com
एक प्रतिष्ठित सवय

# गणेशोत्सवात मुंबईकडे जाणा-या अवजड वाहनांना ब्रेक,

## ठाणे, नवी मुंबई परिसरात प्रवेशबंदी; पुणे-मुंबई वाहतुकीवर परिणाम

**पुणे/प्रतिनिधी :**गणेशोत्सवातील गणेशमूर्तींचे आगमन आणि विसर्जन मिरवणुकांमुळे ठाणे आणि नवी मुंबई परिसरात होणारी वाहतूक कोंडी टाळण्यासाठी जड-अवजड मालवाहू वाहनांना विशिष्ट दिवस आणि वेळेत प्रवेशबंदी करण्यात आली आहे. त्यामुळे पुण्याहून मुंबई, नवी मुंबई आणि ठाण्याकडे जाणा-या ट्रान्सपोर्टर्सनी या वेळा लक्षात घेउन प्रवासाचे नियोजन करण्याचे आवाहन महामार्ग सुरक्षा पथकाच्या पुणे परिक्षेत्राने केले आहे.अपर पोलिस महासंचालक (वाहतूक), महाराष्ट्र राज्य यांच्या सूचनेनुसार या प्रवेशबंदीची महामार्ग सुरक्षा पथकाकडून काटेकोर अंमलबजावणी केली जाणार आहे. त्याचा परिणाम मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग तसेच पुणे-मुंबई राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४८ वरून मुंबईच्या दिशेने जाणा-या जड-अवजड वाहनांच्या वाहतुकीवर होणार आहे.

**चार दिवशी मध्यरात्रीपासून बंदी**

गणेश विसर्जनाच्या पार्श्वभूमीवर १५, १८, १९ आणि २० सप्टेंबरला रात्री १२:०१ पासून संबंधित विसर्जन मिरवणूक संपेपर्यंत जड-अवजड मालवाहू वाहनांना प्रवेशबंदी असेल. त्यामुळे या दिवशी ठाणे, नवी मुंबई आणि मुंबईच्या दिशेने जाणा-या वाहनचालकांनी वेळेचे नियोजन करणे आवश्यक आहे.

**अनंत चतुर्दशीला दीर्घकाळ निर्बंध**

अनंत चतुर्दशीच्या मुख्य विसर्जनासाठी २५ सप्टेंबरला रात्री १२:०१ पासून २६ सप्टेंबरला दुपारी १२ वाजेपर्यंत प्रवेशबंदी लागू राहणार आहे. या कालावधीत मोठ्या प्रमाणात विसर्जन मिरवणुका निघणार असल्याने जड वाहनचालकांनी महामार्गावर वाहने आणू नयेत, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

**महामार्गावर वाहने उभी करू नका**

द्रुतगती मार्ग आणि राष्ट्रीय महामार्गावर जड वाहने थांबवून ठेवण्यासाठी पुरेशी जागा उपलब्ध नाही. त्यामुळे प्रवेशबंदी सुरू झाल्यानंतर महामार्गावर वाहनांच्या रांगा लागू नयेत, यासाठी ट्रान्सपोर्ट असोसिएशन आणि मालवाहतूकदारांनी आपली वाहने आधीच ट्रक टर्मिनल, लाजिस्टिक पार्क अथवा सुरक्षित खासगी पार्किंगमध्ये थांबवावीत. अधिसूचनेचा भंग करून वाहतुकीला अडथळा निर्माण करणा-या वाहनांवर कायदेशीर कारवाई केली जाणार आहे.

**कधी असेल प्रवेशबंदी?**

१५ सप्टेंबर - रात्री १२:०१ ते मिरवणूक संपेपर्यंत
१८ सप्टेंबर - रात्री १२:०१ ते मिरवणूक संपेपर्यंत
१९ सप्टेंबर - रात्री १२:०१ ते मिरवणूक संपेपर्यंत
२० सप्टेंबर - रात्री १२:०१ ते मिरवणूक संपेपर्यंत
२५ सप्टेंबर - रात्री १२:०१ ते २६ सप्टेंबर दुपारी १२ पर्यंत

# नागपूर कराराला पुन्हा हरताळ;

# विधिमंडळ हिवाळी अधिवेशन दोनच आठवड्यांचे!

**नागपूर/प्रतिनिधी :**राज्याच एक अधिवेशन नागपुरात घेण्याबाबतचा करारच महाराष्ट्राच्या निर्मितीच्या वेळी करण्यात आला होता. त्यानुसार हे अधिवेशन सहा आठवड्याचे असायला हवे. परंतु गेल्या दीड, दोन दशकात अधिवेशन सहा आठवडे तर सोडा चारही आठवडे चालत नसल्याचे चित्र आहे. यंदाच्या नागपुरात होणा-या हिवाळी अधिवेशनाची तारीख निश्चित झाली आहे. संसदीय कार्य विभागाने कामकाजाची तात्पुरती दिनदर्शिका निश्चित केली आहे. यानुसार कामकाज फक्त दोनच आठवडे चालणार आहे. त्यामुळे यावर्षीही कराराच भंगच होणार असल्याचे दिसते.

**दोन आठवड्याचे कामकाज**

संसदीय कार्य विभागाकडून दोन आठवड्यांच्या कामकाजाची तात्पुरती दिनदर्शिकाही निश्चित केली आहे. यानुसार पहिल्या दिवशी म्हणजे ७ डिसेंबरला अध्यादेश पटलावर ठेवण्यात येणार असून पुरवणी मागण्याही सादर करण्यात येतील. तर शेवटच्या दिवशी म्हणजे १८ डिसेंबरला शासकीय व अशासकीय कामकाज होईल. या दोन आठवड्यांच्या कामकाजात विदर्भातील किती प्रश्नांना न्याय मिळेल, हे अधिवेशन संपल्यावरच दिसून येईल.

**अधिवेशनाचे कामकाज वाढवण्याची विरोधकांकडून होते मागणी**

सत्ताधारी पक्षाकडून दोन किंवा तीन आठवड्यांचे कामकाज निश्चित करण्यात येते. तर विरोधकांकडून नागपूर कराराचा दाखला देत अधिकावेशनाचे कामकाज वाढवण्याची मागणी होत असते. विशेष म्हणजे अधिवेशन वाढवण्याची मागणी विरोधकांकडूनच होते. विरोधक सत्तेत आल्यावर त्यांच्याकडून पुन्हा तोच प्रकार होत असल्याचे आतापर्यंतचे तरी चित्र आहे. अधिवेशनाच्या तयारीत बांधकाम विभाग

विधानभवनाच्या नव्या इमारतीमुळे हिवाळी अधिवेशनाचे सत्र नागपुरात होणार की नाही, याबाबत शंका उपस्थित करण्यात येत होती. परंतु यंदाचे हिवाळी अधिवेशन नागपुरात होणार आहे. ७ डिसेंबरपासून कामकाज सुरू होईल. या अधिवेशनाच्या तयारीला सार्वजनिक बांधकाम विभाग लागला असून खर्चाचा आराखडाही तयार करण्यात आला आहे.बांधकाम विभागातील अधिका-यांकडून मिळालेल्या माहितीनुसार ८६ कोटींच्या खर्चाचा आराखडा तयार करण्यात आला आहे. यात विधानभवन, रविभवन, नागभवन, रामगिरी, देवगिरी, विजयगड, आमदार निवास, १६० गाळे आदी ठिकाणच्या देखभाल दुरुस्तीसह विविध कामांवर हा खर्च करण्यात येणार आहे. विधानभवन येथे नवीन इमारत तयार करण्यात येत या कामासाठी हिवाळी अधिवेशनाचे सत्र यंदा येथे होणार नसल्याची सुरू वातीला चर्चा होती. परंतु ७ डिसेंबरपासून अधिवेशनाचे काम सुरू होणार आहे.

**मागील अधिवेशनातील कामाच्या चौकशीचे काय?**

मागील अधिवेशनात कोटेशनच्या आधारे मोठ्या प्रमाणात कामे करण्यात आली. परंतु प्रत्यक्षात काम करण्यात आले नाही. तर काही प्रकरणात निविदा टाळण्यासाठी कामांचे तुकडे करण्यात आले. आमदार विकास ठाकरे यांच्या तक्रारीवरून सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी चौकशीचे आदेश दिले होते. परंतु अद्याप या प्रकरणाची चौकशीच करण्यात आली नसल्याचे समजते.

पान १ व १० वरून

## 2029 पूर्वी समान नागरी

त्यांनी या अभियानातील १२ प्रमुख उपक्रमांची माहिती दिली. यामध्ये सेवा दिवस : रक्तदान, वृक्षारोपण आदी कार्यक्रम, माझ्या स्वप्नातील भारत या विषयावर चित्रकला, वक्तृत्व स्पर्धा, नमो सेवेच्या सुरेल गोष्टी याअंतर्गत मोदी सरकारच्या विविध योजनांसंदर्भात नाट्यप्रयोग तसेच अन्य कार्यक्रम, अंगण मिलन सेवा अंतर्गत अंगणवाडी, ग्रामपंचायत आणि स्थानिक पातळीवरील सेवा उपक्रमांशी संबंधित कार्यक्रम, सेवा संवाद : समाजातील विविध घटकांशी संवाद साधून गेल्या २५ वर्षांत झालेल्या परिवर्तनाचे अनुभव जनतेपर्यंत पोहोचविण्यात येणार आहे. वडनगर ते वाराणसी सेवा ज्योती पथयात्रा याअंतर्गत विकसित भारतासाठी प्रत्येक नागरिकाने संकल्प घेउन गुजरातमधील वडनगर आणि उत्तर प्रदेशातील वाराणसीपर्यंत सात राज्यांतून मोटारसायकल यात्रा, सेवा मेरा योगदान अंतर्गत जनभागीदारीतून २५ विविध सेवा उपक्रम राबवून सरकारच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ सामान्य नागरिकांपर्यंत पोहोचविण्यावरही या अभियानात भर आहे. सेवा रंग या उपक्रमातून मोठ्या प्रमाणावर नागरिकांचा सहभाग नोंदविण्याचे नियोजन आहे. त्याचबरोबर सेवा भारत इनोव्हेशन अंतर्गत पाच क्षेत्रांमध्ये नवकल्पनांची स्पर्धा आयोजित केली जाणार आहे. सुशासन सेवा संकल्प या उपक्रमातून पंचायत सदस्यांपासून नगरसेवक आणि अन्य लोकप्रतिनिधींचा सहभाग घेतला जाणार आहे. देशाच्या चार भागांत विशेष महाकुंभांचे आयोजनही करण्यात येणार असल्याची माहिती अमित शहा यांनी दिली.

## पंतप्रधान मोदी यांच्यामुळे मराठी

महाराष्ट्रात येउन त्यांनी शहाणपणा सांगायचा? इथे हिंदी शिका? ज्याला कोणाला हिंदी भाषेत व्यवहार करायचा आहे तो नक्की हिंदी शिकेल. हिंदी भाषा संमेलनाच्या आडून मराठी भाषेवरती आक्रमण करून महाराष्ट्र आणि मराठीचा अपमान करणं हे महाराष्ट्र खपवून घेणार नाही. तामिळनाडूमध्ये आंध्र प्रदेशात किंवा दक्षिणेतल्या राज्यांमध्ये अशी भाषा अमित शाह करू शकणार आहेत का? असा सवाल देखील गजानन काळे यांनी दिला आहे. अण्णा मलाई यांनी मध्यंतरी उदाहरण दिलं होतं की, हिंदी लादल्यामुळे भाजपला तामिळनाडूमध्ये एका खासदाराच्यावर यश मिळालं नव्हतं. संयुक्त महाराष्ट्र लढ्याचा इतिहासाचे पुस्तक महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने आम्ही त्यांना पाठवू म्हणजे महाराष्ट्र हे मराठी भाषिक राज्य आहे याचा विसर त्यांना पडणार नाही असेही गजानन काळे यांनी म्हटले आहे.

## गोव्यात UCC लागू करून

UCC लागू करणार आहात का? करून दाखवा, पण तुम्ही तसे करणार नाही, असा दावा औवेसी यांनी केला.

UCC समानतेसाठी आणला जात नाही- औवेसी यांनी भाजपच्या UCCच्या भूमिकेवर टीका करताना म्हटले की, भाजप समानतेच्या उद्देशाने समान नागरी कायदा आणत नाही. त्यांच्या मते, भाजपने आपल्या राज्यांमध्ये आणि सरकारी पातळीवर छक्क लागू करण्यामागे देशातील सुमारे १८ कोटी मुस्लिमांना लक्ष्य करण्याचा उद्देश आहे. UCCच्या माध्यमातून संविधानातील अनुच्छेद २५ (धार्मिक स्वातंत्र्य), अनुच्छेद १४ (समानतेचा अधिकार), अनुच्छेद २६ आणि अनुच्छेद २९ यांचे उल्लंघन होत असल्याचा आरोपही औवेसी यांनी केला.

**अमित शाहांची UCCबाबत मोठी घोषणा-** दरम्यान, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी रविवार, १३ सप्टेंबर रोजी भाजपच्या नेतृत्वाखालील NDA च्या सर्व २१ राज्यांमध्ये २०२९ पूर्वी समान नागरी कायदा लागू करण्याची घोषणा केली होती. UCC टप्प्याटप्प्याने लागू करण्यासाठी आवश्यक प्रयत्न केले जातील, असे शाह यांनी सांगितले. काही राज्यांमध्ये UCC आधीच लागू करण्यात आला असून, आता भाजप आणि NDA सत्ता असलेल्या सर्व राज्यांमध्ये तो लागू करण्याच्या दिशेने काम केले जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. २०२९ पूर्वी ही प्रक्रिया पूर्ण होईल, असा पूर्ण विश्वास असल्याचे अमित शाह यांनी म्हटले आहे.

## मुंबई पोलिसांनी दुस-यांदा

रस्त्यांवर उभी करण्यात आली होती. त्यामुळे वाहतूक विस्कळीत होण्याबरोबरच कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला होता, असे एक कारण मुंबई पोलिसांनी दिले आहे.

**गणेशोत्सवाची गर्दी** -१४ सप्टेंबरपासून गणेशोत्सवाला सुरु वात झाली असून, मुंबईत या काळात भाविकांची गर्दी जास्त असते. गणेश भक्तांची गर्दी आणि आंदोलकांची गर्दी यामुळे सुरक्षेचा प्रश्न निर्माण होउ शकतो, त्यामुळे परवानगी नाकारण्यात आली आहे. आंदोलन मोठ्या संख्येने मुंबईत आल्यास दक्षिण मुंबईतील महत्त्वाची रुग्णालये, न्यायालये आणि इतर कार्यालयांच्या कामकाजावर परिणाण होण्याची शक्यता असल्याचेही पोलिसांनी म्हटले आहे.

**मनोज जरांगे म्हणाले, एकटा उपोषणाला बसणार-**मुंबई पोलिसांनी दुस-या अर्जावर निर्णय देण्यापूर्वी मनोज जरांगे पाटील म्हणाले होते की, पोलिसांनी परवानगी नाकारली, तर मी एकटा जाणार आणि आझाद मैदानावर उपोषणाला बसणार, अशी भूमिका त्यांनी घेतली आहे. मनोज जरांगे १५ सप्टेंबर रोजी अंतरवाली सराटीतून निघणार आहेत आणि १९ सप्टेंबर रोजी मुंबईत पोहोचणार आहेत. त्यामुळे पुढील काही दिवस आंदोलनासाठी महत्त्वाचे असणार आहेत.

## मोर्चा स्थगित,एकटेच मुंबईला

ते म्हणाले, उद्या १५ सप्टेंबरला सकाळी ११ वाजता मी मुंबईला निघणार आहे. जीव द्यायची वेळ आली तरी मुंबईला जाणारच, दिलेला शब्द परत घेतला जाणार नाही. जीव देईल पण समाजाच्या प्रतिष्ठेला धक्का लागू देणार नाही, मी दोन गाड्या घेउन निघणार आहे.

मुंबईला जाताना माझ्यासोबत केवळ दोन गाड्या असणार आहे. आणि पाच-दहा माणसांपेक्षा माझ्यासोबत कोणी नसेल. १५ तारखेला एकटा जाणार, मराठ्यांच्या वाटेतील काटे मला काढू द्या, मला खिंड लढू द्या, मग मी तुम्हाला कोणत्या दिवशी यायचं ते सांगतो., असे देखील ते म्हणाले.याआधी जाहीर केलेल्या मार्गानेच मुंबईला जाणार, जेथे मुक्काम आहे तेथे मी मुक्काम करणार, समाजातील लोकांना, तालुक्यातील लोकांना तेथे भेटायला येता येणार आहे. जे स्टेज मुक्कामाच्या ठिकाणी तयार केले होते. तेथेच मी थांबणार आणि उपोषण सुरूच ठेवणार असल्याचेही त्यांनी जाहीर केले.

मी मराठ्यांनी येउ नका, असें म्हणतोय. वर्गण्या काढल्यात, गाड्या तयार ठेवल्यात, पण सांगतो की वर्गणी आणि गाड्यांना हात लावू नका, जशाच्या तशा ठेवा. .. गाड्य, पैसे योग्य कामास येणार आहेत. आता तुम्हाला तयारीला आणखी वेळ मिळाला आहे. ज्यानी दोन गाड्या तयार ठेवल्या असतील त्यांनी तीन गाड्य तयार ठेवा. , असे आवाहन त्यांनी केले.

**तारीख दोन दिवस आधी सांगणार-**मनोज जरांगे म्हणाले, मराठ्यांनी तयार राहायचे आहे. मी एकटा जात असल्याने मला आडवून दाखवा. मराठ्यांना गाड्या तयार ठेवायच्या आहेत. महिलांनी तयार राहायचे आहे. मी दोन दिवस आधी मुंबईला कधी यायचे ते सांगणार आहे. मराठ्यांनी गावात, तालुक्यात, शहरात आंदोलन करायचे आहे.

## दिशा सालियन प्रकरणात

एका इमारतीच्या १४ व्या मजल्यावरून पडून दिशाचा मृत्यू झाला होता. दिशाच्या मृत्यूनंतर अवघ्या सहा दिवसांनी, म्हणजेच १४ जून २०२० रोजी सुशांत सिंह राजपूतचाही मृत्यू झालेला. दरम्यान, दिशाचे वडील सतीश सालियन यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल करून आपल्या मुलीच्या मृत्यूची नव्यानं चौकशी करण्याची आणि सीबीआयद्वारे तपास करण्याची मागणी केली होती. अशातच या प्रकरणी अखेर सहा वर्षांनी गुन्हा दाखल झाला आहे.

दिशा सालियनच्या गूढ मृत्यूचे प्रकरण अतिशय गाजलेले आणि वादग्रस्त आहे. २०२२ मध्ये महाराष्ट्र विधानसभेतही हा मुद्दा उपस्थित करण्यात आला होता. शिवसेनेचे (शिंदे गटाचे) आमदार भरत गोगावले आणि भाजप आमदार नितेश राणे यांनी दिशा सालियनच्या मृत्यूचा मुद्दा उपस्थित केला आणि चौकशीची मागणी केली. या मुद्द्यावरून सभागृहात आमदारांमध्ये बराच गोंधळ झाला होता. या प्रकरणात, नितेश राणे यांनी आदित्य ठाकरेंची नार्को टेस्ट करण्याची मागणीही केली होती. दिशा सॅलियन एक सेलिब्रिटी मॅनेजर होती. तिने वरुण शर्मा, सुशांत सिंग राजपूत, भारती सिंग सारख्या अनेक प्रसिद्ध कलाकारांसोबत काम केले. दरम्यान, दिशा सालियनचा मृत्यू ८ जून २०२० रोजी झाला होता.

त्यानंतर तीन दिवसांनी तिचे पोस्टमार्टम झाल्याची नोंद आहे. त्यामध्ये दिशाच्या शरीरावर हाताला, पायाला, छातीवरही जखमा झाल्याचा उल्लेख करण्यात आला आहे. दिशाच्या डोक्यावर गंभीर जखम झाल्यामुळेच तिचा मृत्यू झाल्याचं या रिपोर्टमध्ये नमूद करण्यात आलं आहे. तसेच दिशाच्या नाकातून आणि तोंडातून देखील रक्त येत होतं, असं देखील रिपोर्टमध्ये नमूद करण्यात आलं आहे. मात्र तिच्यावरती कुठलाही लैंगिक अत्याचार किंवा बलात्कार झालेला नाही असं रिपोर्टमध्ये स्पष्टपणे नमूद करण्यात आलं आहे.

## पत्रकार तरूण तेजपाल यांचे

तीन आठवड्यांच्या आत आत्मसमर्पण करण्याचे निर्देश दिले होते. न्यायालयाने असेही म्हटले होते की, आत्मसमर्पणाचे प्रमाणपत्र सादर झाल्यानंतर त्यांच्या फौजदारी अपीलाची २२ सप्टेंबर रोजी सुनावणीसाठी यादी केली जाईल. प्रमाणपत्र २१ सप्टेंबरपर्यंत सादर करावे लागेल.

**निर्दोष मुक्त करण्याचा निर्णय फिरवला**

६ ऑगस्ट रोजी बाम्बे उच्च न्यायालयाने तेजपालला २०१३ मध्ये एका कनिष्ठ महिला सहका-यावर बलात्कार केल्याप्रकरणी दोषी ठरवले होते. न्यायालयाने ट्रायल कोर्टाचा २०२१ चा निर्दोष मुक्ततेचा निर्णय रद्द करत त्यांना १० वर्षांच्या सक्तमजुरीची शिक्षा सुनावली होती. हे प्रकरण नोव्हेंबर २०१३ मध्ये गोव्यातील तहलका मासिकाच्या एका कार्यक्रमादरम्यान हाटेलच्या लिफ्टमध्ये घडलेल्या घटनेशी संबंधित आहे. तेजपालला याच प्रकरणात नोव्हेंबर २०१३ मध्ये अटक करण्यात आली होती .

## विनयभंगाच्या गुन्ह्यानंतर संजय

केले. रस्त्यावर वाढदिवस साजरा करून नागरिकांना अडथळा निर्माण करण्यात आला आणि त्यासाठी लाखो रुपये खर्च करण्यात आल्याचा दावा त्यांनी केला.

**गायकवाडांना दुष्काळाची आठवण-**एकीकडे दुष्काळाची परिस्थिती असताना अशा पद्धतीने वाढदिवस साजरा करण्यावर त्यांनी आक्षेप घेतला. अधिका-यांना राजशिष्टाचाराचे पालन करावे लागते; मात्र त्याचे पालन होत नसल्याचा आरोप करत या प्रकरणी लोकायुक्तांकडे तक्रार करणार असल्याचे गायकवाड यांनी सांगितले. बुलढाणा जिल्ह्यात भाजपच्या आमदार श्वेता महाले आणि शिवसेनेचे आमदार संजय गायकवाड यांच्यातील राजकीय संघर्ष गेल्या काही काळापासून चर्चेत आहे. दोन्ही पक्ष महायुतीचा भाग असले तरी स्थानिक पातळीवरील या संघर्षामुळे महायुतीसमोर नवे आव्हान उभे राहिले आहे.

**महायुतीत संघर्ष अधिक तीव्र होणार-** विनयभंगाच्या गुन्ह्यानंतर गायकवाड यांनी घेतलेली आक्रमक भूमिका आणि फडणवीसांवर केलेले आरोप यामुळे हा संघर्ष आता आणखी तीव्र होण्याची शक्यता आहे. एकमेकांना राजकीय शह देण्यासाठी कायदेशीर कारवाईचा वापर होत असल्याची चर्चा बुलढाणा जिल्ह्यात सुरू झाली आहे. मात्र, या आरोपांबाबत संबंधितांकडून स्वतंत्र प्रतिक्रिया येणे महत्त्वाचे ठरणार आहे.

## हुथी बंडखोरांचा आणखी

सरकारी सैन्याचे नियंत्रण होते. हुथींनी या बेटांवर कब्जा केल्यामुळे लाल समुद्राच्या सागरी मार्गावरील त्यांचे वर्चस्व आणखी मजबूत झाले आहे. बाब-अल-मंदेब हा आशियातून युरोपला जाणा-या जहाजांसाठी एक छोटा मार्ग आहे. येथून गेल्यानंतर जहाजे सुएझ कालव्यामार्गे भूमध्य समुद्रापर्यंत पोहोचतात.सौदीमध्ये येमन सीमेजवळ एक प्रोजेक्टाइल पडल्याने दोन लोक जखमी झाले. एका मशिदीचे आणि काही इतर इमारतींचेही नुकसान झाले. येमनमध्ये हुथीविरुद्धच्या लढाईत गेल्या चार आठवड्यांत सरकार-समर्थित ५०० हून अधिक सैनिक मारले गेले आहेत. सरकारच्या समर्थनार्थ लढणा-या नॅशनल रेझिस्टन्स फोर्सने हा दावा केला आहे. संस्थेनुसार, याच दरम्यान होदेदा आणि ताईज प्रांतांमध्ये १,००० हून अधिक हुती सैनिकही मारले गेले. मात्र, हुथींनी या आकडेवारीवर कोणतीही प्रतिक्रिया दिलेली नाही. या दरम्यान येमेनी सरकारने लाल समुद्राच्या किना-यावर आणखी सैनिक पाठवण्याचा निर्णय घेतला आहे. सरकारच्या एका अधिका-याने गेल्या आठवड्यातील पराभव मान्य करत सांगितले की, सरकारी सैन्य पुन्हा त्या भागात परत येईल.

**येमनमध्ये सरकार आणि हुथी यांच्यात हल्ले तीव्र-** येमन आणि सौदीच्या सैन्याने रविवारी लाल समुद्राजवळ हुथीच्या ठिकाणांवर हवाई हल्ले केले. याला प्रत्युत्तर म्हणून हुथीनी सौदी अरेबियावर ड्रोन आणि क्षेपणास्त्रांनी हल्ले केल्याचा दावा केला. हल्ल्याच्या शक्यतेमुळे सौदी अरेबियातील अबहा आणि खमिस मुशैत या दोन शहरांमध्ये सायरन वाजवण्यात आले. लोकांना सुरक्षित ठिकाणी जाण्यास सांगण्यात आले.

## 'आम्ही 17 खासदार भाजपामध्ये

पक्षांतर विरोधी कायदा लागू होणार नाही,' असे खासदार बसुनिया म्हणाले.तृणणूल काँग्रेसच्या २७ लोकसभेच्या खासदारांपैकी २० खासदारांनी विधानसभा निवडणुकीतील पराभवानंतर लगेचच NCPI मध्ये प्रवेश केला होता आणि भाजपला पाठिंबा दिला होता. बसुनिया म्हणाले की, खासदारांनी सुरु वातीला थेट भाजपामध्ये जाण्याचाच निर्णय घेतला होता, पण तीन अल्पसंख्याक खासदार भाजपामध्ये जाण्यास उत्सुक नसल्यामुळे त्यांना NCPI मध्ये आणण्यात आले. ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखालील तृणमूल काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांनी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांच्याकडे अर्ज सादर केला असून या २० खासदारांना अपात्र ठरवण्याची मागणी करत सर्वोच्च न्यायालयातही धाव घेतली आहे.

## अमरावतीत गणेशोत्सवाला जल्लोषात

वातावरणात गणरायाचे स्वागत करण्यात आले. यावर्षी तिथींच्या विशेष संयोगामुळे गणेशोत्सव १० ऐवजी १२ दिवसांचा असणार आहे. १४ सप्टेंबर (गणेश चतुर्थी) ते २५ सप्टेंबर (अनंत चतुर्दशी) असा प्रदीर्घ काळ भक्तांना बाप्पाच्या पूजेचा आणि सेवेचा आनंद घेता येणार आहे. शहरातील विविध मंडळांनी इंदूरचे प्रसिद्ध खजराणा गणपती, उज्जैनचे महाकालेश्वर मंदिर आणि जगन्नाथ पुरी यांसारख्या ऐतिहासिक व धार्मिक मंदिरांच्या भव्य प्रतिकृती उभारल्या आहेत. तसेच बाजारपेठेत पर्यावरणपूरक (मातीच्या) मूर्तींना सर्वाधिक पसंती मिळताना दिसली.दिवसभरात अधूनमधून आलेल्या पावसाच्या सरींनंतरही भक्तांचा आणि तरुणांचा उत्साह अजिबात कमी झाला नाही. पुढील १२ दिवस शहरात विविध सांस्कृतिक कार्यक्रम, महाप्रसाद, आरोग्य शिबिरे आणि आरतीच्या कार्यक्रमांची रेलचेल असणार आहे.

## अमरावती जिल्ह्यात दुष्काळ जाहीर करा

प्रोत्साहनपर अनुदान, सर्व शेतकऱ्यांना दरमहा १० हजार रुपये पेन्शन, वन्यप्राण्यांचा बंदोबस्त, रखडलेले विहीर व ठिबक सिंचन अनुदान तातडीने जमा करणे, कर्जफेड केलेल्या शेतकऱ्यांच्या खात्यात दोन लाख रुपये जमा करणे, रोजगार हमीची कामे सुरू करणे, प्रलंबित घरकुल अनुदान देणे आणि शेतमजुरांना विशेष अनुदान देण्याच्या मागण्या करण्यात येणार आहेत.

आंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन महाराष्ट्र राज्य किसान सभेचे राज्य सरचिटणीस अशोक सोनारकर, अध्यक्ष सतीश चौधरी, सचिव डॉ. ओमप्रकाश कुटेमाटे, राज्य कौन्सिल सदस्य विनोदराव जोशी, सुनील मेटकर व लक्ष्मण धाकडे यांनी केले आहे.

तसेच शेखर बद्रे (चांदूर रेल्वे), संतोष सुरजुसे (नांदगाव खंडेश्वर), कैलास ठाकरे (धामणगाव), राहुल मंगळे (मोर्शी), भाई अरविंद वानखडे (वरुड), पंकज आवारे (चांदूर बा.), धनंजय मस्के (अचलपूर), नितीन गादे (दर्यापूर), बापूराव बाळापुरे (अंजनगाव), कैलास महाजन (धारणी), अशोकराव राऊत (अमरावती) आणि टिकाराम बेलसरे (चिखलदरा) यांनीही शेतकरी व नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

## शेतात विजेचा करंट लागून वृद्धाचा

एक मुलगी असा आप्त परिवार आहे. वृत्त लिहीपर्यंत या प्रकरणी कुठल्याही प्रकारची अधिकृत तक्रार नोंदविण्यात आलेली नव्हती. सणाच्या दिवशीच गावात घडलेल्या या दुर्दैवी घटनेमुळे निर्मळे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून, संपूर्ण येवदा गावात हळहळ व्यक्त केली जात आहे. शेतातील कंपाऊडला विज प्रवाह लावण्याची महावितरणची परवानगी नसतानाही कंपाऊंडला विज प्रवाह लावल्या जातो. विज प्रवाहामुळे जर एखाद्याचा मृत्यू झाल्यास संबंधित शेतकऱ्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची तरतुद आहे. असे असतांही काही शेतकरी हे शेताच्या कंपाऊडला विज प्रवाह लावतात.

## संत अच्युत महाराज हॉस्पिटलचे

गंभीर दखल घेत अधिकाऱ्यांनी कॅन्टीनवर बंदीची कारवाई केली. कॅन्टीन चालवण्यासाठी आवश्यक असलेला अन्न सुरक्षा कायद्यांतर्गत परवाना न घेताच हे उपाहारगृह सुरू होते. स्वयंपाकघर आणि परिसर अत्यंत अस्वच्छ आढळला, ज्यामुळे रुग्णांना व त्यांच्या नातेवाईकांना संसर्ग होण्याचा मोठा धोका निर्माण झाला होता. अन्न सुरक्षा परवाना मिळेपर्यंत आणि स्वच्छतेचे सर्व निकष पूर्ण करेपर्यंत हे कॅन्टीन बंदच राहणार आहे. या धडक कारवाईमुळे आरोग्य क्षेत्रात आणि स्थानिक व्यावसायिकांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे.

## दोन गुंड प्रवृत्तीचे इसम सहा

पोलिसांनी दोघांविरुद्ध तडीपारचा प्रस्ताव सादर केला होता. प्रस्तावाची चौकशी केल्यानंतर उपविभागीय दंडाधिकारी, चांदूर रेल्वे यांनी मुंबई पोलीस अधिनियमातील कलम ५६ (१) (ब) अन्वये दोघांना १० सप्टेंबर २०२६ रोजी मध्यरात्रीपासून ९ मार्च २०२७ रोजी मध्यरात्रीपर्यंत सहा महिन्यांच्या कालावधीसाठी अमरावती जिल्ह्यातून तडीपार करण्याचे आदेश दिले. या आदेशाची अंमलबजावणी करताना संदीप शेंडे याला १२ सप्टेंबर रोजी, तर सागर गाढवे याला १४ सप्टेंबर रोजी अमरावती जिल्ह्याच्या हद्दीतून तडीपार करण्यात आले.

ही कारवाई अमरावती ग्रामीणचे पोलीस अधीक्षक निकेतन कदम, अपर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी गिरीश ताथोड आणि चांदूर रेल्वे पोलीस ठाण्याचे निरीक्षक मंगेश मोहोड यांच्या नेतृत्वात करण्यात आली.

## सोशल मीडियावर हत्यारांचे प्रदर्शन

रवीनगर) यांच्याविरुद्ध कारवाई करण्यात आली. आरोपींकडून पाच लोखंडी चाकू, अंदाजे किंमत ३ हजार ९०० रुपये, तसेच गुन्ह्यात वापरण्यात आलेली किया सेल्टॉस (एमएच २७ डीई ३८११) कार, अंदाजे किंमत १० लाख रुपये, असा एकूण १० लाख ३ हजार ९०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. चौकशीदरम्यान आरोपीने संबंधित कार आपल्या काका राहुल सुभाष टाले यांच्या मालकीची असून, त्यांना न सांगता ती घेऊन गेल्याचे पोलिसांना सांगितल्याचे प्रेसनोटमध्ये नमूद आहे. तपासाच्या दृष्टीने पोलिसांनी कार जप्त केली आहे.

या प्रकरणी आरोपींविरुद्ध कलम ४/२५ आर्म्स ॲक्ट तसेच कलम १३५ महाराष्ट्र पोलीस कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त श्याम घुगे आणि सहाय्यक पोलीस आयुक्त संजय खताळे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वात पोलीस निरीक्षक उमेश मुंढे, सपोनि नितीन शिंदे तसेच राजापेठ पोलीस ठाण्याच्या डीबी पथकातील अंमलदारांनी केली.सोशल मीडियावर चाकू किंवा इतर घातक हत्यारांचे प्रदर्शन करणारे स्टेटस अथवा व्हिडीओ प्रसारित करणाऱ्यांविरुद्धही यापुढे कारवाई सुरूच राहणार असल्याचा इशारा पोलिसांनी दिला आहे.

**सचिन रोडे पाटील यांच्या द्वआनंदी**

त्यांचा प्रयत्न असल्याचे त्यांच्या आगामी प्रकल्पांवरून स्पष्ट होते. पहिल्याच चित्रपटानंतर सचिन रोडे पाटील यांनी आपल्या निर्मितीचा आवाका आणखी विस्तारण्याची तयारी केली आहे. 'महाराष्ट्र एपस्टीन फाइल्स' हा त्यांचा आगामी बहुचर्चित मराठी चित्रपट असून, या चित्रपटाचे ते सादरकर्ते म्हणून कार्यरत असणार आहेत. 'आनंदी पिक्चर्स अमरावती' या बॅनरअंतर्गत आणखी एका महत्वपूर्ण विषयावरील सिनेमाची निर्मितीपूर्व प्रक्रिया सध्या सुरु असून ऑक्टोबरमध्ये चित्रपटाच्या चित्रीकरणाला सुरुवात होणार आहे. वास्तववादी घटनांवर आधारित असलेल्या या चित्रपटाबाबतची माहिती सुरक्षेच्या कारणास्तव अद्याप गुलदस्त्यात ठेवण्यात आली आहे. यानंतर 'द अमरावती डायरीज' या १०० कोटी बजेट असलेल्या महत्त्वाकांक्षी सिनेमाची निर्मिती हिंदी, मराठी आणि तेलगू अशा तीन भाषांमध्ये करण्यात येणार आहे. सत्य घटनांवर आधारित असलेल्या या विषयाची निर्मिती भव्य दिव्य स्वरूपात केली जाणार आहे. विशेष म्हणजे या चित्रपटाचे ८०३ चित्रीकरण हे अमरावतीमध्ये करण्यात येणार आहे. विदर्भातील कलाकारांच्या कलागुणांना वाव देण्याचा निर्मात्यांचा मानस आहे. या चित्रपटात मराठीसह हिंदी आणि तेलगू चित्रपटसृष्टीतील दिग्गज कलाकार महत्त्वपूर्ण भूमिकांमध्ये दिसणार असून या चित्रपटामुळे अमरावतीची ओळख आता राष्ट्रीय स्तरावर पोहचणार आहे. विशेष म्हणजे, सचिन रोडे पाटील यांची सिनेनिर्मितीची ही वाटचाल केवळ काही मोजक्या प्रकल्पांपुरती मर्यादित राहणार नाही. विविध विषयांना हात घालत, मनोरंजनासोबतच आशयाची ताकद असलेले आणि प्रेक्षकांना वेगळा अनुभव देणारे अनेक मराठी चित्रपट निर्माण करण्याची त्यांची महत्त्वाकांक्षी योजना आहे. वकिली, बांधकाम व्यवसाय आणि आता सिनेनिर्मिती अशा विविध क्षेत्रांमध्ये कार्यरत असलेल्या सचिन रोडे पाटील यांचा हा प्रवास निश्चितच लक्षवेधी ठरत आहे. अमरावतीच्या मातीतून आलेला हा नवा निर्माता सिनेसृष्टीत स्वतःची स्वतंत्र ओळख किती भक्कमपणे निर्माण करतो, हे आगामी काळात पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

## गणेश मंडळावर ध्वनिप्रदूषणाची

यावेळी जगदीश धुमाळ (रा. भंडारा) यांच्या मालकीचा बॅन्जो वाजविण्यात आला. या बॅन्जोमध्ये चार बेस आणि दोन टॉप असल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे. मोठ्या आवाजात वाद्य वाजवून ध्वनिप्रदूषणाच्या नियमांचे उल्लंघन केल्याचा ठपका ठेवत पोलिसांनी संबंधित बॅन्जो जप्त केला. या प्रकरणी गणेश मंडळाच्या संबंधित पदाधिकाऱ्यांसह बॅन्जो मालकाविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे. जप्त करण्यात आलेला बॅन्जो सध्या राजापेठ पोलीस ठाण्यात ठेवण्यात आला आहे. गणेशोत्सवाच्या काळात ध्वनिप्रदूषणासंदर्भातील नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर पोलिसांकडून कारवाई सुरू असून, मंडळांनी ध्वनिक्षेपक व वाद्यांचा वापर करताना निर्धारित वेळ आणि ध्वनीमर्यादेचे पालन करावे, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

## तडीपार इसम चाकूसह गुन्हे शाखेच्या

करण्यात आला आहे. पुढील तपास सुरू आहे. शहरात अवैधरीत्या घातक शस्त्रे बाळगून दहशत निर्माण करणाऱ्यांविरुद्ध प्रभावी कारवाई करण्याचे आदेश पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी दिले आहेत. त्यानुसार गुन्हे शाखेकडून तडीपार तसेच शस्त्र बाळगणाऱ्या इसमांवर लक्ष ठेवून कारवाई केली जात आहे. दरम्यान, तडीपार इसम किंवा शस्त्र घेऊन दहशत निर्माण करणारे व्यक्ती आढळल्यास नागरिकांनी अमरावती शहर पोलीस नियंत्रण कक्ष किंवा गुन्हे शाखेला तातडीने माहिती द्यावी, असे आवाहन पोलिसांनी केले आहे. माहिती देणाऱ्याचे नाव गोपनीय ठेवण्यात येणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले. ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलीस उपायुक्त यशवंत सोळंके, श्याम घुगे आणि पोलीस उपायुक्त (मुख्यालय तथा गुन्हे) प्रांजली सोनवणे यांच्या मार्गदर्शनात गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अतुल वर यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली.

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ मंगळवार, १५ सप्टेंबर २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


# जिल्ह्यातील अवैध धंद्यांना अभय कुणाचे ?

## अधिकारी–पुढा–यांच्या कथित राजाश्रयाने अवैध धंदेवाईक मोकाट

**– शेतकरी संकटात, मात्र 'मटक्याच्या बाजारात' तेजी**
**– पोलिसांच्या थातूर मातूर कारवाईनंतरही अड्डे पुन्हा सुरु**
**– मुख्य सूत्रधारांवर कारवाई कधी ?**

■ पप्पु घुगे ■

**वाशीम :** जिल्ह्यातील सर्वसामान्य जनता विविध संकटांचा सामना करीत असताना अवैध धंद्यांचे जाळे मात्र दिवसेंदिवस विस्तारत असल्याचे वास्तव आहे. पावसाने दडी मारल्याने शेतकऱ्यांची पिके धोक्यात आली आहेत, शेतीची कामे मंदावल्याने शेतमजुरांच्या हाताला काम उरलेले नाही. अशा बिकट परिस्थितीत नागरिकांच्या अडचणींचा गैरफायदा घेत वरली-मटका, जुगार, अवैध दारू आणि इतर अवैध व्यवसाय करणाऱ्यांनी जिल्ह्यात आपले बस्तान अधिक घट्ट केल्याची चर्चा आहे. विशेष म्हणजे, या धंद्यांवर कारवाई करण्याची जबाबदारी असलेल्या यंत्रणांवरच आता नागरिकांकडून प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

वाशीम शहरापासून तालुक्याच्या गावापर्यंत अवैध धंद्यांची चर्चा उघडपणे होत आहे. काही ठिकाणी वरली-मटका व जुगाराचे अड्डे सुरू असल्याचे सांगितले जाते, तर काही भागांत अवैध दारूची विक्रीही खुलेआम सुरू असल्याची नागरिकांमध्ये चर्चा आहे. तितली-भवरा, गुटखा आणि अन्य प्रतिबंधित व्यवसायांमुळेही अनेक भागांत वातावरण दूषित होत असल्याचे बोलले जात आहे.

या संपूर्ण प्रकारामागे केवळ अवैध धंदेवाईकांचे धाडस आहे की त्यांना कोणाचे संरक्षण मिळत आहे, हा खरा प्रश्न आहे. काही अधिकारी, कर्मचारी तसेच राजकीय क्षेत्रातील व्यक्तींच्या कथित राजाश्रयामुळेच हे धंदे सुरू असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. त्यामुळे अवैध धंद्यांवर कारवाई करणाऱ्या यंत्रणेनेच या धंद्यांना संरक्षण देणाऱ्यांची चौकशी करणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त होत आहे.

विशेष म्हणजे, पोलिसांकडून एखाद्या ठिकाणी थातूर—मातूर कारवाई केली जाते, मात्र काही दिवसांनी त्याच परिसरात पुन्हा पोलीसांच्या सहकार्यानेच अवैध व्यवसाय सुरू झाल्याचे चित्र दिसून येत असल्याची नागरिकांची भावना आहे. त्यामुळे कारवाई नेमकी धंदे बंद करण्यासाठी आहे की केवळ कागदोपत्री कारवाई दाखविण्यासाठी, असा सवाल उपस्थित होत आहे. लहान-मोठ्या चालकांवर कारवाई करण्यापेक्षा या संपूर्ण यंत्रणेचा आर्थिक कारभार चालविणाऱ्या मुख्य सूत्रधारांपर्यंत पोहोचण्याची गरज आहे. दुसरीकडे, पावसाअभावी खरीप हंगाम अडचणीत आला आहे. शेतकऱ्यांच्या उत्पादनावर परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली असून ग्रामीण भागातील मजुरांनाही रोजगाराचा प्रश्न भेडसावत आहे. आर्थिक संकटात सापडलेल्या कुटुंबांपर्यंत अवैध धंद्यांचे लोण पोहोचणे ही चिंतेची बाब आहे. त्यामुळे या व्यवसायांवर वेळीच कठोर अंकुश न लावल्यास त्याचे परिणाम केवळ कायदा-सुव्यवस्थेपुरते मर्यादित राहणार नाहीत, तर सामाजिक पातळीवरही त्याचे पडसाद उमटू शकतात.

वाशीम जिल्ह्यातील सहाही तालुक्यांमध्ये अवैध धंद्यांची व्याप्ती नेमकी किती आहे, दररोजची उलाढाल किती आहे आणि या व्यवसायांच्या मागे कोण आहेत, याची स्वतंत्र चौकशी करण्याची गरज निर्माण झाली आहे. तसेच अधिकारी अथवा राजकीय व्यक्तींचा कथित हस्तक्षेप किंवा राजाश्रय असल्यास त्याचीही निष्पक्ष चौकशी होणे अपेक्षित आहे.

**कारवाईचा देखावा नको, मुळावर घाव हवा!**

अवैध धंदे सुरू ठेवणाऱ्यांसोबतच त्यांना प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष संरक्षण देणाऱ्यांवरही कारवाई झाली तरच जिल्ह्यातील या गैरप्रकारांना आळा बसू शकतो. त्यामुळे पोलिस प्रशासन आणि संबंधित विभाग आता कोणती ठोस भूमिका घेतात, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# शिक्षकांच्या मनात प्रेम, आपुलकी व विश्वास निर्माण केल्यामुळेच किरणराव सरनाईक शिक्षकांचे आमदार!

■ प्रतिनिधी | रिसोड ■

**बाबारावजी खडसे पाटील यांचे गौरवोद्गार!**
**आमदार कार्य गौरव आढावा पुस्तिकेचे विमोचन**

शिक्षकांच्या मनामध्ये प्रेम, आपुलकी आणि विश्वास निर्माण करण्यात शिक्षक आमदार ॲड. किरणराव सरनाईक यशस्वी ठरले आहेत. त्यामुळेच शिक्षकांनी त्यांना आपला प्रतिनिधी म्हणून आमदारपदाची जबाबदारी सोपविली, असे गौरवोद्गार बाबारावजी खडसे पाटील यांनी काढले.

शिक्षक आमदार ॲड. किरणराव सरनाईक यांच्या वाढदिवस अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्त आयोजित 'आमदार कार्य गौरव आढावा पुस्तिका' विमोचन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते.

यावेळी बाबारावजी खडसे पाटील यांनी ॲड. किरणराव सरनाईक यांच्या कार्याचा गौरव करताना सांगितले की, शिक्षकांच्या प्रश्नांची जाण, त्यांच्या अडचणी समजून घेण्याची वृत्ती आणि शिक्षकांशी असलेला जिव्हाळ्याचा संवाद यामुळे किरणराव यांनी शिक्षकांच्या मनात आपले वेगळे स्थान निर्माण केले आहे. शिक्षकांच्या प्रश्नांसाठी सातत्याने पाठपुरावा करून त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी ते प्रयत्नशील असतात. त्यांच्या कार्यपद्धतीमुळे शिक्षकांमध्ये त्यांच्याबद्दल विश्वासाची भावना निर्माण झाली आहे. 'आमदार कार्य गौरव आढावा पुस्तिका' ही त्यांच्या कार्याचा लेखाजोखा मांडणारी असून, शिक्षकांच्या हितासाठी त्यांनी केलेल्या विविध प्रयत्नांची आणि कार्याची माहिती या पुस्तिकेतून समोर येते. त्यांच्या कार्याला शिक्षकांचा मिळणारा उत्स्फूर्त प्रतिसाद हीच त्यांच्या नेतृत्वाची खरी पावती असल्याचेही यावेळी नमूद करण्यात आले.

यावेळी मंचावर शिक्षक आमदार किरणराव सरनाईक, श्री शिवाजी शिक्षण संस्था वाशिमचे सचिव भिकाजीराव नागरे, शिवाजी शिक्षण संस्था वाशिम कोषाध्यक्ष प्रदीपराव देशमुख, देविदासराव नागरे, पंजाबराव देशमुख, जितेंद्र कुमार दलाल, संजय जिरवणकर, डॉ.गोपीकिशन सिकची, डॉ. गरकळ, डॉ.रामेश्वर नरवाडे, मोहम्मद कबीर मोहसीन, अमित पाटील खडसे, भास्करराव सोनुने, प्राचार्य जानराव देशमुख हे उपस्थित होते. यावेळी बोलताना शिक्षक आमदार किरणराव सरनाईक यांनी गेल्या साडेपाच वर्षांमध्ये मी शिक्षक आमदार म्हणून शिक्षकांसाठी जे जे करणे श्यक होते ते सर्व कामे केल्याची व यापुढेही करत राहण्याचे आश्वासन दिले, माझी आमदार म्हणून कार्य गौरव पुस्तिका हेच मी शिक्षकांसाठी केलेल्या कामाचे प्रमाण असल्याचेही त्यांनी यावेळी बोलताना सांगितले. या कार्यक्रमास तालुक्यातील अनेक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयाचे अध्यक्ष, संचालक मंडळ, प्राचार्य, उपप्राचार्य, प्राध्यापक, प्राध्यापिका, शिक्षक, शिक्षिका तसेच शिक्षण क्षेत्रातील मान्यवर, विविध संस्थांचे पदाधिकारी, पत्रकार बांधव तसेच ॲड. किरणराव सरनाईक यांच्यावर प्रेम करणारे हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## घरोघरी गणपती बाप्पाचं आगमन

■ प्रतिनिधी | रिसोड ■

चैतन्य आणी द्वाही फिरवणाऱ्या आणि विघहर्त्याच्या रूपाने येऊन सकारात्मकता पेरणाऱ्या गणरायांचा उत्सव आज, सोमवारी आगमण होत आहे. एकीकडे जिल्ह्यात दुष्काळाचं सावट असतानीही गणेश मूर्तीच्या किमती मध्ये चैप्पट वाढ झाल्याने सर्वसामान्य नागरिकांच्या नाराजी व्यक्त करीत आहे.

रिसोड बाजार पेठेत खरेदी, सजावट, नैवेद्य, फुलांच्या खरेदीदारांनी बाजारपेठा फुलल्या आहे. तर सार्वजनिक मंडळांमध्येही गणरायाच्या खरेदी साठी रिसोड शहरात गणेश विक्री दुकांदारांवर सकाळ पासून गणेश मूर्ती खरेदी करण्या साठी मोठी गर्दी पाह्याला मिळत आहे. ढोल-ताशांच्या गजरात आणि गणपत्ती बाप्पा मोरयाच्या जयघोषामध्ये रिसोड नगरी भक्तिमय वातावरणात दुमदुमून गेली आहे.

# तहसील कार्यालयात 'रील' काढणे भोवले

## तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर अडचणीत

■ प्रतिनिधी | रिसोड ■

शासकीय नियमांचे उल्लंघन करून तहसील कार्यालयात वैयक्तिक प्रसिद्धीसाठी आणि स्वयंप्रशंसेसाठी 'सिनेमॅटिक रील्स' तयार करणाऱ्या वाशीम जिल्ह्यातील रिसोडच्या तहसीलदार श्रीमती प्रतीक्षा तेजनकर यांच्या अडचणीत मोठी वाढ झाली आहे.

त्यांच्या या कृतीची गंभीर दखल घेत महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाने त्यांच्या संपूर्ण प्रशासकीय कामकाजाची विशेष पथकामार्फत चौकशी करण्याचा आदेश विभागीय आयुक्त, अमरावती यांना दिले आहेत.

**कार्यालयाचा बनवला 'शूटिंग स्टुडिओ'**

रिसोड तहसील कार्यालयात शासकीय खुर्चीवर बसून, फायलींवर सह्या करताना आणि फिल्मी स्टाईलने रील्स बनवून ते स्वतःच्या इंस्टाग्राम खात्यावर प्रसारित केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला होता. जनसेवेचे केंद्र असणारे तहसील कार्यालय प्रशासकीय कामकाजाऐवजी वैयक्तिक प्रसिद्धीसाठी 'शूटिंग स्टुडिओ'सारखे वापरले जात असल्याचा गंभीर आरोप त्यांच्यावर झाला.

**कर्मचाऱ्याचा चित्रीकरणासाठी वापर**

महसूल यंत्रणेतील अत्यंत महत्त्वाचा घटक असलेले शासकीय कर्मचारी आणि चक्क कोतवालांना अधिकाऱ्यांच्या वैयक्तिक प्रसिद्धीसाठी राबवले जात असल्याची चर्चा रंगली होती. शासकीय कर्तव्ये बाजूला ठेवून कॅमेरा सांभाळणे आणि रील्सचे नियोजन करणे यामुळे प्रशासकीय शिस्तीचा पुरता

बोजवारा उडाला होता. याप्रकरणी विविध प्रसारमाध्यमांमध्ये बातम्या प्रसिद्ध झाल्यानंतर हा प्रकार शासनाच्या निदर्शनास आला. याबाबतचा प्रस्ताव महसूल मंत्री तथा शिस्तभंग विषयक प्राधिकारी यांच्या अवलोकनार्थ सादर करण्यात आला होता.

## गणरायाच्या आगमनाने भक्तिमय वातावरण; ढोल-ताशांच्या गजरात बाप्पाचे स्वागत

■ प्रतिनिधी | वाशिम ■

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहरासह ग्रामीण भागात गणरायाच्या आगमनाची उत्साहात तयारी करण्यात आली. ढोल-ताशांचा गजर, गुलालाची उधळण आणि 'गणपती बाप्पा मोरया'च्या जयघोषात सार्वजनिक गणेश मंडळांनी लाडक्या गणरायाची मिरवणुकीतून स्थापना स्थळी नेऊन भक्तिभावाने स्वागत केले.

गणपती बाप्पाच्या आकर्षक मूर्ती, फुलांची सजावट आणि विविध वाद्यांच्या गजरामुळे परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. गणरायाच्या दर्शनासाठी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. युवकांसह महिला व बालकांनीही गणेश आगमन सोहळ्यात उत्स्फूर्त सहभाग घेतला. गणेशोत्सवाच्या निमित्ताने विविध मंडळांकडून आकर्षक देखावे व धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, पुढील दिवसांत गणरायाच्या दर्शनासाठी भाविकांची गर्दी होणार आहे.

## हळद पीक प्रणालीतील महिलांचे श्रम कमी करण्यासाठी आधुनिक अवजारांचे प्रात्यक्षिक

■ प्रतिनिधी | वाशिम ■

हळद पीक प्रणालीतील विविध शेतीकामांमध्ये महिला शेतकऱ्यांना होणारा शारीरिक ताण व श्रम कमी करून कामाची कार्यक्षमता वाढविण्याच्या उद्देशाने कृषी विज्ञान केंद्र, वाशिमच्या गृहविज्ञान विभागाच्या वतीने आत्मा, वाशिम यांच्या अर्थसहाय्यातून वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी यांनी शिफारस केलेल्या श्रम-बचत कृषी अवजार संचाचे प्रात्यक्षिक व प्रशिक्षण दि. ११ सप्टेंबर रोजी आत्मा कार्यालय, वाशिम येथे आयोजित करण्यात आले.कृषी विज्ञान केंद्र, वाशिमचे प्रमुख डॉ. आर. एल. काळे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या प्रशिक्षणामध्ये हळद पिकाची लागवड, आंतरमशागत, तण नियंत्रण, मातीची भुसभुशीतता राखणे तसेच इतर पीक व्यवस्थापनाच्या कामांमध्ये महिलांचा शारीरिक श्रम कमी करण्यासाठी शरीरास अनुकूल व श्रम-बचत कृषी अवजारांचा प्रभावी वापर कसा करावा, याचे सैद्धांतिक मार्गदर्शन आणि प्रत्यक्ष प्रात्यक्षिक देण्यात आले. कृषी विज्ञान केंद्राच्या गृहविज्ञान विभागाच्या प्रमुख शुभांगी वाटाणे यांनी हळद पीक प्रणालीतील विविध कामांसाठी अवजार संचाची निवड, हाताळणी, कार्यक्षम वापर आणि सुरक्षितता याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. पारंपरिक पद्धतीच्या तुलनेत योग्य कृषी अवजारांच्या वापरामुळे कामातील शारीरिक ताण, वाकण्याची वारंवारता व स्नायूंवरील अनावश्यक भार कमी होण्यास, तसेच मनुष्यबळ, वेळ व ऊर्जेची बचत होऊन कामाची उत्पादकता वाढण्यास मदत होते.

## वाशीम येथे २० सप्टेंबरला मराठा समाज सेवा मंडळातर्फे गुणवंतांचा सत्कार

■ प्रतिनिधी | वाशिम ■

मराठा समाज सेवा मंडळाच्या वतीने २० सप्टेंबर रोजी दुपारी १ वाजता पवन मंगल कार्यालय येथे गुणवंत विद्यार्थ्यांचा व ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला आहे.कार्यक्रमाच्या ध्यक्षस्थानी मराठा समाज सेवा मंडळाचे अध्यक्ष प्रा. भाऊसाहेब काळे राहणार आहेत. तर प्रमुख अतिथी म्हणून आमदार अमित झनक, आमदार भावनाताई गवळी, आमदार किरणराव सरनाईक आणि माजी आमदार ॲड. विजयराव जाधव उपस्थित राहणार आहेत.

यासोबतच कार्यक्रमास बाजार समितीचे सभापती महादेवराव काकडे, जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष माधवराव अंभोरे, माजी जि. प. सदस्य पांडुरंग ठाकरे, गोटे महाविद्यालयाचे अध्यक्ष डॉ .नारायणराव गोटे, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष चक्रधर गोटे, माजी सभापती सुरेश मापारी, मानोली येथील भगवंत शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. गोविंद महाकाळ, वाशीम मराठा सेवा संघ जिल्हाध्यक्ष नारायणराव काळबांडे, सहदेवराव शिंदे, राज्य कार्यकारणी सदस्य वसंतराव अवचार, संतोष तांगडे व रवींद्र मुंडे यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. कार्यक्रमाचे नियोजन व संयोजन मराठा समाज सेवा मंडळाचे कार्याध्यक्ष तानाजी कव्हर, उपाध्यक्ष डॉ. दीपक शेळके, दिनकराव वाटाणे, म. स. सेवा मंडळ सचिव प्रा. रघुनाथ उखळे, इंजि. बळिराम पाटील इडोळे, प्रा. तुकाराम शेवाळे, आदींनी केले.

## शाडू मातीपासून गणेशमूर्ती निर्मिती कार्यशाळा

■ प्रतिनिधी | कारंजा ■

पर्यावरणपूरक गणेशोत्सवाची संकल्पना विद्यार्थ्यांमध्ये रुजविण्यासोबतच त्यांच्या कलागुणांना वाव मिळावा, या उद्देशाने गोविंद स्कूलमध्ये शाडू मातीपासून गणपती बाप्पाची मूर्ती बनविण्याची विशेष कार्यशाळा उत्साहपूर्ण वातावरणात आयोजित करण्यात आली. विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवत आपल्या कल्पकतेतून विविध आकर्षक गणेशमूर्ती साकारल्या.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे संचालक श्री. संतोष चौधरी होते. प्रमुख परीक्षक म्हणून कलाशिक्षक श्री. मनोज नाठे उपस्थित होते, तर श्री. सचिन प्रकाश हाते यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

कार्यशाळेदरम्यान विद्यार्थ्यांना शाडू मातीचे पर्यावरणीय महत्त्व, पर्यावरणपूरक गणेशमूर्ती तयार करण्याचे फायदे तसेच मूर्तीकलेच्या विविध कलात्मक पद्धतींबाबत मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी स्वतःच्या कल्पनाशक्तीचा वापर करून शाडू मातीपासून सुंदर व आकर्षक गणेशमूर्ती तयार केल्या. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला, कलात्मक कौशल्याला आणि कल्पनाशक्तीला चालना मिळाली. त्याचबरोबर गणेशोत्सवाच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धनाचा संदेशही विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन मनिष वडते यांनी केले, तर आभार प्रदर्शन स्नेहल वैद्य यांनी मानले. विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग तसेच आशिष देशमुख आणि जान्हवी येवतेकर या शिक्षकांचे मार्गदर्शन यामुळे कार्यशाळेला विशेष रंगत आली. 'कलेतून संस्कार आणि संस्कारातून पर्यावरण संवर्धन' या विचाराची प्रचिती देणारी ही कार्यशाळा विद्यार्थ्यांसाठी संस्मरणीय ठरली.


**चौकशीची जाहिर नोटीस**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, वाशिम**

एस. आर. एन. क्र. WSM/21192/18/26 फेरफार अहवाल / अर्ज क्र.
**सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक :** नंदविना गौरक्शन व पशु संवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट मंगरुळपीर ता. मंगरुळपीर जि. वाशिम बाबत ।
**न्यासाचा पत्ता :** - C/O नंदकिशोर परशराम इंगोले, कारंजारोड, मंगरुळपीर, वाशिम, मंगरुळपीर, मंगळूरपीर
**अर्जदार -** ऋषिकेश नंदकिशोर इंगोले

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त, वाशिम, हे वर नमूद केलेला अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्द्यांवर चौकशी करणार आहेत.

(१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय ? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरूपाचा आहे काय ? (२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

**जंगम मिळकत (वर्णन)**

| अ.क्र. | तपशील | अंदाजे मूल्य |
|---|---|---|
| 1 | Founder Members Fees | 9000.00 |

(अ) जंगम मिळकत : रोख रु.९०००/- मात्र (अक्षरी रुपये नऊ हजार मात्र फक्त)

**स्थावर मिळकत (वर्णन)**

| अ. क्र. | शहर किंवा गाव | सी.एस. किंवा महानगर पालिका किंवा सर्वेक्षण क्र. | क्षेत्र | मूल्यांकन | मुदत/कालावधी किंवा स्वरूप | अंदाजे मूल्य |
|---|---|---|---|---|---|---|

(ब) स्थावर मिळकत : रोख रु./- मात्र (अक्षरी रुपये मात्र फक्त)

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतींचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटीस माझे सहीनिशी व या कार्यालयाचे शिक्यानिशी आज दिनांक १७-०८-२०२६ रोजी दिली.

शिक्का

**अधिक्षक**
सार्वजनिक न्यास
नोंदणी कार्यालय, वाशिम


# शहरात रेती माफियांचे रेतीसाठे ; महसूल प्रशासनाचे दुर्लक्ष ?

## खुल्या लेआउटसह बेवारस जागांवर मोठ्या प्रमाणात साठवणूक; कारवाईकडे नागरिकांचे लक्ष

■ प्रतिनिधी | रिसोड ■

वाशिम जिल्ह्यात रेती उपशावर निर्बंध असताना रिसोड शहर व परिसरातील विविध खुल्या लेआउट, अतिक्रमित तसेच बेवारस जागांवर मोठ्या प्रमाणात रेतीचे साठे करून ठेवण्यात आल्याचे चित्र दिसून येत आहे. शहरातील विविध भागांत अशा प्रकारे रेतीसाठे होत असताना महसूल प्रशासनाकडून अद्याप ठोस कारवाई का होत नाही, असा सवाल सर्वसामान्य नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

वाशिम जिल्ह्यात रेती घाटांचे लिलाव रखडल्याचा फायदा घेत काही रेती व्यावसायिकांकडून बाहेरून रेती आणून शहराच्या विविध भागांत साठवणूक केली जात असल्याची चर्चा आहे. त्यामुळे शहराच्या आजूबाजूला जणू कृत्रिम रेतीघाटच निर्माण झाल्याचे चित्र आहे. महसूल प्रशासनाच्या हद्दीत खुलेआम रेतीचे साठे करण्यात येत असतील, तर संबंधित यंत्रणेचे याकडे लक्ष नाही की जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत आहे, असा प्रश्न निर्माण झाला आहे. शहरातील काही ठिकाणी करण्यात आलेल्या रेतीसाठ्यांच्या जागांवर सर्वसामान्य नागरिकांना सहज पोहोचता येत नसल्याचेही दिसून येते. त्यामुळे संबंधित साठ्यांची तपासणी करून रेतीचा स्रोत, वाहतूक परवाना तसेच मालकी याबाबत महसूल विभागाने पडताळणी करणे गरजेचे आहे. कारवाईच्या वेळी 'ही रेती आमची नाही' असे सांगून संबंधितांकडून जबाबदारी झटकली जाण्याची शक्यता असल्याने खुल्या व बेवारस जागांवरील रेतीसाठ्यांची प्रशासनाने तातडीने पाहणी करावी, अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

**लाखो रुपयांचा महसूल बुडण्याची शक्यता!**

जिल्ह्यात रेती घाटांचे लिलाव न झाल्याने अधिकृत मार्गाने उपलब्ध होणाऱ्या रेतीच्या तुलनेत अवैध मार्गाने आणलेल्या रेतीच्या व्यवहाराला चालना मिळत असल्याची चर्चा आहे. शहरात साठवून ठेवलेली रेती चढ्या दराने विकली जात असल्याने या व्यवहारातून काही जणांना मोठा आर्थिक फायदा होत असल्याचे बोलले जात आहे. दुसरीकडे शासनाच्या महसुलाचे नुकसान होत असल्याने महसूल प्रशासनाने शहरातील संशयास्पद रेतीसाठ्यांची व्यापक तपासणी करून दोषींवर नियमानुसार कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक २८९ ■ मंगळवार १५ सप्टेंबर २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.००रु


# १४० तासांचा संताप, अखेर रायपूरचा एल्गार प्रशासनाच्या दारात

**आज रोहित पवारांच्या उपस्थितीत ठिय्या. सहा दिवस गावात पेटलेल्या आंदोलनाला अखेर यश मिळणार?**

**भगवान धुर्वेंचा मृतदेह सहा दिवस शवागारात**
**आज दुपारी बारानंतर अंत्यसंस्काराचे संकेत**

**सेलू जनमाध्यम:-** रायपूर जंगली येथील वाघाच्या हल्ल्यात मृत्यू झालेल्या आदिवासी शेतकरी भगवान चंद्रभान धुर्वे यांच्या मृतदेहाची सहा दिवसांपासून सुरू असलेली परवड अखेर निर्णायक टप्प्यावर आली आहे. जवळपास एकशे चाळीस तास मृतदेह शवागारात ठेवण्यात आल्यानंतर आज दुपारी बारा वाजेनतंर अंत्यसंस्कार होण्याचे संकेत मिळत आहेत. सहा दिवसांपासून गावकऱ्यांनी उभारलेल्या आंदोलनाला अखेर यश मिळण्याचे चित्र निर्माण झाले आहे. मात्र हा तोडगा आंदोलनाच्या दबावामुळे निघाला की प्रशासनाला उशिरा जाग आली हा प्रश्न आता जिल्ह्यात चर्चेचा विषय ठरला आहे. ९ सप्टेंबर रोजी दुपारी चारच्या सुमारास शेतातून परतत असताना दबा धरून बसलेल्या वाघाने भगवान धुर्वे यांच्यावर हल्ला केला. या हल्ल्यात त्यांचा जागीच मृत्यू झाला. मृत्यूच्या धक्क्यातून सावरण्याआधीच कुटुंबीयांसमोर अंत्यसंस्काराचा प्रश्न उभा राहिला. एका कुटुंबीयाला कायमस्वरूपी शासकीय नोकरी आणि २५ लाख रुपयांची मदत अथवा नोकरी न दिल्यास एक कोटी रुपयांची भरपाई अशी मागणी ग्रामस्थांनी लावून धरली. शवविच्छेदन झाल्यानंतरही मृतदेह स्वीकारण्यास कुटुंबीयांनी नकार दिला. प्रशासनाने आंदोलनाच्या सुरुवातीच्या काळात ठोस निर्णय घेतला नाही. त्यामुळे संताप वाढत गेला. वर्ध्यात महात्मा गांधी पुतळ्याजवळ ठिय्या आंदोलन करण्यात आले. तरीही पालकमंत्री किंवा जिल्हाधिकारी आंदोलनस्थळी वेळेत पोहोचले नाहीत. प्रशासनाची ही उदासीनता ग्रामस्थांच्या जखमेवर मीठ चोळणारी ठरली. रविवारी मध्यरात्री जिल्हाधिकारी गावात पोहोचले. रात्री अकरा ते दोन या वेळेत मध्यस्थीचा प्रयत्न करण्यात आला. मात्र आंदोलन सुरू असताना वेळ दिला नाही आणि आता मध्यरात्री का येता असा प्रश्न करत ग्रामस्थांनी त्यांना रोखले. प्रशासनाला दिवसा गावकऱ्यांचा आवाज ऐकू आला नाही आणि मध्यरात्री चर्चेसाठी धाव घ्यावी लागली यावरून परिस्थिती किती चिघळली आहे हे स्पष्ट झाले. आज मंगळवारी दुपारी बारा वाजता वर्ध्यातील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर पुन्हा ठिय्या आंदोलन होणार आहे. आमदार रोहित पवार यांच्या उपस्थितीत होणाऱ्या या आंदोलनात खासदार अमर काळे. राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष अतुल वांदिले. अभ्युदय मेघे. शेखर शेंडे. मनोज चांदूरकर यांच्यासह अनेक नेते सहभागी होणार आहेत. मागण्या पूर्ण होईपर्यंत आंदोलन सुरूच ठेवण्याचा निर्धार खासदार अमर काळे यांनी व्यक्त केला आहे. दरम्यान रायपूरमध्ये शेखर शेंडे. नितेश कराळे. समीर देशमुख यांच्यासह स्थानिक नेते तळ ठोकून आहेत. सहा दिवसांच्या आंदोलनामुळे गावातील सण उत्सवही बंद राहिले. बैलपोळा. तान्हापोळा आणि गणेशोत्सवाचा उत्साह मावळला. गावात शुकशुकाट पसरला.

राजकीय वलय येण्यापूर्वी प्रशासनाने संवेदनशीलतेने निर्णय घेतला असता तर मृतदेहावरून एवढा संघर्ष पेटलाच नसता. आता जवळपास एकशे चाळीस तासांनी अंत्यसंस्काराचे संकेत मिळत असले तरी भगवान धुर्वे यांच्या मृतदेहाने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर उपस्थित केलेले प्रश्न इतक्या सहजासहजी संपणार नाहीत. वाघाचा हल्ला एका शेतकऱ्याचा जीव घेऊन गेला. मात्र त्यानंतरच्या प्रशासनाच्या विलंबाने संपूर्ण गावाचा संयम आणि संताप पेटवून दिला आहे.

# बाप्पाच्या आगमनाने उत्साहाचा वर्षाव

**पावसाच्या सरींनी बळीराजाला दिलासा**
**ढोल ताशांच्या गजरात गणरायाचे घरोघरी आगमन**

**वर्धा जनमाध्यम.** दीर्घकाळ पावसाने दडी मारल्याने सण उत्सवांवर निरुत्साहाचे सावट होते. मात्र नंदी पोळ्यापासून जिल्ह्यात पावसाने हजेरी लावताच गौरी गणपतीच्या उत्साहाला नवे बळ मिळाले. सोमवारी लाडक्या गणरायाचे ढोल ताशांच्या गजरात फटाक्यांच्या आतषबाजीत आणि मोरयाच्या जयघोषात घरोघरी तसेच सार्वजनिक मंडळांत भक्तिभावाने आगमन झाले. कुंभारपुरा बॅचलर रोड साई मंदिर रोड आणि मगन संग्रहालय परिसरात गणेशमूर्ती खरेदीसाठी सकाळपासूनच भक्तांची गर्दी झाली होती. सायंकाळपर्यंत जिल्ह्यात २६९ सार्वजनिक गणेश मंडळांत गणरायाची स्थापना झाली. उत्सवासाठी पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. नगरपालिकेने पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचे आवाहन केले असून विविध ठिकाणी विसर्जन कुंडांची व्यवस्था केली आहे. भक्तीचा उत्सव निसर्गाच्या संवर्धनासोबत साजरा करण्याचा संदेश यानिमित्ताने दिला जात आहे.

# रायपूरमध्ये पुन्हा वाघिणीचा धुमाकूळ; बकरीचा फडशा

**नागरिकांत भीतीचे वातावरण**

**सहा दिवसांपासून वाघिणीचा गाव परिसरात मुक्काम;**

**सेलू जनमाध्यम** : रायपूर जंगली परिसरात वाघिणीचा धुमाकूळ सुरूच असून आज पुन्हा एका बकरीचा फडशा पाडल्याने ग्रामस्थांमध्ये दहशत पसरली आहे. सोमवारी सायंकाळी साडेपाचच्या सुमारास आमगाव रायपूर येथील शेतकरी देवचंद उईके हे शेतातून बकऱ्या चराई करून परतत होते. यावेळी दबा धरून बसलेल्या वाघिणीने अचानक बकरीवर झडप घेतली.

हल्ल्यात बकरीचा जागीच फडशा पडला. वाघिणीने बकरीला ठार केल्यानंतर ती परिसरातच दबा धरून असल्याचे सांगितले जात आहे.

गेल्या सहा दिवसांपासून ही वाघीण रायपूर जंगली गाव परिसरात ठाण मांडून बसली आहे. सातत्याने होत असलेल्या हल्ल्यांमुळे शेतकरी आणि ग्रामस्थांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला आहे. वन विभागाने तातडीने ठोस उपाययोजना करून वाघिणीचा बंदोबस्त करावा अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

# दारूच्या नशेत घरातून निघाला पती बेपत्ता झाल्याने पत्नीची पोलिसांत धाव

**वर्धा जनमाध्यम** . पोळा सणाच्या काळात दारूच्या नशेत घरातून बाहेर पडलेला ३२ वर्षीय व्यक्ती बेपत्ता झाल्याने कुटुंबीयांमध्ये चिंता निर्माण झाली आहे. अज्ञात व्यक्तीने फसवणुकीच्या मार्गाचा अवलंब करून पतीचे अपहरण केले असावे असा संशय व्यक्त करीत पत्नीने वर्धा शहर पोलिसांत तक्रार दिली आहे.

समीर गुरनुले वय ३२ वर्षे रा. श्रीराम कॉलनी बोरगाव मेघे असे बेपत्ता व्यक्तीचे नाव आहे. त्यांची पत्नी अश्विनी समीर गुरनुले वय ३० वर्षे यांनी नातेवाईक निकिता लोनबेलेंसह पोलिसांत तक्रार दिली.

तक्रारीनुसार समीर गुरनुले हे दारूचे सेवन करतात. ११ सप्टेंबर रोजी पोळा सण असल्याने ते दोन दिवसांपासून दारू पीत होते. १२ सप्टेंबर रोजी सकाळी साडेआठ वाजता ते मुलीला सेंट अँथोनी शाळेत सोडण्यासाठी गेले होते. दुपारी साडेबारा वाजता ते दारूच्या नशेत घरी परतले. जेवण केल्यानंतर ते झोपले.

दुपारी चार वाजता पत्नीने मुलीला शाळेतून आणण्यासाठी जाण्याबाबत विचारले असता समीर उठले आणि दुकानातील ५०० रुपये घेऊन पायी घराबाहेर पडले. मुलीचा सायंकाळी पाच वाजता ट्युशन वर्ग असल्याने पत्नीने समीर यांच्या मोबाईलवर संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. मात्र मोबाईल घरातच असल्याचे आढळले.

समीर बराच वेळ घरी परतले नाहीत. त्यामुळे पत्नीने मित्र आणि नातेवाईकांकडे चौकशी केली. मात्र त्यांच्याबाबत कोणतीही माहिती मिळाली नाही. अखेर १३ सप्टेंबर रोजी पोलिसांत तक्रार देण्यात आली.

समीर यांची उंची पाच फूट सहा इंच असून बांधा सडपातळ आहे. वर्ण गौर असून अंगात निळ्या रंगाचे टी शर्ट आणि खाकी रंगाची थ्री फोर्थ पॅन्ट होती. पायात पॅरागॉन कंपनीच्या स्लीपर होत्या. वर्धा शहर पोलिसांनी याप्रकरणी कलम १३८ बीएनएस अंतर्गत नोंद केली असून पुढील तपास सुरू आहे.

# रायपूर प्रकरणात प्रशासनाची सावध भूमिका मानवाधिकार आयोगाच्या मार्गदर्शनानुसार कारवाई

**जिल्हाधिकारी यांनी पत्रकार परिषदेत दिली माहिती, मागण्यांवर शासनाकडे प्रस्ताव तर अंत्यसंस्कारासाठी प्रशासनाची विनंती**

**वर्धा जनमाध्यम :** सेलू तालुक्यातील रायपूर जंगली येथे वाघाच्या हल्ल्यात भगवान चंद्रभान धुर्वे या शेतकऱ्याचा मृत्यू होऊन पाच दिवस उलटत आले असतानाही मृतदेहावर अंत्यसंस्कार झालेले नाहीत. मागण्यांचा तिढा कायम असताना मृतदेह तब्बल ८४ तासांपासून सेलू येथील शवागारात ठेवण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी वान्मथी सी. यांनी सोमवारी पत्रकार परिषद घेऊन प्रशासनाची भूमिका स्पष्ट केली.

९ सप्टेंबरला सायंकाळी भगवान धुर्वे यांचा वाघाच्या हल्ल्यात मृत्यू झाला. दुसऱ्या दिवशी शवविच्छेदन करून मृतदेह अंत्यसंस्कारासाठी गावात आणण्यात आला. शासनाकडून अंत्यसंस्कारासाठी देण्यात आलेली २५ हजार रुपयांची तातडीची मदतही कुटुंबीयांनी स्वीकारली. मात्र त्यानंतर ग्रामस्थांनी कुटुंबातील एका व्यक्तीस शासकीय नोकरी आणि एक कोटी रुपये नुकसानभरपाईची मागणी लावून धरली. त्यामुळे मृतदेह पुन्हा सेलू रुग्णालयातील शवागारात नेण्यात आला. दरम्यान मृतदेह दोन वेळा बाह्य वातावरणात आणण्यात आल्याने विघटनाचा धोका वाढल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले.

मागण्यांवर शासनाकडे प्रस्ताव

ग्रामस्थांच्या मागण्यांच्या अनुषंगाने बोर व्याघ्र प्रकल्पाने वरिष्ठ स्तरावर प्रस्ताव पाठविला आहे. वाघाला जेरबंद करण्यासाठी मुख्य वन्यजीव रक्षक नागपूर यांची परवानगी घेण्याची प्रक्रिया सुरू असून परिसरात ट्रॅप कॅमेरे आणि गस्त वाढविण्यात आली आहे. संबंधित नियतक्षेत्रात हंगामी मजूरही वाढविण्यात येणार आहेत.

मृतदेहाच्या सन्मानाचे आवाहन

जिल्हाधिकारी वान्मथी सी. यांनी राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाच्या निर्देशांचा संदर्भ देत मृतदेहाची विटंबना होऊ नये आणि मृतदेहाचा सन्मान राखला जावा, असे स्पष्ट केले. शवागारात मृतदेह बराच काळ ठेवल्याने ग्रामस्थांनी अंत्यसंस्कार लवकर करावेत, अशी विनंती प्रशासनाने केली आहे. जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. स्वप्नील बेले यांनीही मृतदेह ठराविक कालावधीपर्यंतच सुरक्षित ठेवता येतो. त्यानंतर विघटन प्रक्रिया सुरू होते, असे सांगितले.

पुनर्वसनाचाही प्रस्ताव

शेतकऱ्यांना शेतात जाण्यासाठी मोठा रस्ता, गाव व रस्त्यालगत स्वच्छता, वाघ जेरबंद झाल्यानंतर ग्रामस्थांना माहिती देऊन प्रत्यक्ष दाखविणे, तसेच मृताच्या कुटुंबातील एका व्यक्तीस विशेष योजनेतून सफारी वाहन देण्याचे आश्वासन देण्यात आले आहे. रायपूर जंगली गावाच्या पुनर्वसनाचा प्रस्तावही शासनाकडे पाठविण्यात येणार असल्याचे बोर व्याघ्र प्रकल्पाचे उपसंचालक मंगेश ठेंगडी यांनी सांगितले.

दरम्यान, ग्रामस्थांच्या आंदोलनाला खासदार अमर काळे यांनीही पाठिंबा दिला आहे. त्यामुळे मृतदेहाचा प्रश्न आणि ग्रामस्थांच्या मागण्यांचा तिढा आता प्रशासनासमोर गंभीर आव्हान ठरला आहे.

# भरती प्रक्रियासंबंधी अभिप्राय पाठवा

विभागीय आयुक्त विजयालक्ष्मी बिदरी यांचे आवाहन

**भरती परीक्षा पद्धतीच्या सुधारणांसाठी उच्चस्तरीय समिती १६ सप्टेंबरला नागपुरात**

**नागपूर जनमाध्यम** : भरती परीक्षा पद्धतीच्या सुधारणांसाठी उच्चस्तरीय समितीचा नागपूर येथील संवाद कार्यक्रमाच्या अनुषंगाने समितीचे अध्यक्ष व सदस्य बुधवार, दि. १६ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता नियोजन भवन, सदर पोलीस स्टेशनच्या मागे, सिव्हिल लाइन्स, नागपूर येथे भेट देणार आहेत. राज्यातील स्पर्धा परीक्षार्थींच्या भवितव्याशी संबंधित असलेल्या या प्रक्रियेत नागपूर महसूल विभागातील सर्व संबंधित घटकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून आपल्या सूचना व अभिप्राय समितीसमोर सादर करावेत, असे आवाहन विभागीय आयुक्त विजयालक्ष्मी बिदरी यांनी केले.

विभागीय आयुक्त विजयालक्ष्मी बिदरी यांनी आज विभागीय आयुक्त कार्यालयातील सभाकक्षात याबाबत आढावा बैठक घेतली, त्यावेळी त्या बोलत होत्या. जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, अपर आयुक्त प्रदीप कुलकर्णी, जिल्हा शल्य चिकित्सक निवृत्ती राठोड तसेच माहिती व जनसंपर्क कार्यालयाचे संचालक डॉ. गणेश मुळे दूरदृष्य प्रणालीद्वारे उपस्थित होते. यावेळी मनपा तसेच संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

राज्यातील शासकीय भरती परीक्षा अधिक सुरक्षित, पारदर्शक, विश्वासार्ह व उमेदवाराभिमुख करण्यासाठी तसेच परीक्षांमधील गैरप्रकारांना प्रतिबंध घालण्यासाठी महाराष्ट्र शासनाने उच्चस्तरीय समिती गठित केली आहे. या समितीनुसार, राज्यातील प्रत्येक महसुली विभागातील विद्यार्थी, स्पर्धा परीक्षा परीक्षार्थी, पालक, शिक्षक, शैक्षणिक संस्थांचे प्रतिनिधी, कोचिंग क्लासेस, अभ्यासिका चालक, लोकप्रतिनिधी, नागरिक आणि अन्य संबंधित घटकांकडून परीक्षा पद्धतीतील सुधारणांसाठी सूचना व अभिप्राय मागविण्यात आले आहेत. या अनुषंगाने समितीचे अध्यक्ष व सदस्य बुधवार, दि. १६ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता नियोजन भवन, सिव्हिल लाईन्स येथे कामकाजाच्या अनुषंगाने भेट देणार आहेत. त्यापूर्वी नागपूर विभागातील संबंधित घटकांकडून सूचना व अभिप्राय संकलित करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर येथे विशेष कक्ष स्थापन करण्यात आला आहे. हा कक्ष मंगळवार, दि. १५ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजेपर्यंत कार्यरत राहणार आहे.

सूचना व अभिप्राय निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर यांच्याकडे सादर करता येतील. प्रत्यक्ष सूचना निवासी उपजिल्हाधिकारी यांची स्वीय शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर येथे स्वीकारण्यात येतील. तसेच nagpur-exam reformstaskforce@maharashtra.gov.in या ई-मेलवरही लेखी अभिप्राय पाठविता येणार आहे. जिल्हाधिकारी कार्यालयातील विशेष कक्षात प्रत्यक्ष उपस्थित राहणे शक्य नसलेल्या नागरिकांनी विहित मुदतीत ई-मेलद्वारे आपले अभिप्राय सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

विद्यमान परीक्षा प्रणाली व विविध विभाग, प्राधिकरणे तसेच परीक्षा घेणाऱ्या संस्थांच्या कार्यपद्धतीचा आढावा, परीक्षा अधिक सुरक्षित, निष्पक्ष, पारदर्शक व उमेदवाराभिमुख करण्यासाठी आवश्यक उपाययोजना, प्रश्नपत्रिका तयार करण्यापासून निकाल प्रक्रियेपर्यंतची सुरक्षा, प्रश्नपत्रिकेचे मॉडरेशन, डिजिटल अथवा मुद्रित वितरण, गोपनीय वाहतूक, परीक्षा केंद्रांचे व्यवस्थापन, प्रतिसाद नोंदणी आणि मूल्यांकन याबाबत सूचना अपेक्षित आहेत.

तसेच बायोमेट्रिक प्रमाणीकरण, प्रवेश नियंत्रण, ऑडिट ट्रेल्स आणि सीसीटीव्ही देखरेख यांसारख्या माहिती तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर, पेपरफुटी, गोपनीयतेचा भंग, तोतया उमेदवार, संगनमत आणि इलेक्ट्रॉनिक उपकरणांचा गैरवापर रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय व उत्तरदायित्व निश्चित करणे याबाबतही अभिप्राय मागविण्यात आले आहेत. इतर राज्ये अथवा देशांतील यशस्वी व आधुनिक परीक्षा पद्धतींचा अभ्यास, परीक्षा केंद्रांसाठी किमान पायाभूत व सुरक्षा मानके, जिल्हाधिकारी कार्यालय, पोलीस यंत्रणा, शिक्षण विभाग आणि परीक्षा संस्थांमधील समन्वय तसेच उमेदवारांसाठी जलद व पारदर्शक तक्रार निवारण प्रणाली याबाबतही सूचना देता येणार आहेत.

जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत प्राप्त होणाऱ्या सर्व सूचना व अभिप्रायांचे संकलन करून ते शासनाच्या उच्चस्तरीय समितीकडे सादर करण्यात येणार आहेत. समिती या सूचना व शिफारशींचा सखोल अभ्यास करून राज्य शासनाला सर्वसमावेशक अंतिम अहवाल सादर करणार आहे. यासाठी सर्व संबंधित घटकांनी आपल्या सूचना व अभिप्राय समिती समोर सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# महाप्रसादासाठी घरगुती गॅसला नो एंट्री व्यावसायिक सिलेंडरच सक्तीचा

**वर्धा जनमाध्यम** : गणेशोत्सवाच्या काळात महाप्रसाद आणि भोजनासाठी घरगुती गॅस सिलेंडरचा वापर करणाऱ्या मंडळांना आता लगाम बसणार आहे. सार्वजनिक गणेशोत्सव तसेच अन्य सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये महाप्रसाद तयार करण्यासाठी केवळ व्यावसायिक गॅस सिलेंडरच वापरणे बंधनकारक करण्यात आले आहे. घरगुती गॅसचा व्यावसायिक वापर रोखण्यासाठी जिल्हा प्रशासनाने जिल्ह्यातील सर्व तहसीलदारांना कडक निर्देश दिले आहेत.

गणेश मंडळांकडून महाप्रसादासाठी मोठ्या प्रमाणात स्वयंपाक केला जातो. मात्र काही ठिकाणी घरगुती सिलेंडरचा वापर होत असल्याने प्रशासनाने सुरक्षेचा मुद्दा गांभीर्याने घेतला आहे. मोठ्या भांड्यांसाठी घरगुती सिलेंडरचा वापर केल्यास गॅसचा दाब आणि बर्नरच्या क्षमतेतील फरकामुळे आग किंवा स्फोटाचा गंभीर धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे संभाव्य जीवित आणि वित्तहानी टाळण्यासाठी व्यावसायिक सिलेंडरचा वापर अनिवार्य करण्यात आला आहे.

महाप्रसादासाठी परवानगी देताना संबंधित परवानगीपत्रात केवळ व्यावसायिक सिलेंडर वापरण्याची अट स्पष्टपणे नमूद करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. स्थानिक स्वराज्य संस्था आणि पोलीस प्रशासनाने गणेश मंडळांना याबाबत पूर्वसूचना देऊन संयुक्तपणे जनजागृती करावी, असेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे. घरगुती सिलेंडरचा सार्वजनिक किंवा व्यावसायिक वापर आढळल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते. अपघात झाल्यास संबंधित मंडळाच्या पदाधिकाऱ्यांवर फौजदारी कारवाईचीही शक्यता आहे.

जिल्हा पुरवठा अधिकारी आनंद पडोळे यांनी सर्व तहसीलदारांना आपल्या तालुक्यातील गणेश मंडळांना याबाबत सूचित करून केलेल्या कारवाईचा अहवाल जिल्हा कार्यालयास सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.

सुरक्षित उत्सवासाठी प्रशासनाची हाक

ग्राहक दक्षता कल्याण फाऊंडेशनचे संस्थापक व राष्ट्रीय अध्यक्ष नितीन सोळंके यांनी प्रशासनाच्या निर्णयाचे स्वागत केले. गणेशोत्सव हा आनंदाचा आणि पवित्र सण असून महाप्रसादाच्या आयोजनात सुरक्षेशी तडजोड होऊ नये. घरगुती सिलेंडरऐवजी नियमांचे पालन करून व्यावसायिक सिलेंडरच वापरावा, असे आवाहन त्यांनी गणेश मंडळांना केले.

■ मंगळवार १५ सप्टेंबर २०२६

paper www.janmadhyam.com

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

### सामूहिक अत्याचार, हत्या, गुन्हेगारी कट...; हादरवून टाकणारे आरोप

# सीबीआयच्या FIR मध्ये आदित्य ठाकरे, ऊद्धव ठाकरेंसह 33 जणांची नावे

**मुंबई/प्रतिनिधी :**दिशा सालियन मृत्यू प्रकरणात सीबीआयने अखेर गुन्हा दाखल केला. गुन्हेगारी कट, सामूहिक बलात्कार, हत्या, पुरावे नष्ट करणे आणि आरोपीला शिक्षा होण्यापासून वाचवण्यासाठी खोटी माहिती देणे, यासह इतर आरोप करण्यात आले आहेत. या एफआरआयमध्ये माजी ऊद्धव ठाकरे, माजी मंत्री आदित्य ठाकरे, माजी गृहमंत्री अनिल देशमुख, मुंबईचे माजी पोलीस आयुक्त परमबीर सिंह, सचिन वाझे, अभिनेता डिनो मोरिया यांच्यासह ३३ पेक्षा अधिक लोकांची नावे आहेत. हा गुन्हा दाखल झाल्यानंतर राजकीय आणि मुंबई पोलीस दलात खळबळ उडाली आहे.

मयत अभिनेता सुशांत सिंह राजपूत यांची माजी मॅनेजर दिशा सालियन मृत्यू प्रकरण मुंबई उच्च न्यायालयात सुनावणीसाठी आहे. या प्रकरणात न्यायालयाने सीबीआयला गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले. त्यानंतर सीबीआयने गुन्हा दाखल केला असून, यात माजी मुख्यमंत्री, माजी गृहमंत्री, पोलीस दलातील अनेक अधिकारी, डाक्टर आणि फारेन्सिक लॅबमधील अधिका-यांचीही नावे आहेत.

**सीबीआयने एफआरआयमध्ये काय म्हटले आहे?**



दिशा सालियन प्रकरणात दाखल करण्यात आलेल्या एफआरआयमध्ये सीबीआयने म्हटले आहे की, तत्कालीन मुख्यमंत्री ऊद्धव ठाकरे, आदित्य ठाकरे यांचे वडील आणि इतरांनी देखील या कटात आणि त्यानंतर प्रकरण दाबण्याच्या कृत्यामध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे.

**गुन्हा दाबण्यासाठी सरकारी पैसा आणि अधिका-यांचा गैरवापर केला गेला**

संबंधित सार्वजनिक सेवक आणि पोलीस अधिकारी देखील केसचे कागदपत्रे, फाईल्स आणि इतर सार्वजनिक नोंदी नष्ट करणे किंवा दडपून टाकणे, अधिकृत नोंदींमध्ये फेरफार करणे आणि बेकायदेशीर कारणांसाठी व गुन्हेगारांना वाचवण्यासाठी सरकारी पैशांचा, शासकीय मनुष्यबळ आणि पोलीस यंत्रणेचा गैरवापर करणे यासाठी तपासासाठी पात्र आहेत, असा गंभीर ठपका सीबीआयने माजी मुख्यमंत्री ऊद्धव ठाकरे, माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांच्यासह इतरांवर ठेवला आहे.

सीबीआयने म्हटले आहे की, मुख्य गुन्हा, गुन्हेगारी कट, त्यानंतर रचलेली आणि पसरवलेली आत्महत्येची खोटी कथा, आणि पुराव्यांचे दडपण, पुरावे नष्ट करणे किंवा छेडछाड करणे यांच्याशी संबंधित ज्या व्यक्तींच्या भूमिकेची चौकशी करणे आवश्यक आहे, त्यामध्ये आदित्य ठाकरे यांच्यासह इतरांच्या नावांचा ऊल्लेख करण्यात आला आहे.

**दिशा सालियन मृत्यू: सीबीआयच्या एफआरआयमध्ये कोणाची नावे?**

सीबीआयने म्हटले आहे की, ज्याची चौकशी करणे गरजेचे आहे, त्यात आदित्य ठाकरे, रोहन राय, डिनो मोरिया, सूरज पांचोली, आदित्य ठाकरे यांचे अंगरक्षक, रिया चक्रवर्ती, शोविक चक्रवर्ती, सचिन वाझे, परमबीर सिंग, डीसीपी विशाल ठाकूर, ऊद्धव ठाकरे, अनिल देशमुख, एपीआय अशोक देवढे, पीआय जगदेव कलापड, पीआय शैलेंद्र नगरकर, पीआय चिमाजी आढाव, पीआय अर्जुन राजाणे, मालवणी पोलीस ठाण्याचे संबंधित अधिकारी, ऊशिरा झालेल्या शवविच्छेदनाशी संबंधित डाक्टर आणि कर्मचारी, डा. संजय जाधव, न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा, कलिनाचे संबंधित अधिकारी (ज्यात साहाय्यक रासायनिक विश्लेषक एन. पी. भाले यांचा समावेश आहे), तत्कालीन संबंधित पीआय आणि इतर पोलीस अधिकारी; रीजंट गॅलेक्सी इमारतीचे सुरक्षा रक्षक (ज्यात सुशील कुमार यादव आणि शिवमुराद गौतम ऊर्फ मुन्ना यांचा समावेश आहे); प्रीती राणे, प्रवीण राणे, अंकिता सातूर, इंद्रनील वैद्य, दीप अजमेरा, हिमांशू शिखरे, रेशा पडवळ, सतवंत सिंग, नावेद मुजावर आणि प्रियेश राणे; एसआयटीचे वरिष्ठ सदस्य (ज्यात ज्यांच्या देखरेखीखाली दोषपूर्ण तपास किंवा चौकशी झाली त्या सर्व वरिष्ठ पोलीस अधिका-यांचा समावेश आहे); आणि या गुन्ह्यात व त्यानंतरच्या प्रकरण दडपण्याच्या कृत्यात सहभागी असलेल्या इतर अज्ञात व्यक्तींचा समावेश आहे.

## मृत्यूनंतरही सुटका नाही!

## सालईटोल्यात बांबूला खाट बांधून मृतदेह खांद्यावरून नेण्याची वेळ

**गडचिरोली/प्रतिनिधी :** रस्ता नसल्याची झळ केवळ आजारी आणि वृद्धांनाच सोसावी लागते असे नाही, तर मृत्यूनंतरही त्यातून सुटका होत नसल्याचे धक्कादायक वास्तव धानोरा तालुक्यातील सालईटोला येथे समोर आले आहे. गावात पक्का रस्ता नसल्याने एका वृद्धाचा मृतदेह अंत्यसंस्कारासाठी नेताना नातेवाईकांना खाटेला दोरीने बांधून दोन बांबूंच्या सहाय्याने तो खांद्यावर घ्यावा लागला. चिखल आणि पाण्यातून सुमारे दीड ते दोन किलोमीटरची पायपीट केल्यानंतर मृतदेह मुख्य रस्त्यापर्यंत पोहोचविण्यात आला. स्वातंत्र्याच्या ७८ वर्षांनंतरही गावक-यांच्या वाट्याला आलेली ही परिस्थिती प्रशासनाच्या विकासाच्या दाव्यांवर प्रश्नचिन्ह ऊपस्थित करणारी आहे. धानोरा तालुक्यातील फाशीटोला येथील अंतराम तुलावी (५५) यांची प्रकृती बिघडल्याने कुटुंबीयांनी त्यांना गेल्या आठवड्यात गडचिरोली येथील जिल्हा रु ग्णालयात ऊपचारासाठी दाखल केले होते. ऊपचारानंतर त्यांना रु ग्णालयातून सुटी देण्यात आली. त्यानंतर ते फाशीटोला येथे न जाता सालईटोला येथे भावाकडे मुक्कामी होते. दरम्यान, १३ सप्टेंबर रोजी त्यांची प्रकृती अचानक खालावली आणि त्यातच त्यांचा मृत्यू झाला. तुलावी यांच्यावर फाशीटोला येथे अंत्यसंस्कार करायचे असल्याने नातेवाईकांसमोर मृतदेह गावाबाहेर नेण्याचे आव्हान ऊभे राहिले. सालईटोला गावाला अद्याप पक्का रस्ता नसल्याने वाहन गावापर्यंत पोहोचू शकत नाही. त्यामुळे मृतदेह खाटेला दोरीने बांधून दोन बांबूंच्या सहाय्याने खांद्यावर घेण्यात आला. चिखलाने माखलेल्या शेतरस्त्यातून सुमारे दीड ते दोन किलोमीटरची पायपीट करत नातेवाईकांनी मृतदेह मुरु मगावजवळील मुख्य रस्त्यापर्यंत आणला. त्यानंतर वाहनाने मृतदेह फाशीटोला येथे नेण्यात आला. सायंकाळी त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. दरम्यान, या घटनेबाबत धानोरा तहसीलदार गणेश माळी यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता प्रतिसाद मिळाला नाही.

**निवेदनांनंतरही रस्त्याचा प्रश्न कायम-** सालईटोला येथील ग्रामस्थांनी पक्क्या रस्त्यासाठी ग्रामपंचायत, पंचायत समिती तसेच लोकप्रतिनिधींकडे अनेकदा मागण्या केल्या आहेत. विविध स्तरांवर निवेदने देउनही वर्षानुवर्षे रस्त्याचा प्रश्न कायम आहे. गावातील एखादी व्यक्ती आजारी पडली किंवा मृत्यू झाला, तरी तिला शेतरस्त्यानेच गावाबाहेर आणावे लागते. त्यामुळे प्रशासन आणखी किती काळ दुर्लक्ष करणार, असा संतप्त सवाल ग्रामस्थांकडून ऊपस्थित केला जात आहे. आजारी व्यक्तीला रु ग्णालयापर्यंत पोहोचविण्यासाठी खाटेची कावड आणि मृत्यूनंतर अंत्यसंस्कारासाठीही कावड, ही परिस्थिती बदलणार कधी, असा सवाल सालईटोल्यातील घटनेनंतर पुन्हा ऐरणीवर आला आहे.

## गणेशोत्सवाच्या निमित्ताने ठाकरे बंधू एकत्र; ऊद्धव ठाकरे सहकुटुंब राज ठाकरेंच्या 'शिवतीर्थ'वर!

*शिवसेना (ठाकरे गट) पक्षाचे प्रमुख आणि महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री ऊद्धव ठाकरे यांनी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या दादर येथील 'शिवतीर्थ' या निवासस्थानी भेट दिली. गणेशोत्सवाचे औचित्य साधत ऊद्धव ठाकरे यांनी सहकुटुंब राज ठाकरेंच्या घरच्या गणपतीचे दर्शन घेतले. या प्रसंगी ऊद्धव ठाकरे यांच्यासोबत त्यांच्या पत्नी रश्मी ठाकरे आणि आमदार आदित्य ठाकरे ऊपस्थित होते. राज ठाकरे यांनी ठाकरे कुटुंबाचे स्वागत केले. त्यानंतर दोन्ही नेत्यांनी एकत्र येउन बाप्पाची आरती केली. राज ठाकरे यांनी तीन वर्षांपूर्वी दादर येथील आपल्या जुन्या कृष्णकुंज या निवासस्थानातून नव्या 'शिवतीर्थ' बंगल्यात वास्तव्य सुरू केले. अत्यंत आलिशान आणि आकर्षक सजावटीमुळे 'शिवतीर्थ' हे राजकीय वर्तुळात सातत्याने चर्चेचा विषय ठरले आहे. गेल्या वर्षी गणेशोत्सवाच्या निमित्ताने ऊद्धव ठाकरे यांनी पहिल्यांदाच या नव्या निवासस्थानी पाउल ठेवले होते. या भेटीनंतर आगामी महापालिका निवडणुकांसाठी दोन्ही पक्षांत युतीची घोषणा झाली. दोन्ही ठाकरे बंधू एकत्र आल्याने राजकीय वर्तुळात तसेच सोशल मीडियावर या भेटीची आणि त्यांच्यातील स्नेहबंधांची जोरदार चर्चा सुरू आहे.*

## वसुंधरा राजेंच्या बालेकिल्ल्यात भाजपला झटका! झालावाड नगरपालिकेत काँग्रेसचा दणदणीत विजय

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** २०२६ च्या राजस्थान स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या निकालांमध्ये काँग्रेस पक्ष सत्ताधारी भाजपला कडवी झुंज देत असल्याचे दिसत आहे. भाजपच्या ज्येष्ठ नेत्या आणि माजी मुख्यमंत्री वसुंधरा राजे यांचा बालेकिल्ला असलेल्या झालावाडमध्ये भाजपचा पराभव झाला आहे, तर काँग्रेसने दणदणीत विजय मिळवला.झालावाड जिल्ह्यातील आठपैकी चार नगरपालिकांमध्ये काँग्रेसने पूर्ण बहुमत मिळवले आहे. झालावाड नगर परिषदेत भाजपचा पराभव झाला असून काँग्रेसने अनेक वर्षानंतर या नगरपालिकेवर विजय मिळवला आहे.

आम आदमी पक्ष किंगमेकर

झालावाड नगर परिषदेव्यतिरिक्त, काँग्रेसने भवानी मंडी, खानपूर आणि दाग येथेही बहुमत मिळवले. दरम्यान, भाजपला केवळ झालारापाटन, अक्लेरा आणि मनोहरथाना नगरपालिकांमध्येच विजय मिळवता आला. झालावाड जिल्ह्यातील पिडावा नगरपालिकेत कोणालाही स्पष्ट जनादेश मिळाला नाही, परंतु आम आदमी पार्टी किंगमेकर म्हणून उदयास आली.

झालावाड नगर परिषदेच्या ४५ प्रभागांच्या निकालांमध्ये काँग्रेस पक्षाने दणदणीत कामगिरी करत विजय मिळवला आहे. परिषदेत काँग्रेसच्या नेतृत्वाखालील सरकार स्थापन होणे निश्चित आहे. झालावाड नगर परिषदेच्या निवडणुकीत काँग्रेसने २९ नगरसेवक जागा जिंकल्या. भाजपने फक्त१३ प्रभाग जिंकले, अपक्ष ऊमेदवारांनी दोन जागा जिंकल्या, तर आम आदमी पक्षाने एक जागा जिंकली.झालावाड नगर परिषदेवर पूर्वी भाजपचे मंडळ होते, परंतु काँग्रेस पक्षाने ते ऊलथवून टाकले आहे. झालावाड नगर परिषदेतील विजयामुळे काँग्रेस पक्ष आनंदित झाला असून, याला एक मोठा विजय मानले जात आहे. काँग्रेस पक्ष नगर परिषदेचे अध्यक्ष आणि ऊपाध्यक्ष बनणार आहे. हा भाजपसाठी एक मोठा धक्का मानला जात आहे. झालावाड नगर परिषदेत २९ जागा जिंकून काँग्रेस पक्षाने २३ चा जादुई आकडा सहज ओलांडला आहे, यामुळे झालावाड नगर परिषदेच्या अध्यक्षपदी काँग्रेस पक्षाचे स्थान निश्चित झाले आहे.

अनेक दशकांपासून, राजस्थानमधील झालावाड आणि झालारापाटन हे प्रदेश माजी मुख्यमंत्री वसुंधरा राजे आणि त्यांचे पुत्र, खासदार दुष्यंत सिंह यांचा अभेद्य किल्ला मानला जात होता. या निवडणुकीत ४५ पैकी २९ प्रभागांमध्ये विजय मिळवून काँग्रेसने भाजपचा पराभव केला. झालावाड नगर परिषद हा झालावाड-बारन लोकसभा मतदारसंघाचा भाग आहे. वसुंधरा राजे यांचे पुत्र, दुष्यंत सिंह, येथून पाच वेळा खासदार राहिले आहेत. या आधी राजे स्वत? याच लोकसभा मतदारसंघातून पाच वेळा खासदार होत्या.

## ट्रम्प कर्नाटकची नक्कल करत आहेत?

### शिवकुमार म्हणाले, अमेरिकेपर्यंत काँग्रेसचे मॉडेल कॉपी होतंय

**बंगळूरू/वृत्तसंस्था :**मुख्यमंत्री डी. के. शिवकुमार यांनी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या ५,००० डालरच्या प्रस्तावाला काँग्रेस सरकारच्या हमी योजनांशी जोडले. त्यांनी असा दावा केला की, अमेरिकेत काँग्रेसच्या माडेलची नक्कल केली जात आहे. कर्नाटकचे मुख्यमंत्री डी. के. शिवकुमार यांनी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या एका प्रस्तावासंदर्भात एक दावा केला आहे. काँग्रेस सरकारच्या हमी योजनांची देशभरातील अनेक राज्यांनी कापी केली होती. आता अमेरिकेतही अशाच प्रकारच्या योजनेची चर्चा सुरू आहे, असा दावा त्यांनी केला.प्रत्येक प्रौढ अमेरिकन नागरिकाला ५,००० डालर्स देण्याचा ट्रम्प यांचा प्रस्ताव हा कर्नाटकातीलकाँग्रेस सरकारच्या हमी माडेलसारखाच आहे, असेही ते म्हणाले. महाराष्ट्र, मध्य प्रदेश, राजस्थान आणि बिहार यांनी कर्नाटकाच्या योजना स्वीकारल्या आहेत. आता ट्रम्प त्याच माडेलच्या दिशेने वाटचाल करत आहेत,असेही शिवकुमार म्हणाले.डी.के. शिवकुमार म्हणाले, भाजपने महाराष्ट्रात आमची कापी केली. त्यांनी मध्य प्रदेशात आमची नक्कल केली. त्यांनी राजस्थानात आमची नक्कल केली. त्यांनी बिहारमध्ये आमची नक्कल केली. आता ट्रम्प आमची नक्कल करत आहेत.' मुख्यमंत्री शिवकुमार यांचे हे वक्तव्य, अमेरिकन नागरिकांना ५,००० डॉलर्सचा लाभांश देण्याच्या ट्रम्प यांच्या प्रस्तावाच्या संदर्भात आले आहे. भारतीय रु पयांमध्ये ही रक्कम अंदाजे ४.७९ लाख रु पये आहे. ट्रम्प यांनी हा प्रस्ताव रिपब्लिकन पक्षाच्या अधिवेशनात सादर केला होता.ट्रम्प यांनी म्हटले आहे की, जर नोव्हेंबरमधील निवडणुकीत रिपब्लिकन पक्षाने प्रतिनिधी सभा आणि सिनेट या दोन्ही सभागृहांवर आपले नियंत्रण कायम ठेवले, तर ही रक्कम प्रत्येक प्रौढ अमेरिकन नागरिकाला दिली जाउ शकते.

## दुर्मिळ योगायोग!, चंद्राच्या अगदी जवळ शुक्रता-याचे दर्शन

**मुंबई / प्रतिनिधी-**आकाशात सोमवारी सायंकाळी एक वेगळाच योगायोग पाहायला मिळाला. खगोलप्रेमींचे लक्ष वेधून घेणारे मनोहक दृश्य आकाशात पाहायला मिळाले. आकाशात दिसणा-या नाजूक चंद्रकोरीच्या अगदी जवळ तेजस्वी शुक्र ग्रह चमकत असल्याचे दृश्य सर्वांना पाहता आले. हा योगायोग नागरिकांनी आपल्या मोबाईल कॅमे-यात कैद केला. अनोख्या आकाश दर्शनाने नागरिक आणि खगोलप्रेमींमध्ये कु तुहल वाढलेले पाहायला मिळाले.आकाशात खगोलप्रेमींचे लक्ष वेधून घेणारे मनोहारी दृश्य आज पाहायला मिळाले. आकाशात दिसणा-या नाजूक चंद्रकोरीच्या अगदी जवळ तेजस्वी शुक्र ग्रह चमकत असल्याचे दृश्य नागरिकांनी आपल्या मोबाईल कॅमे-यात टिपले. १४ सप्टेंबर रोजी चंद्र आणि शुक्र ग्रहाची जवळची युती झाली. या खगोलीय घटनेमुळे सूर्यास्तानंतर पश्चिमेकडील आकाशात चंद्रकोर आणि त्याच्या शेजारी चमकणारा शुक्र असा सुंदर नजारा पाहायला मिळाला. विशेष म्हणजे शुक्र हा आकाशातील सर्वाधिक तेजस्वी ग्रहांपैकी एक असल्याने तो चंद्राच्या शेजारी एखाद्या चमकत्या ता-यासारखा स्पष्टपणे दिसत होता.या अनोख्या आकाशदर्शनाने नागरिक आणि खगोलप्रेमींमध्ये कुतूहल निर्माण झाले होते. सोशल मीडियावर या दृश्याचे व्हिडिओ आणि फोटो मोठ्या प्रमाणावर व्हायरल होत आहेत. ठळकपणे दिसणा-या या खगोलीय घटनेने सर्वांचेच लक्ष वेधून घेतले. आकाशात एक मनमोहक खगोलीय दृश्य पाहायला मिळाले. सोमवारी सायंकाळी अतिशय पातळ चंद्रकोर आणि तिच्या जवळ तेजस्वी दिसणारा शुक्र ग्रह यांची सुंदर चंद्र-शुक्र युती आकाशप्रेमींचे लक्ष वेधून घेत होती. नागरिकांना हे सुंदर दृश्य स्पष्ट पाहता आले.

**चंद्र-शुक्र अत्यंत जवळ आल्याने कुतुहल वाढले**

आजच्या या खगोलीय सोहळ्यात चंद्र आणि शुक्र एकमेकांच्या अतिशय जवळ आल्याने हे दृश्य विशेष आकर्षक ठरले. खगोलशास्त्रीय गणनेनुसार दोन्ही वस्तूंचा परस्परातील कोनीय अंतरही अत्यंत कमी होते. चंद्राच्या नाजूक कोरीसोबत तेजस्वी शुक्राची ही जोडी आकाशात काही वेळ दिसल्याने अनेक खगोलप्रेमींनी या सुंदर क्षणाचे छायाचित्रणही केले.

### महागाईची झळ मोदकांनाही;

## प्रसाद महागला

**मुंबई /प्रतिनिधी-**मोठ्या प्रमाणात प्रसाद खरेदी करणा-या भाविकांनीही खरेदीचे प्रमाण कमी केले आहे. गणेश चतुर्थीच्या पार्श्वभूमीवर मोदक अन् मिठाईच्या दुकानांमध्ये नागरिकांची गर्दी वाढली आहे. गणपती बाप्पाला नैवेद्य

दाखवण्यासाठी मोदक, पेढे आणि विविध मिठाई खरेदी केली जात आहे.मात्र, वाढत्या दरांमुळे खरेदीच्या प्रमाणावर परिणाम झाला आहे. पूर्वी पाच ते दहा किलो प्रसाद घेणारे भाविक आता दोन ते तीन किलोवर आले आहेत. घरगुती गणेशोत्सवासाठी किलोभर मिठाई घेणारे ग्राहकही पावशेर किंवा अर्धा किलो खरेदी करत आहेत. मिठाईतील भेसळ आणि निकृष्ट अन्नपदार्थांवर प्रशासनाने कारवाई सुरू केल्याने व्यावसायिकांमध्येही खबरदारीचे वातावरण आहे. अन्न व औषध प्रशासनाच्या तपासणीमुळे मिठाई ऊत्पादक दर्जेदार साहित्य वापरण्यावर भर देत आहेत. सोने, चांदीचा वर्ख असलेल्या मोदकाला भाविकांची मागणी वाढली आहे. सोन्याचा वर्ख असलेले मोदक २७ हजार रु पये प्रति किलो तर चांदीचा वर्ख असलेले मोदक हे २ हजार रु पये किलोने नाशिकमध्ये ऊपलब्ध असून आपल्या लाडक्या गणरायाला नैवेद्य दाखवण्यासाठी भाविकांची सोने, चांदीच्या मोदकांची खरेदी करण्यासाठी गर्दी होत आहे.

## मराठा आंदोलन चिघळण्यामागे सरकारचे षडयंत्र

**मुंबई / प्रतिनिधी-**मनोज जरांगे पाटील यांच्या भाषेवर सत्ताधा-यांकडून होणा-या टीकेला काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी चोख प्रत्युत्तर दिले. शोषितांची भाषा आणि शोषण करणा-यांची भाषा कधीही एक असू शकत नाही. सत्ताधा-यांच्या बोलण्यात नेहमी लपवाछपवी असते. सरकारने आधी तीन वेळा मराठा समाजाला दिलेली आश्वासने जाहीर करावीत, मग इतरांच्या भाषेची समीक्षा करावी.

सध्या राज्यात मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरू न आंदोलन पेटले आहे. मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगे ऊपोषणाला बसले असून सध्या त्यांच्या भाषेवरू न त्यांच्यावर टीका करण्यात येत आहे. याच मुद्द्यावरू न बोलताना काँग्रेसचे नेते हर्षवर्धन सपकाळ म्हणाले,

जातीनिहाय जनगणनेच्या माध्यमातून मराठा आरक्षणाचा प्रश्न अगदी सहज सुटू शकतो. मात्र, विविध

### हर्षवर्धन सपकाळांची सरकारवर टीका

घटकांना न्याय देण्याची राज्य सरकारची राजकीय इच्छाशक्तीच संपली आहे. त्यामुळेच हे आंदोलन जाणीवपूर्वक चिघळवले जात आहे. आंदोलनाच्या ठिकाणी वीज घालवणे, माईक सिस्टीम बंद करणे अशा खोडसाळ कारवाया करू न समर्थकांमध्ये गोंधळ ऊडवण्याचा प्रयत्न सरकार करत आहे. पण असल्या दडपशाहीने मराठा समाजाचा आवाज बंद होणार नाही.

**राज्यात कोरडा दुष्काळ; ५० हजारांची मदत द्या-**सपकाळ म्हणाले, लांबलेल्या पेरण्या आणि पावसाने दिलेल्या ओढीमुळे पिके करपून गेली आहेत. आता पाउस आला तरी खरीप वाचू शकत नाही. सरकारने तात्काळ दुष्काळ जाहीर करू न हेक्टरी ५० हजार रु पयांची सरसकट मदत द्यावी. तसेच कर्जांचे पुनर्गठन न करता संपूर्ण कर्जमाफीचा सुधारित शासन निर्णय काढून रबीसाठी मोफत खते, बियाणे ऊपलब्ध करू न द्यावे.

**एमपीएससी पेपरफुटी मोठे रॅकेट-** एमपीएससीपरीक्षांमधील पेपरफुटी हे एक महाभयंकर रॅकेट आहे. मुख्यमंत्र्यांनी मर्जीतील अध्यक्ष आणि सचिव नेमून हे प्रकरण रफादफा करण्याचा प्रयत्न केला. सचिवांच्या तोंडाला प्रत्यक्ष शाई लावली की नाही, यापेक्षा संपूर्ण प्रकरणातून अध्यक्ष, सचिव आणि मुख्यमंर्त्यांच्या तोंडाला काळे फासले गेले आहे. या प्रकरणाचा ऊच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधीशांमार्फत न्यायालयीन चौकशी करू न दोषींना जन्मठेपेची शिक्षा व्हावी.

**शहांचा मुंबई दौरा म्हणजे मेवा संकल्प अभियान-**पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या वाढदिवसानिमित्त सुरू होणा-या सेवा अभियानावर टीका करताना ते म्हणाले, हा सेवा संकल्प नसून महायुतीचा मेवा संकल्प आहे. आर्थिक राजधानी मुंबईतून भाजपला किती लूट करता येईल आणि कुंभमेळ्याच्या ३५ हजार कोटींमधील वाटप कसे करायचे, याचा हिशोब घेण्यासाठी अमित शहा आले आहेत. त्यांनी हिंमत असेल तर महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्तांसाठी पॅकेज जाहीर करावे.

**गायकवाड विरु द्ध महाले वाद ही नुरा कुस्ती-** बुलढाण्यातील आमदार संजय गायकवाड आणि आमदार श्वेता महाले यांच्यातील संघर्षावर भाष्य करताना, हा वाद जनतेसाठी नसून कोणी किती भ्रष्टाचार करावा आणि कोणी किती दमदाटी करावी, यातून निर्माण झालेली नुरा कुस्ती आहे. एकमेकांच्या घराण्यावर चिखलफेक करणे जिल्ह्याच्या संस्कृतीला घातक आहे.

## भाजपाच्या आमदाराने रस्त्यावरच मागितली भीक

**मुंबई/प्रतिनिधी :** भाजपाचे आमदार पराग शाह यांचा घाटकोपर येथील रस्त्यावर भीक मागतानाचा व्हिडीओ समाजमाध्यमांवर वा-याच्या वेगाने व्हायरल झाला. या व्हिडीओत ते भिका-याच्या वेशात दिसून आल्याने संपूर्ण राज्यभरात मोठी खळबळ ऊडाली. त्यानंतर आमदार पराग शाह यांनी असे का केले? याबाबत सगळीकडेच चर्चा सुरू आली. त्याबाबत खुद्द शाह यांनी भिका-याच्या वेशात फिरण्यामागचे कारण सांगितले. आपल्या गुरु ंच्या आदेशानंतर हा प्रयोग केल्याचे ते म्हणाले. पैसा आणि पद नसताना लोक कसा मान देतात हे जाणून घेण्याचा माझा ऊद्देश होता. भिका-याच्या वेशात गेल्यावर अनेकांनी मला ओळखलेच नाही. लोक तुमच्या रू पाला ओळखतात, तुम्हाला नाही असे स्पष्ट मत शाह यांनी मांडले. भिका-याच्या वेशात आपल्याला कुणी २० रु पये दिले, तर कुणी खाण्याचे पदार्थ दिले, असेही त्यांनी नमूद केले. पराग शाह यांच्या या भूमिकेची सध्या सगळीकडेच चर्चा सुरू आहे.

## 23 ते 25 सप्टेंबरदरम्यान विठ्ठल-रूक्मिणी मंदिर बंद राहणार

**पंढरपूर / प्रतिनिधी-** श्री विठ्ठल व श्री रु क्मिणी मातेच्या मूर्तीचे दीर्घकालीन जतन व संवर्धन करण्यासाठी भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण (एएसआय) आणि राज्य पुरातत्त्व विभागाच्या मार्गदर्शनाखाली संवर्धनाचे काम करण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर २३ ते २५ सप्टेंबरदरम्यान श्री विठ्ठल-रु क्मिणी मंदिर भाविकांच्या मुखदर्शन व पदस्पर्शदर्शनासाठी पूर्णवेळ बंद राहणार आहे. २६ सप्टेंबरपासून दर्शन पूर्ववत सुरू होईल अशी माहिती मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी श्रीकांत यादव यांनी दिली. २२ सप्टेंबर रोजी दिवसभर दर्शन सुरू राहणार असून रात्री दर्शन बंद झाल्यानंतर संवर्धनाच्या प्रत्यक्ष कामास सुरु वात केली जाणार आहे. मूर्तीचे पावित्र्य आणि सुरक्षितता अबाधित ठेवून तज्ज्ञांच्या तांत्रिक मार्गदर्शनाखाली हे काम अत्यंत काळजीपूर्वक केले जाणार आहे. मूर्ती संवर्धनाच्या निर्णयाला मुंबई ऊच्च न्यायालयाच्या कोल्हापूर खंडपीठाच्या ७ ऑगस्ट रोजीच्या अंतिम आदेशाने न्यायालयीन अधिमान्यता मिळाली आहे.

यापूर्वी २२ ते २४ जूनदरम्यान संवर्धनाचे नियोजन करण्यात आले होते. मात्र, न्यायालयीन स्थगिती तसेच त्यानंतर आषाढी यात्रेमुळे हे काम पुढे ढकलण्यात आले होते. मागील काळात १९८८, २००५, २०१२ आणि २०२० मध्ये मूर्तीचे संवर्धन करण्यात आले होते. यावेळी नियमित देखभालीच्या अनुषंगाने मूर्तीना संरक्षक आवरण देण्यात येणार आहे. संपूर्ण प्रक्रिया भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण, छत्रपती संभाजीनगर आणि राज्य पुरातत्त्व विभाग, पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडणार आहे. या संदर्भात १३ सप्टेंबर रोजी मंदिर समितीची सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या अध्यक्षतेखाली पुरातत्त्व विभागाच्या अधिका-यांसोबत दूरदृश्यप्रणालीद्वारे बैठक झाली. यावेळी मंदिर समितीचे पदाधिकारी, अधिकारी, खातेप्रमुख तसेच अरक व राज्य पुरातत्त्व विभागाचे अधिकारी ऊपस्थित होते. दरम्यान, २३ ते २५ सप्टेंबरदरम्यान मंदिर दर्शनासाठी बंद राहणार असल्याची नोंद घेउन वारकरी, भाविक व नागरिकांनी प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन मंदिर समितीने केले आहे.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठीत सवय



# संपादकीय

## प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

# पोषण इशारा अनिवार्य

मुलांसाठी अन्नसुरक्षा सर्वात महत्त्वाची आहे, हे लक्षात ठेवून पॅकबंद अन्न पदार्थांवरील वेष्टणावर त्यात घटक पदार्थ कोणते आहेत, त्याबरोबरच त्यात साखर, मीठ व चरबी (फॅट्स) यांचे किती प्रमाण आहे, असा स्पष्ट उल्लेख असला पाहिजे, त्यासाठी नियम तयार करावेत, असा आदेश सर्वोच्च न्यायालयाने भारतीय अन्नसुरक्षा व मानद प्राधिकरणाला दिला आहे. रस्त्यावर, बाजारात, जत्रेत, प्रवासात, उघड्यावर पॅकबंद खाद्यपदार्थ खरेदी करण्यामागे लोकांचा कल असतो. मोठ्या माणसांबरोबरच लहान मुलांसाठी खाद्यपदार्थांची बंद पाकिटे खरेदी केली जातात. त्या पाकिटात असलेल्या अन्न पदार्थांत हे प्रमाण किती आहे, याचा वेष्टणावर उल्लेख नसतो आणि ते खाद्यपदार्थ खाणारे लोकही त्याची कधी फिकीर करीत नाहीत; पण या घटकांचे प्रमाण जास्त असेल, तर त्याचा आरोग्यावर घातक परिणाम होऊ शकतो आणि नंतर त्यामुळे डॉक्टरकडे चकरा सुरू होतात. हा धोका लक्षात घेऊनच सर्वोच्च न्यायालयाने प्राधिकरणाला चांगलेच फटकारले आहे. न्यायालयाने पॅकबंद खाद्यपदार्थांमधील साखर, मीठ व चरबीबाबत इशारा देणारा उल्लेख वेष्टणावर असला पाहिजे, असे स्पष्ट निर्देश दिले आहेत. त्यासंदर्भात केंद्र सरकार व प्राधिकरणाकडून वेळापत्रक मागितले आहे. अन्नपदार्थांचे वैज्ञानिक निकष ठरवणे, त्यांची निर्मिती, साठवण, वितरण, विक्री यांचे नियमन करणे ही भारतीय अन्नसुरक्षा व मानद प्राधिकरणाची जबाबदारी आहे. त्यामुळेच खाद्यपदार्थांवरील वेष्टणावर काय उल्लेख असला पाहिजे, याचे नियमही हे प्राधिकरण ठरवते. घराबाहेर जे आपण खाद्यपदार्थ विकत घेऊन खातो, ते सुरक्षित, खाण्यायोग्य व मानकांप्रमाणे बनवलेले आहेत की नाही, यावर ही संस्था नियंत्रण ठेवत असते; पण इतक्या वर्षांत पॅकबंद खाद्यपदार्थांच्या बहुसंख्य पाकिटांवर साखर, मीठ किंवा चरबीचे त्यामध्ये किती प्रमाण आहे, असा कधी उल्लेख नसतो. काही पाकिटांवर तो असू शकतो; पण प्राधिकरणाने त्याची सक्ती केली नव्हती. बिस्किटे, चिप्स, वेफर्स, नमकीन, नूडल्स, मिठाई, शीतपेये, तसेच प्रक्रिया केलेले खाद्यपदार्थ आकर्षक पाकिटातून सार्वजनिक ठिकाणी सर्वत्र उपलब्ध असतात. त्यावर किंमत छापलेली असते. त्याच्या वापराची अंतिम मुदत किती आहे, याची तारीखही असते. त्यात कोणते घटक आहेत, त्याची यादी असते; पण बहुसंख्य पाकिटांवर आतील खाद्यपदार्थांत साखर, मीठ वा चरबी किती आहे, याची नोंद नसते. इथेच खरी मेख आहे. ग्राहकाने खाद्यपदार्थाचे पाकीट खरेदी केले की, त्याला लगेचच त्यात मीठ, साखर व चरबीचे प्रमाण किती आहे, हे समजले पाहिजे. बाजारात, सार्वजनिक ठिकाणी, रेल्वे किंवा बसस्थानकावर, चित्रपटगृहे, नाट्यगृहे, मनोरंजन केंद्रे, शाळा-महाविद्यालयांचे परिसर, बगीचे-उद्याने, गर्दीने गजबजलेल्या रस्त्यांवर रंगीबेरंगी तयार खाद्यपदार्थांची पाकिटे ग्राहकांना आणि विशेषतः लहान मुलांना, शाळकरी विद्यार्थ्यांना आकर्षित करीत असतात. किंबहुना हाच या कंपन्यांचा मोठा ग्राहक आहे. ही खाद्यपदार्थांची पाकिटे परवडणाऱ्या दरात मिळतात म्हणून ग्राहक खूश असतात. मुलांना शांत ठेवण्यासाठी किंवा त्यांची हौस भागविण्यासाठी अशी पॅकबंद पाकिटांची खरेदी पालकांकडून केली जाते; पण जे आपण मुलांना खाण्यासाठी देतोय ते आरोग्यासाठी किती योग्य आहे किंवा नाही, याचा सामान्य माणूस कधी विचार करीत नाही. पॅकबंद खाद्यपदार्थांच्या आकर्षक व भडक जाहिराती विविध माध्यमांतून मुले आणि पालकांपर्यंत पोहोचत असतात. ते पाहून आधीच अनेक पालक आणि मुलांचे कंडिशनिंग झालेले असते. दुकानात लागलेल्या खाद्यपदार्थांच्या रंगीबेरंगी पाकिटांच्या माळा मुलांना आकर्षित करतात; पण जे पॅकबंद म्हणून खरेदी करतोय, त्याचे पोषणमूल्य म्हणून काय दर्जा असेल, हे ग्राहकांना ठाऊक नसते. ते खाद्य पदार्थ मानकांप्रमाणे सुरक्षित आहेत, असे कसे गृहित धरता येईल? प्राधिकरणाच्या वेबसाईटवर अन्नसुरक्षा, गुणवत्ता, मानके, वेष्टणांचे नियम व पद्धती अशा अनेक मुद्द्यांवर माहिती उपलब्ध आहे; पण वेबसाईट उघडून त्याची माहिती घेण्यापर्यंत सर्वसामान्य लोकांना वेळ नसतो. भारतात मधुमेह, रक्तदाब, थकवा, लठ्ठपणा, असंसर्गजन्य आजारांविषयीची माहिती सामान्य लोकांना कमीच असते. अन्नपदार्थांची निवड करताना योग्य निवड करण्याचा अधिकार ग्राहकांचा आहे. ग्राहकाला त्यांचा हक्क प्राप्त होण्यासाठी प्राधिकरणाने अधिक सजग राहिले पाहिजे व ग्राहकांना त्यांच्या हक्काची जाणीव करून दिली पाहिजे. पॅकबंद पाकिटावर साखर, मीठ व चरबीच्या प्रमाणाचा उल्लेख करायला काही खाद्यपदार्थ कंपन्यांचा विरोध आहे. लहान पाकिटात खाद्यपदार्थ कमी असतील, तर तेथे नमुने तपासून साखर मीठ, किती आहे, हे सांगणे अवघड होईल, असा त्यांचा युक्तिवाद होता; पण न्यायालयाने मुलांचे आरोग्य महत्त्वाचे असल्याचे सांगून तो युक्तिवाद फेटाळला. काही खाद्यपदार्थांच्या पाकिटावर हेल्दी, न्युट्रीशन, एनर्जी, नॅचरल असे शब्द छापलेले असतात. हे शब्द ग्राहकांना आकर्षून घेतात; पण पाकिटातील खाद्यपदार्थ खरोखरच आरोग्याला पूरक आहेत का, हे ठाऊक नसते. महाराष्ट्रात अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त म्हणून तुकाराम मुंढे यांनी जबाबदारी स्वीकारल्यापासून या विभागाच्या कारभाराला विलक्षण गती प्राप्त झाली आहे. लहान-मोठी नामांकित हॉटेल्स, मॉल्स, क्लब्ज, शासकीय कार्यालयांतील उपहारगृहे, रेल्वे कँटिन, मिठाईची मोठी दुकाने आदी ठिकाणी असलेल्या किचनवर रोज कुठे ना कुठे छापे पडत आहेत. स्वच्छता किती आहे आणि अन्नात भेसळ आहे का, याची नियमानुसार कसून तपासणी होत आहे. अनेक ठिकाणी परवाने निलंबित केले गेले आहेत. प्रशासनाचा धाक असेल, तरच लोकांच्या आरोग्याशी होणारा खेळ थांबेल. मुलांच्या आरोग्याशी संबंधित प्रश्नात निष्काळजीपणाला कोणतीही जागा नसावी. पॅकबंद अन्नाच्या आकर्षक वेष्टणापेक्षा त्यातील घटकांची पारदर्शक माहिती महत्त्वाची आहे. साखर, मीठ आणि चरबीचे प्रमाण स्पष्टपणे नमूद झाले, तर पालक आणि ग्राहकांना योग्य निवड करता येईल. शेवटी नफा कंपन्यांचा असला, तरी आरोग्याची जबाबदारी संपूर्ण समाजाची आहे. अन्नपदार्थांच्या गुणवत्तेइतकीच त्यावरील माहितीची पारदर्शकताही महत्त्वाची आहे. ग्राहकांनी केवळ आकर्षक जाहिराती किंवा रंगीबेरंगी वेष्टण पाहून खाद्यपदार्थांची निवड न करता त्यावरील माहिती वाचण्याची सवय लावून घेतली पाहिजे. आरोग्यदायी समाजाची सुरुवात सुरक्षित आणि योग्य अन्नाच्या निवडीपासूनच होते.

# महागाई, वीजटंचाई जिओची संधी

**अर्थनगरीमध्ये सरत्या आठवड्या मध्ये महत्त्वाची ठरलेली बातमी म्हणजे कारखान्यात साखर स्वस्त असली तरी ग्राहकांना महाग पडत असल्याचे निदर्शनाला आले आहे. दरम्यान, शेअर बाजारात 'रिलायन्स जिओ' मध्ये गुंतवणुकीची संधी मिळणार असल्याचे स्पष्ट झाले. याच सुमारास सौरऊर्जा मुबलक असली तरी काही भागांमध्ये वीजटंचाईचा सामना करावा लागत असल्याचे स्पष्ट झाले.**

अर्थनगरीमध्ये सरत्या आठवड्या मध्ये काही क्षेत्रांमध्ये लक्षवेधी घटना प्रत्ययाला आल्या. सर्वप्रथम साखरेच्या बाबतीत पुढे आलेली बातमी म्हणजे कारखान्यात साखर स्वस्त असली तरी ग्राहकांना महाग पडत असल्याचे निदर्शनाला आले आहे. दरम्यान, शेअर बाजारात 'रिलायन्स जिओ' मध्ये गुंतवणुकीची संधी मिळणार असल्याचे स्पष्ट झाले. याच सुमारास सौरऊर्जा मुबलक असली तरी काही भागात वीजटंचाईचा सामना करावा लागत असल्याचे स्पष्ट झाले.

गेल्या काही आठवड्यांपासून गगनाला भिडलेले सारखेचे भाव ग्राहकांसाठी चिंतेचा विषय ठरत आहे. आता साखरेच्या दरात मोठी घसरण झाली असली, तरी अद्याप सर्वसामान्य ग्राहकांना त्याचा फायदा मिळताना दिसत नाही. साखर कारखान्यांच्या पातळीवर म्हणजेच एक्स-मिल किमतीत मोठी घट झाली आहे; पण हीच साखर किरकोळ बाजारात पोहोचेपर्यंत तिचा दर पुन्हा वाढत आहे. त्यामुळे ग्राहकांना अजूनही साखरेसाठी जास्त पैसे मोजावे लागत आहेत. विशेष म्हणजे या दरातील मोठ्या फरकावर आता साखर कारखान्यांनीच प्रश्न उपस्थित केले आहेत. साखरेच्या एक्स-मिल किमतीत जवळपास ३० टक्क्यांची घट झाली आहे. काही आठवड्यांपूर्वी कारखान्यातून साखर सुमारे ६७ रुपये प्रति किलो दराने विकली जात होती. आता हाच दर घसरून जवळपास ४७ रुपये प्रति किलोपर्यंत आला आहे. म्हणजेच दरामध्ये जवळपास ३० टक्के घसरण झाली असली, तरी किरकोळ बाजारात मात्र साखरेचा भाव अजूनही ६० रुपयांपेक्षा जास्त आहे. साखर कारखान्यातून बाहेर पडताना ज्या दराने साखर विकली जाते, त्याला एक्स-मिल किंमत म्हणतात. त्यानंतर यात वाहतूक खर्च, घाऊक व्यापाऱ्यांचे आणि किरकोळ विक्रेत्यांचे मार्जिन यांचा समावेश होतो आणि हे सगळं होऊन शेवटी साखर ग्राहकांपर्यंत पोहोचते. त्यामुळे कारखान्यात साखरेचा भाव कमी झाला म्हणजे त्याच क्षणी दुकानातील किंमतही तितकीच कमी होईल, असे होत नाही. मात्र सध्या कारखान्यातील आणि किरकोळ बाजारातील दरामध्ये अपेक्षेपेक्षा मोठी तफावत असल्याचे कारखान्याचे म्हणणे आहे.

**साखरेच्या दरात घट होणार**

साखर उद्योगाच्या म्हणण्यानुसार, कारखान्यांच्या पातळीवर साखरेच्या दरात मोठी घट झाली असेल, तर त्याचा परिणाम किरकोळ बाजारातही दिसायला हवा. त्यांच्या म्हणण्यानुसार बाजारात साखरेचा तुटवडा नसून पुरवठाही सुरळीत आहे. मात्र अशा परिस्थितीतही ग्राहकांना ६० ते ६५ रुपये प्रति किलो दराने साखर घ्यावी लागत आहे. तज्ज्ञांच्या मते, किरकोळ बाजारातील दर कमी होण्यासाठी काही वेळ लागू शकतो. यामागचे एक कारण म्हणजे व्यापारी आणि दुकानदारांनी आधी खरेदी केलेल्या साखरेचा साठा जुना असू शकतो. हा साठा त्यांनी तुलनेने जास्त दराने खरेदी केला असल्याने त्यांच्याकडून अजूनही जास्त दर आकारले जात असावेत. त्यामुळे नवीन स्वस्त झालेल्या साखरेच्या दराचा फायदा ग्राहकांपर्यंत पोहोचण्यास अजून वेळ लागू शकतो. तज्ज्ञांच्या मते एक्स-मिल किमतीतील घटीचा परिणाम हळूहळू घाऊक बाजारात आणि त्यानंतर किरकोळ बाजारात दिसण्याची शक्यता आहे. मात्र यासाठी काही दिवस लागू शकतात. काही रिपोर्टनुसार, येत्या काही दिवसांमध्ये किरकोळ बाजारात साखरेच्या किमतीत आणखी घट होण्याची शक्यता आहे. मात्र ही घट नेमकी किती असेल, हे व्यापारी नवीन साठा कोणत्या दराने खरेदी करतात आणि बाजारातील साखरेचा पुरवठा किती वेगाने वाढतो, यावर ठरेल.

**रिलायन्स जिओचा आयपीओ लाँच होणार**

आता एक लक्षवेधी अर्थवृत्त. नवरात्री आणि दिवाळीचा काळ आयपीओ गुंतवणूकदारांसाठी सुवर्णसंधी ठरू शकतो. मुकेश अंबानी यांच्या 'रिलायन्स इंडस्ट्रीज'ची दूरसंचार, डिजिटल आणि तंत्रज्ञान कंपनी, जिओ प्लॅटफॉर्म्स, ऑक्टोबरच्या अखेरीस किंवा नोव्हेंबरच्या सुरुवातीला अंदाजे चार अब्ज डॉलर्सचा आयपीओ लाँच करण्याची हालचाल करत आहे. 'रिलायन्स जिओ'चा 'आयपीओ' देशांतर्गत शेअर बाजारातील आतापर्यंतचा सर्वात मोठा इश्यू असेल. २००६ मध्ये 'रिलायन्स पेट्रोलियम'च्या लिस्टिंगनंतर 'रिलायन्स इंडस्ट्रीज ग्रुप'चा हा जवळपास दोन दशकांमधील पहिला आयपीओ असणार आहे. बहुधा जिओ ऑक्टोबरच्या अखेरीस, विशेषतः नवरात्रीच्या दिवसांच्या आसपास आपला 'आयपीओ' लाँच करण्याच्या तयारीत आहे. लाँच ऑक्टोबरच्या अखेरीस पुढे ढकलले गेला, तर नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यापर्यंत पोहोचू शकतो. नवरात्री नाही, तर कंपनी 'आयपीओ'साठी दिवाळीचे लक्ष्य ठेवू शकते तसेच लाँचची तारीख निश्चित झाल्यावर कंपनी गुंतवणूकदारांना आकर्षित करण्यासाठी प्रचारात्मक मोहीम सुरू करेल. परदेशात तीन आठवडे आणि भारतात दोन आठवडे रोड शो होतील. नवरात्रीमध्ये आयपीओ येणार असल्यास रोडशो पुढच्या आठवड्यापासूनच सुरू होऊ शकतात. ११ ऑक्टोबरला घटस्थापनेसह नवरात्री सुरू होईल

आणि २० ऑक्टोबर रोजी दसऱ्याला संपेल. बँकर्सच्या अंदाजानुसार 'जिओ'च्या 'आयपीओ' मधून सुमारे ३७ हजार ८०० कोटी रुपये उभारले जाऊ शकतात. अशाप्रकारे 'ह्युदाई'चा रेकॉर्ड मोडून 'जिओ' आतापर्यंतचा सर्वात मोठा 'आयपीओ' बनेल.

**स्वच्छ ऊर्जेचा वापरावर मर्यादा**

देशात विजेची मागणी विक्रमी पातळीवर पोहोचत असतानाच मोठ्या प्रमाणावर उपलब्ध असलेली सौरऊर्जा वापरता न आल्याने ऊर्जा क्षेत्रासमोर नवे आव्हान उभे राहिले आहे. ऊर्जा थिंक टँक 'एम्बर'च्या संशोधनानुसार गेल्या १५ महिन्यांमध्ये भारतातील सुमारे ११ टेरावॅट-तास सौरऊर्जेचा वापरच होऊ शकला नाही. या प्रमाणातील विजेने जवळपास एक कोटी घरांना वीजपुरवठा करता आला असता. उन्हाळ्याच्या काळात वातानुकूलन यंत्रे, पंखे तसेच शेतीपंपांचा वापर वाढल्याने देशातील विजेची मागणी मोठ्या प्रमाणात वाढते. मात्र याच काळात दुपारच्या वेळी सौरऊर्जेचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर होत असतानाही ती वीज ग्रीडमध्ये सामावून घेण्यात अडचणी येत आहेत. परिणामी, काही सौर आणि पवनऊर्जा प्रकल्पांना उत्पादन कमी करण्याच्या सूचना दिल्या जात आहेत. भारताकडे सध्या ३०० गीगावॉटपेक्षा अधिक स्वच्छ ऊर्जानिर्मिती क्षमता आहे. देशाच्या एकूण वीजनिर्मिती क्षमतेत तिचा वाटा निम्म्याहून अधिक आहे. मात्र पारेषण यंत्रणेची मर्यादित क्षमता आणि ऊर्जा साठवणुकीच्या अपुऱ्या सुविधा यामुळे उपलब्ध स्वच्छ ऊर्जेचा पूर्ण वापर करणे शक्य होत नाही. सौर किंवा पवनऊर्जा प्रकल्प वीजनिर्मिती करण्यास सक्षम असतानाही ग्रीडमध्ये वीज स्वीकारण्याची क्षमता नसल्यास उत्पादन कमी करावे लागते. या प्रक्रियेला 'कर्टेलमेंट' म्हटले जाते. यामुळे स्वच्छ ऊर्जा वाया जाण्याबरोबरच संबंधित ऊर्जा कंपन्यांना आर्थिक नुकसान सहन करावे लागते.

पारेषण क्षमता वाढवण्याची गरज

सौरऊर्जेचे उत्पादन प्रामुख्याने दिवसा, विशेषतः दुपारच्या वेळी वाढते. मात्र कोळशावर आधारित औष्णिक वीज प्रकल्पांचे उत्पादन सौरऊर्जेतील चढ-उतारानुसार तातडीने कमी-जास्त करणे कठीण असते. त्यामुळे दुपारी मोठ्या प्रमाणावर सौरऊर्जा उपलब्ध असूनही कोळशावर आधारित वीजनिर्मिती सुरू ठेवावी लागते. संध्याकाळी सूर्य मावळल्यानंतर सौरऊर्जेचे उत्पादन झपाट्याने घटते आणि त्याचवेळी घरगुती विजेची मागणी वाढते. या परिस्थितीत साठवून ठेवलेली सौरऊर्जा उपलब्ध नसल्याने पुन्हा पारंपरिक ऊर्जा स्रोतांवर अवलंबून रहावे लागते. गुजरात आणि राजस्थान ही देशातील सौरऊर्जा निर्मितीची प्रमुख केंद्रे आहेत. देशातील सुमारे निम्मी सौरऊर्जा या भागातून निर्माण होते. मात्र या राज्यांमध्ये निर्माण होणारी अतिरिक्त वीज इतर भागांमध्ये पोहोचवण्यासाठी आवश्यक असलेल्या पारेषण वाहिन्यांची क्षमता अनेक ठिकाणी अपुरी पडत आहे. पश्चिम भारतात सौरऊर्जेचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर होत असताना देशातील इतर भागांमध्ये विजेची मागणी जास्त असते. त्यामुळे उत्पादन केंद्रांपासून मागणीच्या केंद्रांपर्यंत वीज पोहोचवण्यासाठी व्यापक आणि आधुनिक पारेषण व्यवस्था उभारण्याची आवश्यकता आहे. अतिरिक्त सौरऊर्जा साठवून रात्री वापरण्यासाठी मोठ्या प्रमाणावर बॅटरी ऊर्जा साठवणूक व्यवस्था उभारणे हा या समस्येवरील महत्त्वाचा उपाय मानला जात आहे. दुपारच्या वेळी निर्माण होणारी अतिरिक्त वीज बॅटरीमध्ये साठवून संध्याकाळी किंवा रात्री मागणी वाढल्यानंतर ग्रीडला देता येऊ शकते. सरकारच्या माहितीनुसार, भारतातील बॅटरी ऊर्जा साठवणूक क्षमता सध्या सुमारे तीन गीगावॅट आहे. ही क्षमता २०३२ पर्यंत सुमारे ७४ गीगावॉटपर्यंत वाढवण्याची गरज असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

# संवाद

## हे गणराया, राज्य कर्त्यांना सुबुद्धी दे !

गणेशभक्तांच्या घरी, सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांच्या मंडपांत गणरायाचे आगमन झाल्याने सर्वत्रचे वातावरण आनंदमय झाले असले तरी अच्छे दिन येण्याची स्वप्ने पाहणाऱ्या भारतीय जनतेला अद्याप अच्छे दिन काही पाहायला मिळालेले नाहीत. पेट्रोल-डिझेलचे भाव दिवसागणिक वाढताहेत ज्याचा परिणाम वस्तूंच्या वाहतूक खर्चावर आणि दळणवळणावर होत असल्याने अन्य वस्तूंचे दरही वाढत आहेत. यापूर्वी कधीही न अनुभवलेली महागाई सामान्य जनतेच्या वाट्याला आली आहे ज्यामूळे सामान्य नोकरदार वर्गाचे जगणे अवघड झाले आहे. महागाईचा फटका यंदाच्या गणशोत्सवालाही बसला आहे. गणरायाच्या मूर्तीपासून पूजेचे, प्रसादाचे आणी सजावटीचे साहित्य यंदा कमालीचे महागले आहे. रुपयाची घसरण आवरणे आता राज्यकर्त्यांच्याही हाताबाहेर गेले आहे. आजमितिला समाजाची एव्हड्या मोठ्या प्रमाणात घसरण झाली आहे कि दर ४ बातम्यांच्या मागे एक बलात्का राची बातमी असते. ३ वर्षाच्या चिमुरडीपासून ८० वर्षाची वृद्धा सुद्धा नराधमांच्या वासनेपासून सुटलेली नाही. केवळ कायदे कठोर केले जात आहेत; मात्र कायद्याच्या अंमल बजावणीचे तीनतेरा वाजले आहेत. शालेय शिक्षणातून केवळ पैसे कमावण्याचे शिक्षण दिले जाते त्यामुळे नीतिमत्ता आणायची तरी कुठून ? गल्लीपासून दिल्लीपर्यंत भ्रष्टाचाराने आपले पाय घट्ट रोवले आहेत. मोबाईल आणि इंटरनेटच्या मोहजालात आजचा तरुण स्वतःचे अस्तित्वच हरवून बसला आहे त्यामुळे समाज आणि राष्ट्राप्रती आपले काही कर्तव्य आहे याची जाणंच हरवली आहे. आत्मतेज हरवलेली माणसे नैराश्याने ग्रासून आत्महत्येचा सोपा मार्ग पत्करू लागली आहेत. पाश्च्यात्यांच्या कुसंस्कारांना बळी पडलेली तरुण पिढी जगातील सर्वात महान अशा भारतीय संस्कृतीला दूर लोटू लागली आहे. एकूणच समाजाची घडी आज पूर्णतः विसकटली आहे. तेव्हा हे गणराया, या देशाचे रहाटगाडे हाकणाऱ्या राज्यकर्त्यांना सुबुद्धी दे ! 'राजा कालस्य कारणम' या संस्कृत सुभाषितानुसार आजच्या विस्कट लेल्या घडीला जर राज्यकर्ते जबाबदार आहेत, तर त्यांना जनतेचाही विचार प्राधान्याने करण्याची प्रेरणा दे ! दुर्जनांना दंडित करण्याची आणि सज्जनांचा सांभाळ करण्याची शक्ती दे !

**जगन घाणेकर** मुंबई

## फुटीर मनोवृत्तींना लगाम घालण्याची गरज

पाकिस्तान हा किती बेभरोशाचा आणि गुन्हेगारी प्रवृत्तीचा देश आहे हे वारंवार अनेक प्रकरणातून सिद्ध होत आलेले आहि. दहशवाद हा तर त्याचा जन्मजात स्वभावच आहे. परंतु भारतामध्ये कोणत्याही परिस्थितीत कोणत्याही प्रकारची स्थिरता लाभू द्यायची नाही किंवा भारतामध्ये कायम अराजकाची परिस्थिती कशी राहील यासाठी अधिकृतपणे पाकिस्तानचे सरकार आणि तिथली आयएसआय ही गुप्तचर संस्था कार्यरत असते. गेली अनेक दशके काश्मीरमध्ये हिंसाचार भडकवण्याचे प्रयत्न पाकिस्तानने केले. भारताविरोधी झर निर्माण करण्याचा प्रयत्न केला. तुटल्या फुटीरतावाद्यांना आणि तरुणांना देखील भरमसाठ पैसा देऊन काश्मीर सतत अशांत राहील अशी कटकारस्थाने केली केली. तिथल्या काश्मिरी पंडितांना दहशत आणि हिंसाचाराच्या जोरावरच हुसकावून लावण्याचा प्रयत्न पाकिस्तानने वारंवार केलेला आहे. गेल्या दहा वर्षात काश्मीरसह देशातल्या कोणत्याही भागात दहशतवाद्यांना घुसता येणार नाही, अशी नाकेबंदी केली गेली. दहशत पसरवण्याचा गेल्या दहा वर्षात अनेक वेळा प्रयत्न केला गेला, पण तो भारतीय गुप्तचर यंत्रणांचा जागरूकतेमुळे उधळून लावला गेला. ज्याअर्थी भारतातल्या तरुणांच्या खात्यावर पैसे पाठवण्याइतपत रक्कम या गुंडांकडे आहे याचा अर्थ त्याबद्दल कितीतरी मोठा मोबदला आयएसआयकडून मिळत असला पाहिजे. या नव्या कारस्थानाचा अर्थ एवढाच आहे की पाकिस्तानपुरस्कृत सर्व प्रकारच्या फुटीर मनोवृत्तींना भारत लगाम घालत असूनही देशाच्या अनेक भागांत या प्रवृत्ती वळवत ठेवण्याचे काम जाणिवपूर्वक केले जात आहे. ज्यामध्ये काश्मीरमधल्या पाकिस्तानप्रेमी फुटीरतावाद्यांनादेखील आमंत्रित केलेले आहे. म्हणजे एकीकडे पाकिस्तान भारतविरोधी षडयंत्र रचतो आहे. तर दुसरीकडे पाकिस्ताननेच पोसलेल्या फुटीरतावाद्यांना बळ देण्याचे काम काही राजकीय नेते करताना दिसून येतात. पाकिस्तानपुरस्कृत दहशतवाद रोखण्यासाठी गेली आठ वर्षे अतिशय कठोर प्रयत्न होत आहेत. तरीदेखील पहलगामसारखा हल्ला, दिल्लीतला बॉम्बस्फोट किंवा अशा गँगस्टारच्या माध्यमातून केले जात असलेले प्रयत्न यांरूळ्या गोष्टी भारतातल्या बाह्य आणि अंतर्गत सुरक्षिततेसाठी अत्यंत चिंताजनक ठरतात.

**प्रा. मधुकर चुटे**
नागपूर

# मराठवाडा मुक्ती संग्राम दिन

मराठवाडा मुक्ती संग्राम दिन दरवर्षी १७ सप्टेंबर रोजी साजरा केला जातो. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला तरी आपल्या देशाच्या एका भागावर (हैदराबाद मराठवाडा संस्थान) निजामाचे राज्य होते. आणि तो निजाम कोणत्याही परिस्थितीत आपले राज्य भारतात विलीन करायला तयार नव्हता. किंबहुना त्याला वेगळे राष्ट्र हवे होते. आपल्या देशात स्वातंत्र्याची पहाट उजळली ,पण निजामाच्या रूपाने एक काजळी मात्र राहिली होती. भारतात लोकशाही नांदण्यासाठी ही सरंजामशाही संपणे गरजेचे होते. हैदराबाद राज्य हे इंग्रजांच्या राजवटीच्या अस्ता पर्यंत टिकून होते. उत्तर आणि दक्षिण भारतातल्या मधोमध हैदराबाद संस्थान पसरले होते. त्या संस्थांनचे स्वतंत्र राहणे म्हणजे भारताच्या एकसंधतेला कमकुवत करणारे होते. हैदराबाद संस्थानात आताचे तेलंगणा, आंध्र प्रदेश, कर्नाटकाचे दोन जिल्हे आणि महाराष्ट्रातील आठ जिल्हे म्हणजे संपूर्ण मराठवाडा होते. मराठवाड्यातील संपूर्ण एक गावच रझाकारांनी जाळून टाकले. हैदराबाद मुक्तिसंग्रामाची अखेर पोलिस कारवाईत झाली. निजामाची लढाई १०९ तासात संपुष्टात आली. १९४८ च्या १३ सप्टेंबरला 'पोलो' ऑपरेशन सुरू केले आणि १७ सप्टेंबर १९४८ ला हैदराबादचा निजाम भारत सरकारला शरण आला. आणि हैदराबाद, मराठवाडा भारतात विलीन झाले. मराठवाडा मुक्ती संग्राम चे नेतृत्व स्वामी रामानंद तीर्थ यांनी केले होते. या अत्याचाराविरुद्ध स्वामी रामानंद तीर्थ, गोविंदभाई श्राफ, बाबासाहेब परांजपे यांच्या नेतृत्वाखाली जनतेने लढा उभारला. सैनिकी ताकद आणि जनतेच्या प्रचंड विरोधामुळे जुलमी निजाम शरण आला. आणि तिथे सोनेरी पहाट उगवली. यात अनेक स्वातंत्र्य सैनिकांना आपले प्राण गमवावे लागले. या दिवसाचे औचित्य साधून महाराष्ट्र शासन ध्वजारोहण व हुतात्म्यांना अभिवादन कार्यक्रम आयोजित करते. मराठवाड्याच्या अस्मितेचे, शौर्याचे आणि बलिदानाचे प्रतीक म्हणून हा दिवस आजही अभिमानाने साजरा केला जातो. हा राष्ट्ररक्षणाचा, राष्ट्राविषयी समर्पणाचा इतिहास आपल्या मुलांना शाळा, महाविद्यालयातून आवर्जून शिकवला तर आपल्या सैन्याविषयी, राष्ट्राविषयी त्यांच्या मनात आदरभाव वाढून, त्यांच्यात राष्ट्राप्रती समर्पणाची वृत्ती निश्चितच निर्माण होईल.

**माधवी पत्की**
नागपूर

## अभियंता दिन

आज १५ सप्टेंबर, आजचा दिवस संपूर्ण देशात अभियंता दिन म्हणून साजरा केला जातो कारण भारतातील पहिले अभियंता भारतरत्न सर मोक्षगुडम विश्वेश्वरय्या यांचा हा जन्मदिवस. मोक्षगुडम विश्वेश्वरय्या हे केवळ अभियंता नव्हते तर ते थोर देशभक्तही होते. आजच्या दिवशी म्हणजे १५ सप्टेंबर १८६१ रोजी कर्नाटकातील कोलार जिल्ह्यातील मदनहल्ली या छोट्याश्या गावात त्यांचा जन्म झाला.

मोक्षगुडम विश्वेश्वरय्या यांचे वडील विद्वान संस्कृत पंडित होते. घरची परिस्थिती हलाखीची होती तरीही त्यांनी विश्वेश्वरय्या यांच्या शिक्षणात खंड पडू दिला नाही.

विश्वेश्वरय्या यांनीही गरिबीशी झुंज देत तालुक्याला एकटे राहून आपले शिक्षण अव्वल गुणांनी पूर्ण केले. निजाम सरकारने त्यांची विशेष सल्लागारपदी नियुक्ती केली. तिथे त्यांनी हैदराबाद परिसरातील दोन नद्यांवर धरणे बांधून हैदराबाद शहर पुरमुक्त केलेच शिवाय शहराचा कायापालट देखील केला. म्हैसूरच्या राजाने त्यांना मुख्य अभियंता पदाची ऑफर दिली त्यांनी ती स्वीकारली. म्हैसूरचे मुख्य अभियंता असताना त्यांनी तिथे कृष्णराज सागर धरण, वृंदावन गार्डन बांधले तसेच विकासाची अनेक कामे केली. या व्यतिरिक्त त्यांनी उद्योग व शेती सिंचनाची अनेक कामे केली. पाण्याचा अपव्यय टाळून पुरेपूर वापर करणारी ब्लॉक सिस्टीम ही त्यांचीच देणगी आहे. म्हैसूरचे पद सोडल्यावर त्यांनी अभियांत्रिकीच नव्हे तर उद्योग, शेती, नगर सुधारणा या योजनेत मोलाचे कार्य केले. विश्वेश्वरय्या हे उच्चविद्याविभूषित असूनही त्यांचे राहणीमान अतिशय साधी होती. म्हैसूरी पद्धतीचा फेटा आणि साधी वेशभूषा त्यांनी शेवटपर्यंत जपली. त्यांचे व्यक्तिमत्त्वही आकर्षित करणारे होते. वयाच्या ९४ व्या वर्षी भारत सरकारने त्यांना भारतरत्न या सर्वोच्च पुरस्काराने गौरविले. विश्वेश्वरय्या हे शतायुषी होऊन निरामय जीवन जगले. १४ एप्रिल १९६२ रोजी वयाच्या १०१ व्या वर्षी त्यांनी जगाचा निरोप घेतला. पण त्यांनी केलेल्या कार्यकर्तृत्वाचा गौरव व्हावा म्हणूनच आजचा दिवस संपूर्ण देशात अभियंता दिन म्हणून साजरा केला जातो.

विश्वगुडम विश्वेश्वरय्या यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार**
मो. ९९२२५४६२९५

मंगळवार, दि. १५ सप्टेंबर २०२६
E-mail:-ytljanmadhyam@gmail.com

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

## फुलसावंगी सोसायटीचा कारभार अंधारात: शेतकऱ्यांची कर्जमाफीसाठी वणवण!

**१० दिवसांपासून वीज बंद, सचिवांच्या अनुपस्थिती पासून मासिक सभा न होण्यापर्यंत कारभारावर प्रश्नचिन्ह**

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**फुलसावंगी, दि. १४ :** प्रतिनिधी महागाव तालुक्यातील फुलसावंगी विविध कार्यकारी सहकारी सोसायटी क्र. ९०९ च्या कारभाराबाबत सभासद व शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. एकीकडे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ ची प्रक्रिया सुरू असताना शेतकऱ्यांना आवश्यक कागदपत्रे व प्रक्रियेसाठी सोसायटीच्या कार्यालयात हेलपाटे मारावे लागत आहेत.

मात्र, दुसरीकडे तब्बल दहा दिवसांपासून कार्यालयाचा वीजपुरवठा बंद असल्याने संस्थेच्या कार्यपद्धतीवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. कर्जमाफीच्या प्रक्रियेत शेतकऱ्यांसाठी सोसायटीची भूमिका महत्त्वाची असताना कार्यालयातच वीज नसल्याने दैनंदिन कामकाज प्रभावित होत असल्याची तक्रार आहे. आवश्यक माहिती, कागदपत्रे व इतर कामांसाठी येणाऱ्या शेतकऱ्यांना गैरसोयीचा सामना करावा लागत असून, काही वेळा अंधारातच कामकाज उरकण्याची वेळ येत असल्याचे सांगितले जात आहे. यासोबतच सोसायटीचे सचिव वाकोडे हे कार्यालयात नियमित उपलब्ध राहत नसल्याची चर्चा सभासदांमध्ये आहे. अध्यक्ष स्वप्नील नाईक यांचेही संस्थेच्या दैनंदिन कामकाजाकडे अपेक्षित लक्ष नसल्याची नाराजी काही सभासदांनी व्यक्त केली आहे. मागील सुमारे पाच महिन्यांपासून मासिक सभा झालेली नसल्याचीही चर्चा असून, त्यामुळे संस्थेच्या निर्णयप्रक्रियेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत.

### कार्यालय उघडण्याचीही प्रतीक्षा?

**सोसायटीचे कार्यालय निर्धारित वेळेत नियमितपणे सुरू राहत नसल्याच्या तक्रारीही शेतकऱ्यांकडून पुढे येत आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी असलेल्या संस्थेच्या कारभारालाच आता 'वाऱ्यावर' सोडण्यात आले आहे का, असा संतप्त सवाल सभासदांकडून उपस्थित केला जात आहे. कर्जमाफीच्या योजनेचा लाभ मिळेल, या अपेक्षेने शेतकरी आधीच कागदपत्रे आणि विविध प्रक्रियांसाठी धावपळ करीत आहेत. अशा परिस्थितीत सहकारी सोसायटीसारख्या महत्त्वाच्या संस्थेने शेतकऱ्यांना सुविधा देणे अपेक्षित असताना मूलभूत वीजपुरवठ्यापासून कार्यालयीन उपलब्धतेपर्यंत समस्या निर्माण होणे गंभीर मानले जात आहे.**

### कारभाराची चौकशी होणार का?

**सोसायटीचे कार्यालय नियमित वेळेत सुरू ठेवावे, वीजपुरवठ्याची समस्या तातडीने दूर करावी, सचिवांची नियमित उपस्थिती सुनिश्चित करावी आणि मासिक सभा नियमानुसार घेण्यात याव्यात, अशी मागणी शेतकरी व सभासदांकडून होत आहे. तसेच संस्थेच्या एकूण कारभाराची संबंधित सहकार विभागाने दखल घेऊन वस्तुस्थिती तपासावी, अशीही अपेक्षा व्यक्त केली जात आहे. कर्जमाफीच्या संवेदनशील प्रक्रियेच्या काळात शेतकऱ्यांना सोसायटीच्या दारातच गैरसोयीला सामोरे जावे लागत असेल, तर 'शेतकऱ्यांसाठी ची संस्था नेमकी कोणासाठी?' असा सवाल आता अधिक तीव्र होत आहे. संबंधित पदाधिकारी आणि प्रशासन यावर काय भूमिका घेतात, याकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.**

## 'बाप्पा' दुष्काळाचे विघ्न दूर कर! राठोडांची गणरायाकडे आर्त हाक

**पर्यावरणपूरक गणेशोत्सव व पाणी बचतीचे आवाहन, डीजेऐवजी ढोल-लेझीमला प्राधान्य देण्याचे आवाहन**

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. १४ :** राज्यात पावसाचा खंड आणि वातावरणीय बदलांमुळे दुष्काळाचे सावट गडद होत असताना, शेतकरी व जनतेवरील हे संकट दूर होऊन भरपूर पाऊस पडावा, अशी आर्त प्रार्थना राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री तथा यवतमाळचे पालकमंत्री संजय राठोड यांनी गणरायाच्या चरणी केली.

गणेश चतुर्थीनिमित्त यवतमाळ येथील निवासस्थानी कुटुंबीयांसह त्यांनी गणेशाची स्थापना केली.यावेळी माध्यमांशी बोलताना राठोड यांनी पावसातील खंडामुळे शेती उत्पादनावर परिणाम होण्याची तसेच आगामी काळात पाणीटंचाई तीव्र होण्याची शक्यता व्यक्त केली. त्यामुळे पाण्याचे नियोजन आणि बचत ही केवळ शासनाची नव्हे, तर प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. संकटावर मात करण्यासाठी शासनस्तरावर उपाययोजना सुरू असून, शेतकऱ्यांच्या पाठीशी शासन खंबीरपणे उभे असल्याचेही त्यांनी सांगितले. गणेशोत्सवात वाढता डीजेचा दणदणाट टाळून पर्यावरणपूरक आणि पारंपरिक पद्धतीने उत्सव साजरा करण्याचे आवाहन त्यांनी गणेश मंडळांना केले. डीजेमुळे आरोग्यावर विपरीत परिणाम होत असल्याने ढोल-लेझीमसारख्या पारंपरिक कलांना प्रोत्साहन द्यावे, असे ते म्हणाले.

## थोडक्यात

### यवतमाळच्या तनुश्रीने चीनमध्ये फडकवला तिरंगा..!

**ज्युनियर आशियाई हॉकीत भारताला सुवर्ण!**

**यवतमाळ :** चीन मधील मोकी येथे झालेल्या ज्युनियर आशियाई हॉकी स्पर्धेत भारतीय संघाने यजमान चीनचा अंतिम सामन्यात १-० असा पराभव करून सुवर्णपदकावर कब्जा केला. या दिमाखदार विजयात यवतमाळच्या अभ्यंकर कन्या शाळा व कनिष्ठ महाविद्यालयाची माजी राष्ट्रीय हॉकीपटू तनुश्री दिनेश कडू हिने दमदार कामगिरी बजावत शहराच्या क्रीडा क्षेत्राची मान उंचावली. तनुश्री ने जपान, पाकिस्तान आणि चीन विरुद्धच्या सामन्यांत पूर्ण वेळ मैदानात राहून संघाला मोलाची साथ दिली. राईट इन आणि सेंटर फॉरवर्डसह विविध पोझिशनवर खेळताना तिने आक्रमक व प्रभावी खेळाचे दर्शन घडवले. अंतिम सामन्यात चीनला नमवत भारताने सुवर्णमय कामगिरी केली. तनुश्रीच्या हॉकी प्रवासाची सुरुवात अभ्यंकर कन्या शाळेतच झाली. पाचवी ते दहावीपर्यंत शिक्षण घेत असताना तिने प्रशिक्षक शाहिद सय्यद व खेलो इंडिया प्रशिक्षक गौरव निंबोळकर यांच्याकडून प्रशिक्षण घेतले. शालेय राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व केल्यानंतर तिची निवड क्रीडा प्रबोधिनी, पुणे येथे झाली. पुढे SAI मुंबई सेंटर आणि बंगळुरूतील भारतीय शिबिरातून तिने राष्ट्रीय संघात स्थान मिळवले. न्यूझीलंडमधील स्पर्धेतही तिने भारताचे प्रतिनिधित्व केले आहे. या आंतरराष्ट्रीय यशाबद्दल वुमेन्स एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष ॲड. ए. पी. दर्डा, सचिव रमेश मुणोत, मुख्याध्यापिका सुनीता दर्डा यांच्यासह शिक्षक व कर्मचाऱ्यांनी तनुश्रीचे अभिनंदन केले.

### अंबोडा येथे श्री गजानन महाराज पुण्यतिथीनिमित्त कार्यक्रमांचे आयोजन

**महागाव:** तालुक्यातील अंबोडा येथील श्री गजानन महाराज संस्थान तर्फे दरवर्षी प्रमाणे याही वर्षी श्री गजानन महाराज यांची पुण्यतिथी साजरी करण्यात येते आहे. तेव्हा पुण्यतिथीनिमित्त दिनांक १४ सप्टेंबर रोजी रात्री ९ वाजता श्री गजानन महाराज विजय ग्रंथाचे पारायण वाचन करण्यात आले असून, आज दिनांक १५ सप्टेंबर रोजी मंगळवारी सकाळी ९ वाजता श्री गजानन महाराज पालखी सोहळा निघणार आहे. व दुपारी १ वाजता महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असून. रात्री ठीक ८ ते १० वाजेपर्यंत ( राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त शिक्षक) ह.भ.प. यशवंत महाराज देशमुख हिवरेकर यांच्या जाहीर किर्तनाचा कार्यक्रम होणार आहे . करीता श्री गजानन महाराज पालखी सोहळ्यात जास्तीत जास्त भाविक भक्तांनी सहभागी होऊन महाप्रसाद व कीर्तनाचा लाभ घ्यावा असे आवाहन श्री गजानन महाराज संस्थांन अंबोडा यांच्यातर्फे करण्यात आले आहे.

### न्यायालयाच्या आदेशाचे पालन

**फुलसावंगीत टाळ-मृदुंगाच्या गजरात गणरायाचे आगमन**

**फुलसावंगी :** माननीय न्यायालयाच्या आदेशाचे पालन करत, ध्वनी प्रदुषण टाळत डि जे ला फाटा देत फुलसावंगी येथे आज सोमवारी सार्वजनिक गणेश मंडळांकडून गणरायाची भक्तिमय वातावरणात स्थापना करण्यात आली. यावेळी स्थानिक श्री पुण्येश्वर वारकरी शिक्षण संस्थेच्या विद्यार्थ्यांनी टाळ-मृदुंगाच्या गजरात पावली खेळत गणरायाची मिरवणूक काढली. पारंपरिक वाद्यांच्या निनादाने संपूर्ण परिसर भक्तिमय झाला होता. गणेश चतुर्थीच्या निमित्ताने सार्वजनिक गणेश मंडळांनी श्री गणेशाच्या मूर्तीची विधिवत स्थापना करण्यापूर्वी मिरवणुकीचे आयोजन केले होते. वारकरी शिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांनी पारंपरिक वेशभूषेत सहभागी होत टाळ-मृदुंगाच्या तालावर पावली खेळत मिरवणुकीत उत्साह निर्माण केला. भक्तिगीते, गजर आणि गणरायाच्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला. उत्सव साजरा करताना न्यायालयाच्या आदेशांचे पालन आणि सामाजिक सलोखा कायम ठेवण्याचा संदेश यावेळी देण्यात आला. पारंपरिक पद्धतीने आणि शिस्तबद्ध वातावरणात गणरायाचे स्वागत करण्यात आल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले. मिरवणुकीनंतर सार्वजनिक गणेश मंडळांच्या मंडपात गणरायाची विधिवत पूजा-अर्चा करून स्थापना करण्यात आली. गणेशोत्सवाच्या प्रारंभीच पारंपरिक वारकरी संस्कृतीचे दर्शन घडल्याने भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

## PESA क्षेत्रातील ताडउमरी सरपंचपदाची निवड प्रक्रियेची चौकशीची मागणी

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**पांढरकवडा, दि. १४ :** संविधानाच्या पाचव्या अनुसूचीनुसार अनुसूचित क्षेत्र अर्थात PESA अंतर्गत येणाऱ्या ताडउमरी गट ग्रामपंचायतीतील सरपंचपदाच्या निवड प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. सरपंचपदासाठी आरक्षणाची अंमलबजावणी नेमकी कोणत्या नियमांनुसार झाली,

याची तपासणी करून वस्तुस्थिती स्पष्ट करण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते आकाश अनंतराव सामलवार यांनी केली आहे. ताडउमरी ग्रामपंचायतीचे सरपंच सुनील मारोती तुळजेवार यांच्या निवडीच्या वैधतेबाबत आक्षेप नोंदविताना, PESA क्षेत्रातील ग्रामपंचायतींमध्ये अनुसूचित जमातींच्या प्रतिनिधित्वासंदर्भातील तरतुदींची योग्य अंमलबजावणी झाली आहे का, असा सवाल उपस्थित करण्यात आला आहे. या संदर्भात सरपंच निवडीची प्रक्रिया, आरक्षण निश्चिती तसेच संबंधित कागदपत्रांची माहिती माहितीच्या अधिकारातून मागविण्यात आली. मात्र, निवडणूक अधिकारी तथा जन माहिती अधिकारी, केळापूर आणि ताडउमरीचे जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक यांच्याकडून अपेक्षित माहिती वेळेत मिळाली नाही किंवा काही माहिती अपूर्ण स्वरूपात देण्यात आल्याचा आरोप सामलवार यांनी केला आहे.अनुसूचित क्षेत्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आदिवासी समाजाचे प्रतिनिधित्व आणि ग्रामसभेचे अधिकार हा घटनात्मक विषय आहे. त्यामुळे ताडउमरीतील सरपंचपदाचे आरक्षण, निवड प्रक्रिया आणि त्यासंबंधीच्या नोंदींची अधिकृत पडताळणी होणे गरजेचे आहे. केवळ आरोप-प्रत्यारोप न राहता प्रशासनाने कागदपत्रांच्या आधारे भूमिका स्पष्ट करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. दरम्यान, माहिती अधिकारातील अर्जावर विलंब किंवा अपूर्ण माहिती देण्यात आली असल्यास त्याचीही चौकशी करून संबंधितांची जबाबदारी निश्चित करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

### नियमबाह्य काही आढळल्यास कारवाईची मागणी

**ताडउमरी ग्रामपंचायतीची सरपंच निवड प्रक्रिया PESA व आरक्षणाच्या लागू तरतुदींनुसार झाली आहे का, याची स्वतंत्र चौकशी करून अहवाल सार्वजनिक करावा. नियमभंग आढळल्यास संबंधितांवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी सामलवार यांनी केली आहे. मात्र, सरपंच निवड, आरक्षणाची अंमलबजावणी आणि माहिती अधिकाराच्या प्रकरणावर प्रशासनाची अधिकृत भूमिका अद्याप समोर आलेली नाही. त्यामुळे चौकशीनंतरच या प्रकरणातील वस्तुस्थिती स्पष्ट होणार आहे.**

## १०६ वर्षांच्या धोकादायक इमारतीत पाटण पोलिसांचा 'जीवघेणा' कारभार!

**५४ गावांची सुरक्षा जुन्या भिंतींच्या भरवशावर, नवीन पोलीस ठाणे व निवासस्थानांची मागणी**

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**झरी-जामणी, दि. १४ :** नागरिकांच्या सुरक्षेची जबाबदारी सांभाळणाऱ्या पाटण पोलिसांनाच गेल्या १०६ वर्षांपासून जीर्ण आणि धोकादायक इमारतीचा आधार घ्यावा लागत असल्याचे चित्र आहे. १९२० मध्ये उभारलेल्या पोलीस ठाण्याच्या इमारतीची अवस्था अत्यंत खराब झाली असून, पावसाळ्यात छत व भिंतींमधून पाणी गळत असल्याने पोलीस कर्मचारी, महत्त्वाची कागदपत्रे, संगणक व शासकीय साहित्याच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

पाटण पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रात ५४ गावे आणि सुमारे ७५ हजार नागरिक येतात. एवढ्या मोठ्या क्षेत्राची सुरक्षा ज्या पोलीस ठाण्यावर आहे, त्याच ठिकाणी मूलभूत सुविधांचा अभाव असल्याने कर्मचारी निवासस्थानांची अवस्था तर अधिकच गंभीर आहे. तब्बल १२ निवासस्थाने भग्नावस्थेत असून, अधिकाऱ्याचे निवासस्थानही राहण्यायोग्य नसल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. परिसरात सरपटणाऱ्या प्राण्यांचा वावर असल्याने कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. विशेष म्हणजे, सुमारे २५ वर्षांपूर्वीच सार्वजनिक बांधकाम विभागाने या इमारती धोकादायक असल्याचा अहवाल दिल्याचे सांगण्यात येते. २०१५ मध्ये पोलीस ठाणे झरी-जामणी येथे स्थलांतरित करून नवीन इमारत उभारण्याचा प्रस्तावही पुढे आला होता. मात्र, त्यानंतरही प्रत्यक्ष कार्यवाही न झाल्याने हा प्रस्ताव कागदावरच राहिला आहे.

## आदिवासी व मुस्लिम कार्यकर्त्यांचा वंचित बहुजन आघाडी पक्षात प्रवेश.!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**पुसद, दि. १४ :** आगामी काळातील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीला सामोरे जाऊन जिंकण्याच्या दृष्टिकोनातून वंचित बहुजन आघाडी यवतमाळ पश्चिम जिल्ह्याची जिल्हास्तरीय बैठक जिल्हाध्यक्ष ॲड. डी.के. दामोधर यांच्या अध्यक्षतेखाली शासकीय विश्रामगृह पुसद येथे संपन्न झाली.

यावेळी जिल्हा उपाध्यक्ष उत्तमराव ढोले, जिल्हा कोषाध्यक्ष संजय मुजमुले ,जिल्हा संघटक बुद्धरत्न भालेराव, जिल्हा कार्यकारणी सदस्य अजाब मेषेकार, पुसद तालुका अध्यक्ष संदीप आढाव, संबोधी गायकवाड उमरखेड, उत्तमराव मुनेश्वर आर्णी, गुणानंद मानकर, नोगीता बोरकर, आकाश पठाडे, जयानंद उबाळे, अमोल बाऱ्हाटे, विश्वास धुळे,भारत गायकवाड, मधुकर सोनवणे ,मधुर खिल्लारे,जयानंद भालेराव,राजरत्न लोखंडे, गोवर्धन भालेराव, विनोद कांबळे दयानंद खिल्लारे, संतोष मनवर, अरुण राऊत ज्ञानेश्वर चव्हाण,यांच्यासह जिल्ह्यातील अनेक पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी आदिवासी मुस्लिम व बौद्ध समाजातील अनेक कार्यकर्त्यांचा जिल्हाध्यक्ष यांच्या हस्ते व जिल्हा कार्यकारणीतील पदाधिकारी यांच्या प्रमुख उपस्थितीत पक्ष प्रवेश करण्यात आला. उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करत असताना आगामी काळात होऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीमध्ये पक्षाला विजयश्री मिळवण्यासाठी बूथ लेवल पासून ते तालुक्यापर्यंतच्या प्रत्येक पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी अगदी तन-मन-धनाने पक्ष वाढविण्यासाठी कार्य करावे असे आवाहन जिल्हाध्यक्ष ॲड. दामोधर यांनी केले. पक्षाला सत्तेत बसविणे काळाची गरज आहे म्हणून प्रत्येक पदाधिकाऱ्यांनी आत्तापासूनच ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांचे हात मजबूत करण्यासाठी बूथपासूनच्या कामाला तात्काळ सुरुवात करावी .

## गणेशोत्सव आला अन् प्रशासनाला रस्त्यांची आठवण!

**वर्षानुवर्षे खड्ड्यांतून नागरिकांचा प्रवास, उत्सवाच्या तोंडावर डागडुजीची मलमपट्टी**

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**पांढरकवडा, दि. १४ :** गणेश चतुर्थीच्या पार्श्वभूमीवर पांढरकवडा शहरातील खराब रस्त्यांच्या डागडुजीला अखेर सुरुवात झाली आहे. गणेश मंडळांच्या मिरवणुका, भाविकांची वाढणारी गर्दी आणि वाहतुकीचा वाढता ताण लक्षात घेता प्रशासनाने रस्त्यांवरील खड्डे बुजविण्याचे काम हाती घेतले आहे.

मात्र, गणेशोत्सव आला कीच प्रशासनाला रस्त्यांची आठवण का होते? असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. शहरातील अनेक प्रमुख व अंतर्गत रस्त्यांवर गेल्या अनेक वर्षांपासून मोठमोठे खड्डे पडले आहेत. पावसामुळे या खड्ड्यांमध्ये पाणी साचत असल्याने वाहनचालक आणि पादचाऱ्यांना जीव मुठीत धरून मार्गक्रमण करावे लागत होते. काही ठिकाणी रस्त्यांची अवस्था इतकी बिकट झाली आहे की, अपघाताचा धोका कायम निर्माण झाला आहे. विशेषतः गणेशोत्सवाच्या काळात मिरवणुका व भाविकांची गर्दी वाढणार असल्याने ही समस्या अधिक गंभीर होण्याची शक्यता होती. मात्र, सण-उत्सव किंवा मोठा कार्यक्रम जवळ आला की रस्त्यांवर डागडुजीची घाई आणि त्यानंतर पुन्हा जैसे थे परिस्थिती, असा नागरिकांचा अनुभव आहे. त्यामुळे सध्या सुरू असलेली खड्डे बुजविण्याची कामे केवळ उत्सवा पुरती मलमपट्टी ठरू नयेत, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. तात्पुरत्या डागडुजी पेक्षा शहरातील रस्त्यांची पाहणी करून निकृष्ट रस्त्यांची कायमस्वरूपी दुरुस्ती, दर्जेदार बांधकाम आणि त्याची नियमित देखभाल करण्याची गरज आहे. दरवर्षी खड्डे बुजविण्यावर खर्च करण्यापेक्षा एकदाच टिकाऊ रस्ते का केले जात नाहीत? हा प्रश्नही नागरिकांनी उपस्थित केला आहे.गणेशोत्सवाच्या तोंडावर सुरू झालेल्या डागडुजीमुळे नागरिकांना तात्पुरता दिलासा मिळणार असला, तरी उत्सव संपल्यानंतर पुन्हा रस्त्यांची अवस्था पूर्ववत होऊ नये, यासाठी प्रशासनाने ठोस नियोजन करणे गरजेचे आहे. गणेशोत्सवाच्या निमित्ताने जागे झालेल्या प्रशासनाने आता रस्त्यांच्या कायमस्वरूपी प्रश्नालाही प्राधान्य द्यावे, अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

## बाभूळगाव पोलीस ठाण्यात प्रथमच बाप्पा विराजमान..!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**बाभुळगाव, दि. १४ :** गणेशोत्सवाच्या उत्साहाला सुरुवात झाली असून, बाभुळगाव तालुक्यात सोमवारी घरोघरी गणरायाचे स्वागत करण्यात आले. त्यामुळे शहरासह ग्रामीण भागात भक्तिमय वातावरण निर्माण झाले.

याच उत्साहात बाभूळगाव पोलीस ठाण्यात यंदा इतिहासात प्रथमच श्री गणेशाची स्थापना करण्यात आली. यावेळी डीजेचा वापर न करता पारंपरिक वाद्यांच्या गजरात गणरायाची स्थापना करण्यात आली यात पोलीस गणवेश डोक्यावर पांढरी टोपी ने लक्ष वेधून घेतले होते.या उपक्रमातून गणेशोत्सवात पारंपरिक संस्कृतीला जपण्यासोबतच ध्वनिप्रदूषण टाळण्याचा संदेश पोलीस विभागाने दिला. गणेशोत्सव आनंद, उत्साह आणि सामाजिक सलोख्याने साजरा करताना डीजेऐवजी पारंपरिक वाद्यांना प्राधान्य द्यावे, असे आवाहन या मिरीणुकीतून संदेश पोलीस विभागाकडून देण्यात आला . पोलीस ठाण्यातील या उपक्रमाचे नागरिकांकडून कौतुक होत आहे.

### डीजे ऐवजी पारंपरिक वाद्यांचा संदेश

**बाभुळगाव पोलीस ठाण्यात प्रथमच गणपती स्थापना करण्यात आली. बाभुळगाव तालुक्यात ४३ गणपती मंडळ असून त्यात ३२ एक गाव एक गणपती आहे.गणेशोत्सव आनंद, उत्साह आणि सामाजिक सलोख्याने साजरा करा, पण डीजे ऐवजी पारंपरिक वाद्यांना प्राधान्य द्या असा संदेश या मिरवणुकीतून पोलीस विभागाने दिला.**

**दीपमाला भेंडे, पोलीस निरीक्षण बाभुळगाव**

## जाहीरनामा

**माऊली अर्बन पतसंस्था, यवतमाळ ठेवीदार, सभासद व नागरिकांना महत्त्वाचे आवाहन!**

माऊली अर्बन पतसंस्थेबाबत सध्या बाजारात व सोशल मीडियावर जाणीवपूर्वक काही दिशाभूल करणाऱ्या अफवा व गैरसमज पसरविले जात आहेत. या अफवांना कोणताही तथ्याधार नसून ठेवीदारांनी अपुऱ्या माहितीवर विश्वास ठेवू नये. संस्थेचा कारभार सहकार खात्याच्या नियम व निकषांनुसार पारदर्शक आणि नियमानुसार सुरू आहे. संस्थेचे दैनंदिन कामकाज व व्यवहार नियमितपणे सुरू असून ठेवीदारांच्या हिताचे संरक्षण करणे हे संचालक मंडळाचे सर्वोच्च प्राधान्य आहे. अफवांमुळे काही ठेवीदारांनी एकाच वेळी मुदतपूर्व ठेवी काढण्यास सुरुवात केल्याने संस्थेच्या दैनंदिन आर्थिक व्यवस्थेवर तात्पुरता ताण निर्माण झाला आहे. ही परिस्थिती अचानक वाढलेल्या पैसे काढण्याच्या मागणीमुळे निर्माण झाली असून ती कायमस्वरूपी स्वरूपाची नाही. याच काळात नगरपालिकेच्या अतिक्रमण कारवाईमुळे काही लहान व्यापाऱ्यांच्या व्यवसायावर परिणाम झाल्याने त्यांच्या नियमित कर्जवसुली वरही तात्पुरता परिणाम झाला. मात्र, संस्थेने कर्जवसुली साठी विशेष मोहीम अधिक गतिमान केली असून थकीत कर्जाच्या वसुलीवर ठोसपणे लक्ष केंद्रित केले आहे. ठेवीदारांनी अफवांवर विश्वास ठेवून घाईघाईने मुदतपूर्व पैसे काढू नयेत. संयम आणि सहकार्याच्या माध्यमातून सद्यस्थिती लवकरच पूर्वपदावर येईल, असा संस्थेला विश्वास आहे.

अफवा नव्हे, तर तथ्यांवर विश्वास ठेवा! ठेवीदारांचे हित हाच आमचा संकल्प!
माऊली अर्बन पतसंस्था आपल्या विश्वासाला कधीही तडा जाऊ देणार नाही.

**आपला नम्र,**
**जितेश नावडे अध्यक्ष, माऊली अर्बन पतसंस्था,**
**यवतमाळ व समस्त संचालक मंडळ**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# तिवसा विधानसभा मतदारसंघाच्या विकासाला गती

१० कोटींच्या विविध विकासकामांना सुरुवात आ.राजेश वानखडे यांच्या शुभहस्ते भूमिपूजन व लोकार्पण सोहळा

**तिवसा/वार्ताहर**

तिवसा विधानसभा मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासाला गती देण्यासाठी विविध विकासकामे हाती घेण्यात आली असून,आ.राजेश श्रीरामजी वानखडे यांच्या शुभहस्ते तिवसा शहरासह तिवसा तालुक्यातील वरखेड व मोर्शी तालुक्यातील विचोरी येथे विविध विकासकामांचे भूमिपूजन व लोकार्पण करण्यात आले. या माध्यमातून सुमारे १० कोटी रुपयांच्या विविध विकासकामांना चालना मिळाली आहे.

तिवसा शहरातील प्रभाग क्रमांक ५ मध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती वर्षानिमित्त सुमारे २ कोटी रुपयेचे भव्य व सुसज्ज स्मारकाचे भूमिपूजन करण्यात आले. तसेच प्रभाग क्रमांक २ मधील खुल्या जागेवर सुमारे १ कोटी रुपये चे अद्ययावत ओपन जिम व व्यायाम साहित्याच्या कामास सुरुवात करण्यात आली.यासोबतच तिवसा शहरातील आठवडी बाजार परिसरात सुमारे २ कोटी रुपये चे मटण मार्केट विकासकामांचे, तसेच रस्ते, नागरी सुविधा व विविध प्रभागांतील मूलभूत सुविधांशी संबंधित विकासकामांचे भूमिपूजन करण्यात आले.

तिवसा तालुक्यातील वरखेड येथे जिल्हा परिषद बांधकाम विभागांतर्गत सुमारे ५९.५५ लाख रुपये चे नवीन ॲलोपॅथी दवाखाना इमारतीच्या बांधकामाचे भूमिपूजन करण्यात आले. तसेच मोर्शी तालुक्यातील विचोरी येथील श्री संत मारुती महाराज देवस्थान सुमारे २० लाख रुपये चे विकासकामाचे भूमिपूजन करण्यात आले. याचबरोबर ४.५० कोटी रुपये चे प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीचे लोकार्पण करण्यात आले.

तिवसा विधानसभा मतदारसंघातील शहरांपासून ग्रामीण भागापर्यंत रस्ते, आरोग्य सुविधा, बाजारपेठा, व्यायाम व उद्यान सुविधा, धार्मिक व सामाजिक स्थळांचा विकास तसेच नागरिकांना आवश्यक असलेल्या मूलभूत नागरी सुविधांना प्राधान्य देण्यात येत आहे. 'विकास हाच आमचा संकल्प आणि जनतेची सेवा हाच आमचा धर्म' या भूमिकेतून आमदार राजेशभाऊ वानखडे मतदारसंघाच्या विकासासाठी सातत्याने प्रयत्नशील असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

या विविध विकासकामांमुळे तिवसा विधानसभा मतदारसंघाच्या विकासाला नवी दिशा आणि मोठी चालना मिळणार असून, नागरिकांना अधिक चांगल्या व आधुनिक सुविधा उपलब्ध होणार आहेत.या भूमिपूजन व लोकार्पण कार्यक्रमांना भाजपा पदाधिकारी व कार्यकर्तेसह नागरीक उपस्थित होते.

## कठोरा बु.येथे विद्यार्थ्यांनी साकारल्या पर्यावरणपूरक गणेशमूर्ती

**अमरावती/का.प्र.**

पर्यावरणपूरक गणेशोत्सवाबाबत जनजागृती करण्यासाठी कल्पतरू बहुउद्देशीय संस्था व रायझिंग कोचिंग क्लासेस यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा परिषद उच्च प्राथमिक मराठी शाळा, कठोरा बु. येथे इको फ्रेंडली गणपती मेकिंग कार्यशाळा घेण्यात आली. विद्यार्थ्यांनी शाडू मातीपासून पर्यावरणपूरक गणेशमूर्ती साकारल्या. गजानन पारडकर यांनी प्रात्यक्षिकाद्वारे विद्यार्थ्यांना मूर्ती तयार करण्याचे प्रशिक्षण दिले.

यावेळी संस्थेच्या अध्यक्षा शारदा विधळे अढाऊ यांनी पर्यावरणपूरक गणेशमूर्तीचे महत्त्व व जलप्रदूषणाचे दुष्परिणाम समजावून सांगितले. कार्यक्रमासाठी मुख्याध्यापिका अपर्णा सोनटक्के,शिक्षक राजेंद्र दीक्षित, रामचंद्र चव्हाण, कुमारी प्रणिता काळे (निमकर) यांचे सहकार्य लाभले. पल्लवी पांडे यांनी संचालन केले.संस्थेचे सचिव अमोल विधळे व उपाध्यक्ष आदित्य विधळे यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले. उत्कृष्ट सहभाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांना बक्षिसे व प्रमाणपत्रे देऊन गौरविण्यात आले. कार्यशाळेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

## संक्षिप्त

### विद्युत कर्मचारी कामगार सेना पतसंस्थेची वार्षिक सभा उत्साहात

**लेहेगाव -** विद्युत कर्मचारी कामगार सेना सहकारी पतसंस्था मर्यादित अमरावती र.न.१३८ पतसंस्थेची १५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा श्री संत गाडगे महाराज समाधी मंदिर ट्रस्ट मंगल धाम अमरावती येथे उत्साहात पार पडली. सभेला अध्यक्ष म्हणून प्रकाश काळबांडे तसेच प्रमुख पाहुणे म्हणून विलास शिंदे उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रकाश काळबांडे यांनी पतसंस्थेच्या सभासदांना मार्गदर्शन केले. सेवानिवृत्त सुभाष काळपांडे व उमेश देशपांडे तसेच वितरण कंपनीमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणारे गुणवंत कामगार म्हणून संजय म्हाला आणि कृष्णा तट्टे यांचा पतसंस्थेतर्फे शाल श्रीफळ सन्मानचिन्ह पुष्पगुच्छ देऊन सपत्नीक सत्कार करण्यात आला. विद्यार्थी स्वरदा वानखडे, कृष्णाई कुकडे, आराध्या शेंडे, स्वराज मलवार, आर्या अकोलकर, निशांत पांडे, वर्ग दहावीचे विद्यार्थी रुद्रेश ढेवले,लाभेश शेंदरकर,अवंतिका कुरसंगे, चैतन्य वानखडे,केतकी वानखडे,शार्दुल खोब्रागडे, स्वरा गादे,दीप कोंडे,श्रावणी विजयकर, जुई डकरे, प्रियांश निकम, श्रावणी भांबुरकर,कृष्णराज दळवी, देव वानखेडे, वर्ग बारावीचे ओम तट्टे, हेमांगी भुजाडे,माही मेश्राम,दिशांत वसु या गुणवंत विद्यार्थ्यांचा रोख पारितोषिक सन्मानचिन्ह पुष्पगुच्छ देऊन संपूर्ण विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. कृतिका वाडेकर, विलास गुल्हाने, प्रगती माहोरे, शुक्षाली गाठे, राजमाता जिजाऊ पुरस्कार प्राप्त रामकृष्ण चिखलकर व लता चिखलकर यांचा सपत्नीक तसेच वैशाली कुरसंगे,तुषार टीक्कस, मंगेश वानखडे,नीलकमल वानखडे यांचा सत्कार करण्यात आला. वार्षिक सर्वसाधारण सभेला पतसंस्थेचे अध्यक्ष रामकृष्ण चिखलकर, सचिव भूषण गिरी,उपाध्यक्ष गजानन शेंदरकर आणि संचालक अजय बावणे संचालिका नंदिनी होले सभेला उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रामकृष्ण चिखलकर, संचालन मंगेश वानखडे, अहवाल वाचन भूषण गिरी तर आभार नंदिनी होले यांनी मानले.

### पुसद्यात तान्हा पोळा बैलसजावट स्पर्धा

**शिराळा -** नजिकच्या पुसद्यात तान्हा पोळा बैलसजावट स्पर्धा उत्साहात साजरी करण्यात आली. उत्कृष्ट सजावट करणा- या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते विविध आकर्षक बक्षिसे देऊन गौरविण्यात आले.कार्यक्रमाच्या अध्यक्षांनी जिजाऊ बँक अमरावतीचे अध्यक्ष बबन आवारे लाभले होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून वलगावच्या पोलिस निरीक्षक रिता उईके , कृउबास संचालक सतीश गोटे , जिजाऊ बँकेचे संचालक नितीन डाहके, उमेद कृषी सखी छाया चोरे, आय.जी.आर.पी च्या स्नेहा उल्हे, सामाजिक कार्यकर्ते विजय मुंडले, पुसदा पोलीस पाटील उषा कोकरे, संदिप देशमुख, शंशाक देशमुख, तृष्णा शेतकरी मंडळ पुसद्याचे अध्यक्ष अनुज इंगळे, यांच्यासह मार्गदर्शक शामभाऊ देशमुख पुसदेकर यांची प्रमुख उपस्थिती होती.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अभिजित देशमुख, सुनिल नागपुरे, शाम राऊत, शाम अटाळकर,जय देशमुख, यश सगणे, यश कराळे, कार्तिक काळमेघ, कार्तिक बद्रे, प्रणय देशमुख, संदिप तळकित, श्रीकांत माहोरे, वैभव इंगळे, सचिन धारपाल आणि कुणाल देशमुख यांनी परिश्रम घेतले.कार्यक्रमाचे संचालन व आभार नुपुर भोंडे यांनी केले.शेवटी उपस्थित विद्यार्थ्यांना अल्पोपहार देवुन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

### ३२१ विद्यार्थ्यांनी साकारल्या पर्यावरणपूरक गणेशमूता

**अमरावती-** बडनेरा महानगरपालिका तसेच जिल्हा परिषद, अमरावती यांच्या सूचनेनुसार राजेश्वर युनियन हायस्कूल, बडनेरा येथील स्काऊट-गाईड, पर्यावरण मंडळ विभाग, लायन्स क्लब अमरावती प्राईड आणि राजनंदिनी स्मृती फाऊंडेशन, महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थ्यांसाठी पर्यावरणपूरक श्रीगणेश स्थापना व विसर्जन उत्सव हा नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात आला. शाळेतील संदीप अंबाडकर,माधवी ठाकरे, मोहन खानंदे व प्रणाली विदवांस यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी गणेशमूर्तींना विविध रंगछटा देत आपले कलागुण सादर केले. यामध्ये आर्या संजय सुने, सृष्टी विलास साखरे, अनन्या दिलीप फाटे, निर्मल योगेश भगत व निधी राजेश सुपारे, तर सकाळ विभागातून आराध्या रवी अंभोरे, चारू कुणाल जैन, श्रेयस पवन तायडे, वंशिका कमलेश रोतडे व श्रावणी प्रशांत सरडे यांनी उत्कृष्ट गणेशमूर्ती रंगवून पारितोषिक पटकावले. या उपक्रमाला सत्येन राघोर्ते,नीता गहरवाल,मनीषा राऊत व नीलिमा कांडलकर यांचे मार्गदर्शन लाभले.मोतीराम सैरिसे, अनिता मुगल, सुषमा कोठीकर, कृपेक्षा लांडोरे, अमृता मेहकरे व शिल्पा क्षार यांनी गणेशमूर्तींचे परीक्षण केले. विलास साखरे, किरण साखरे, मनीष टाले, नेहा टाले, सुरेश इंगळे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संदीप अंबाडकर यांनी केले, तर संचालन व आभारप्रदर्शन शिक्षिका प्रणाली विदवांस यांनी केले.

### आरोग्य तपासणी शिबीर

**अमरावती - म**हाराष्ट्र होमिओ डॉक्टर्स असोसिएशन अमरावती तर्फे संघटनेच्या अध्यक्षा डॉ स्वाती लबडे पडोळे यांच्या मार्गदर्शनाखाली श्री क्षेत्र पिंपळखुटा ता. धामणगाव रेल्वे जि. अमरावती (महा) येथे निशुल्क आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले.सर्वप्रथम संत श्री शंकरबाबा महाराज यांचे दर्शन घेऊन आश्रमाचे ट्रस्टी श्री दांगट साहेब यांच्या हस्ते शिबिराचे उदघाटन करण्यात आले.या वेळी डॉ नंदकिशोर भुतडा, डॉ विकास निनावे, डॉ चंदा निंभोरकर, डॉ प्रीती वर्मा, डॉ वैशाली टेम्भे उपस्थित होते.तसेच आश्रमाच्या कृषी महाविद्यालयाचे दिपक बोन्द्रे, राऊत,अनंत डुमरे, शिक्षक वृंद आणि विद्यार्थी उपस्थित होते.दरवर्षी प्रमाणे या वर्षी देखील श्री संत शंकर महाराज यांच्या ८२ वा प्रकटदिन महोत्सवाच्या निमित्ताने पिंपळखुटा येथे आरोग्य शिबीर घेण्यात आले.

## न्यु बॉईज गणेशोत्सव मंडळाचा हीरक महोत्सव

**आसेगाव पूर्णा/वार्ताहर**

अचलपूर तालुक्यातील सावळापूर येथील ग्रामस्थांचे श्रद्धास्थान असलेल्या न्यु बॉईज गणेशोत्सव मंडळाने यंदा ६० व्या वर्षात पदार्पण केले असून, हीरक महोत्सवी गणेशोत्सवाचा प्रारंभ मोठ्या उत्साहात करण्यात आला. भक्तिमय वातावरणात श्री गणेशमूर्तीची विधिवत स्थापना करण्यात आली.

गणेशमूर्तीच्या आगमनानिमित्त गावातून भव्य मिरवणूक काढण्यात आली. ढोल-ताशांचा गजर, गुलालाची उधळण आणि 'गणपती बाप्पा मोरया'च्या जयघोषाने संपूर्ण सावळापूर परिसर दुमदुमून गेला. मिरवणुकीत तरुणांसह बालगोपाल व महिलांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. मंडळाच्या ६० वर्षांच्या गौरवशाली परंपरेचे औचित्य साधून यंदाचा गणेशोत्सव विशेष स्वरूपात साजरा करण्यात येत आहे. हीरक महोत्सवानिमित्त वर्षभर विविध धार्मिक, सामाजिक व समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये आरोग्य शिबीर, रक्तदान तसेच पर्यावरणपूरक संदेश देणाऱ्या विविध स्पर्धांचा समावेश आहे.मंडळाचे अध्यक्ष, पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी केलेल्या शिस्तबद्ध नियोजनामुळे गणेश आगमन सोहळा उत्साहात पार पडला. ६० वर्षांची परंपरा जपणाऱ्या या हीरक महोत्सवी गणेशोत्सवात सावळापूर व परिसरातील नागरिकांनी सहभागी व्हावे आणि विविध उपक्रमांचा लाभ घ्यावा, असे आवाहन मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

## नगराध्यक्ष अविनाश गायगोले यांचा स्तुत्य उपक्रम

### सफाई कर्मचारी हस्ते गणपतीची विधिवत स्थापना

**अंजनगाव सुर्जी/वार्ताहर**

अंजनगाव सुर्जी येथील नगरपरिषद कार्यालयात दरवर्षी प्रमाणे यंदाही श्री गणपतीची स्थापना उत्साहात करण्यात आली. नगरपरिषद कर्मचाऱ्यां तर्फे गेल्या ३० वर्षांपासून ही परंपरा अविरतपणे सुरू आहे.यावर्षी या उत्सवाचे वैशिष्ट्य म्हणजे नगराध्यक्ष अविनाश गायगोले यांनी आरोग्य विभागातील सफाई कर्मचारी चेतन तांबे व त्यांच्या पत्नी खुशी तांबे यांच्या हस्ते गणपती मुर्तीची विधिवत स्थापना केली.

यावेळी सर्व नगरसेवक व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.सफाई कर्मचारी चेतन तांबे यांनी नगराध्यक्ष अविनाश गायगोले यांनी गणपती मुर्ती स्थापन करण्याचा मान दिला त्याबद्दल आभार मानले. लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सवाची सुरुवात १८९३ मध्ये केली. ब्रिटिशांच्या काळात भारतीयांना एकत्र येण्यास बंदी होती. हाच नियम टाळून लोक एकत्र यावेत आणि त्यांच्यात राष्ट्रप्रेम निर्माण व्हावे हा मूळ हेतू होता.उत्सवादरम्यान देशभक्तीपर गीते, प्रवचने आणि राजकीय-सामाजिक विषयांवर चर्चा घडवून आणल्या गेल्या.आपणही शहराच्या विकासासाठी सर्व धर्म समभाव या नात्याने एकजुट होऊन शहरातील विविध प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करू असे नगराध्यक्ष अविनाश गायगोले यांनी नगरसेवकांना संबोधित केले. यावेळी सर्व अधिकारी, कर्मचारी व नगरसेवक उपस्थित होते.नगरपरिषदेच्या गणपती मुर्तीची स्थापना व या उपक्रमामुळे शहरात सामाजिक सलोखा आणि एकतेचा संदेश गेला असून, पुढील दिवस नगरपरिषद परिसरात भक्तिमय वातावरण राहणार आहे.

## कापूस पिकांवर गुलाबी बोंडअळीचा वाढता धोका

**कुऱ्हा/वार्ताहर**

आधी पावसाचे संकट, नंतर दुबार पेरणी, मजूर समस्या, त्यानंतर रस शोषक किडींचा प्रादुर्भाव, त्यात भेसळ खते आणि बियाणे, यातच आता नवीन संकट म्हणजे बोंडअळी वाढण्याची शक्यता दिसत आहे. तसेच तिवसा भागात दरवर्षी कापूस पिकांचे उत्पादन मोठ्या प्रमाणात घेतले जातात पण बोंडअळी समस्या आणि मजूर समस्या मुळे कापसाचे उत्पन्न घटले आहे. त्यामुळे शेतकरी मित्रांनी लवकरात लवकर उपाययोजना करणे आवश्यक आहेत. विशेष म्हणजे एकात्मिक कीड व्यवस्थापन जैविक पद्धतीने करणे आवश्यक आहे.

त्यामुळे कापूस पिकातील सरकी बी ची मोठ्या प्रमाणात नुकसान होते. कापूस किडीक तयार होते. प्रतवारी संख्या घट होते. परिणामी बोंडे अकाली फुटतात, कापसाची प्रत खालावते आणि सरकीचे नुकसान होते. या पार्श्वभूमीवरपीक उगवणीनंतर ४० ते ४५दिवसांनी पिकाच्या उंचीनुसार जमिनीपासून किमान एक फूट उंचीवर एकरी पाच ते सहा कामगंध सापळे निरीक्षणासाठी लावावेत. तसेच, पीक उगवणीनंतर ३५ ते ४० दिवसांनी दर १५ दिवसांनी ५ टक्के निंबोळी अर्काची फवारणी करावी. पर्यायाने अझाडिरॅक्टिन ३०० पीपीएम ५० मिलिलिटर किंवा अझाडिरॅक्टिन १५०० पीपीएम २५ मिलिलिटर प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करता येते.बिव्हेरिया बॅसियाना २. १५ टक्के डब्ल्यू. पी. ५० ग्रॅम प्रति १० लीटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

### शाळा सुरू होऊन तीन महिने

## शिक्षक प्रशासकीय कामात, विद्यार्थ्यांच्या शिकण्याचा हिशोब कोण घेणार?

**अमरावती/का.प्र.**

राज्यातील शाळांना शैक्षणिक वर्ष सुरू होऊन जवळपास तीन महिने होत आले आहेत. या कालावधीत विद्यार्थ्यांची शैक्षणिक पायाभरणी मजबूत करणे, मागे राहिलेल्या विद्यार्थ्यांना मुख्य प्रवाहात आणणे तसेच वाचन, लेखन आणि गणितातील मूलभूत कौशल्ये विकसित करणे अपेक्षित असताना, शिक्षकांचा मोठा वेळ विविध प्रशासकीय व अशैक्षणिक कामांत खर्च होत असल्याची बाब समोर येत आहे.

राज्यातील शाळा १५ जूनपासून, तर विदर्भातील शाळा ३० जूनपासून सुरू झाल्या. शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीचे दिवस विद्यार्थ्यांसाठी अत्यंत महत्त्वाचे असतात. कोणता विद्यार्थी वाचनात मागे आहे, कोणाला गणितातील मूलभूत संकल्पना समजलेल्या नाहीत, कोणाला अधिक सरावाची आवश्यकता आहे आणि कोणत्या विद्यार्थ्याला वैयक्तिक मार्गदर्शनाची गरज आहे, याचा शोध घेऊन त्यावर काम करण्याचा हा काळ असतो.

**कमी शिक्षकांच्या शाळांमध्ये समस्या गंभीर**

कमी शिक्षक असलेल्या शाळांमध्ये परिस्थिती आणखी गंभीर असल्याचे शिक्षकांचे म्हणणे आहे. एखादा शिक्षक बाह्य प्रशासकीय कामासाठी गेल्यानंतर उर्वरित शिक्षकाने वर्ग सांभाळायचा की स्वतःचे प्रशासकीय काम पूर्ण करायचे, असा प्रश्न निर्माण होतो. अनेक ठिकाणी एका शिक्षकाला दोन-तीन वर्ग सांभाळावे लागतात. अशा परिस्थितीत प्रत्येक विद्यार्थ्याच्या शैक्षणिक गुणवत्तेकडे वैयक्तिक लक्ष देणे कितपत शक्य आहे, हा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

शिक्षकांकडून करण्यात आलेल्या प्रत्येक अशैक्षणिक कामाचा हिशोब घेतला जातो; मग त्या कामांमुळे विद्यार्थ्यांच्या अध्यापनातून किती वेळ कमी झाला, याचाही हिशोब शासनाने द्यावा, अशी मागणी शिक्षकांमधून होत आहे. मुख्याध्यापक महामंडळाचे लोमेश खैरकर म्हणाले, 'कमी शिक्षक असलेल्या शाळांमध्ये ही समस्या अधिक गंभीर आहे.

**'शिक्षकांचा प्रत्येक तास विद्यार्थ्यांसाठी असला पाहिजे'**

पोषण शक्ती योजनेच्या व्यवस्थापनासह विविध पोर्टल, सर्वेक्षणे, अहवाल आणि विभागीय कामांमध्ये शिक्षकांचा मौल्यवान अध्यापन वेळ खर्च होत असल्याचे मत प्राथमिक शिक्षक समितीचे राज्य प्रसिद्धी प्रमुख राजेश सावरकर यांनी व्यक्त केले. शिक्षकांच्या प्रशासकीय जबाबदाऱ्या आणि विद्यार्थ्यांच्या अध्यापनाचा वेळ यामध्ये योग्य समतोल साधला गेला नाही, तर शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीच्या या महत्त्वाच्या कालावधीचे नुकसान होण्याची शक्यता आहे. त्यामुळे 'शिक्षकांनी किती अहवाल भरले?' यापेक्षा शिक्षण क्षेत्रातून व्यक्त करण्यात येत आहे.

# शालेय विद्यार्थी वाहतुकीवर आरटीओ अमरावतीची धडक मोहीम

६५० स्कूल बसेसची तपासणी; १६५ वाहनांवर कारवाई, ४५ वाहने जप्त
अवैध विद्यार्थी वाहतूक करणाऱ्या २३ वाहनांवरही कारवाई

**अमरावती/का.प्र.**

शालेय विद्यार्थ्यांची सुरक्षित वाहतूक सुनिश्चित करण्यासाठी प्रादेशिक परिवहन कार्यालय, आरटीओ अमरावतीच्या सर्व तपासणी पथकांमार्फत अमरावती शहरासह जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये शालेय विद्यार्थी वाहतूक करणाऱ्या वाहनांची विशेष तपासणी मोहीम राबविण्यात येत आहे.

जून महिन्यापासून सुरू असलेल्या या विशेष मोहिमेत आतापर्यंत जवळपास ६५० स्कूल बसेसची तपासणी करण्यात आली आहे. तपासणीदरम्यान मोटार वाहन कायदा व संबंधित नियमांचे उल्लंघन आढळून आलेल्या १६५ स्कूल बसेसवर विविध गुन्ह्यांसाठी कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे.तसेच नियमांचे गंभीर उल्लंघन करणाऱ्या शालेय विद्यार्थी वाहतूक करणाऱ्या ४५ वाहनांना जप्त करण्यात आले असून, त्यामध्ये अवैध पद्धतीने शालेय विद्यार्थी वाहतूक करणाऱ्या २३ वाहनांचा समावेश आहे.

'सुरक्षित विद्यार्थी वाहतूक-सुरक्षित भविष्य' या उद्देशाने प्रादेशिक परिवहन कार्यालय, अमरावतीची ही तपासणी मोहीम आगामी काळातही अधिक प्रभावीपणे सुरू राहणार असून, विद्यार्थ्यांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देण्यात येणार आहे या तपासणी पथकामध्ये मोटार वाहन निरीक्षक प्रतीक रोडे, प्रमोद गोटे, निखिल रायकर, सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक कांचन जाधव, सतीश राठोड, दर्शना पिंपळकर, श्रुतिका गोपीवार, अंकिता सराफ, त्रृषिकेश पाटील, प्रशांत मालोकार, दत्तात्रय शिंदे आदी अधिकाऱ्यांचा समावेश होता. असे प्रादेशिक परिवहन कार्यालयाचे जनसंपर्क अधिकारी अनिल मानकर यांनी कळविले आहे.

**विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेशी तडजोड नाही**

प्रादेशिक परिवहन अधिकारी उर्मिला पवार-शालेय विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या वाहनांची तपासणी करताना वाहनांची वैध कागदपत्रे, फिटनेस, परवाना, सुरक्षिततेशी संबंधित आवश्यक बाबी तसेच विद्यार्थी वाहतुकीसाठी लागू असलेल्या नियमांचे पालन याबाबत विशेष दक्षता घेतली जात आहे.'शालेय विद्यार्थ्यांची सुरक्षित वाहतूक ही सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या बाबतीत कोणतीही तडजोड केली जाणार नाही. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या तसेच अवैधरीत्या विद्यार्थी वाहतूक करणाऱ्या वाहनांविरुद्ध मोटार वाहन कायद्यानुसार कठोर कारवाई सुरूच राहील,'- प्रादेशिक परिवहन परिवहन अधिकारी उर्मिला पवार यांनी स्पष्ट केले आहे.

**पालकांनीही दक्ष राहण्याचे आवाहन**

शाळा व्यवस्थापन, वाहनमालक, चालक तसेच पालकांनी विद्यार्थ्यांच्या वाहतुकीसाठी नियमांचे पालन करणारी व सुरक्षित वाहतूक व्यवस्था असलेली वाहनेच वापरावीत. विद्यार्थी वाहतूक करणाऱ्या वाहनांमध्ये कोणत्याही प्रकारची अनियमितता किंवा असुरक्षितता आढळल्यास संबंधितांनी प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या निदर्शनास आणून द्यावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय



# निर्माल्यापासून निर्मितीकडे इत्थंभूत पाणी

निर्माल्यापासून निर्मितीकडे हा केवळ एका उत्सवाचा संदेश नाही. तो श्रद्धेला पर्यावरणाशी, पर्यावरणाला अर्थव्यवस्थेशी आणि अर्थव्यवस्थेला मानवी कल्याणाशी जोडणारा नवा विचार आहे.

गणपती उत्सव संपल्यानंतर घराघरांत आणि सार्वजनिक मंडळांमध्ये उरते ते निर्माल्य. फुले, हार, दुर्वा, पत्री, पाने, नारळाचे अवशेष आणि पूजेसाठी वापरलेल्या अनेक जैविक वस्तूंचा त्यात समावेश असतो. आजपर्यंत आपण या निर्माल्याकडे प्रामुख्याने कचरा म्हणून पाहिले आहे आणि त्याची विल्हेवाट कशी लावायची, हा प्रश्न मानला आहे; पण दृष्टिकोन थोडा बदलला, तर हाच निर्माल्य कचरा न राहता एक जैविक संसाधन (ऑर्गेनिक रिसोर्स) बनू शकतो आणि त्यातून स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना देणारी एक छोटी परिपत्र अर्थव्यवस्था (सर्कुलर इकॉनॉमी) उभी राहू शकते. परिपत्र अर्थव्यवस्थेची मूलभूत कल्पना अत्यंत साधी आहे. वस्तू वापरून फेकून देण्याऐवजी त्यातून पुन्हा मूल्य निर्माण करायचे. निसर्गातून घेतलेले संसाधन शक्य तितक्या काळ अर्थव्यवस्थेच्या प्रवाहात ठेवायचे आणि जैविक पदार्थ शेवटी पुन्हा निसर्गाच्या चक्रात परतवायचे. निर्माल्य या संकल्पनेसाठी अत्यंत योग्य उदाहरण आहे. गणपतीला अर्पण केलेले फूल काही दिवसांत कचरा होत नाही. योग्य व्यवस्थापन केले, तर ते कंपोस्ट बनू शकते, मातीला सुपीक करू शकते आणि पुन्हा नव्या वनस्पतींच्या वाढीस हातभार लावू शकते.

याची सुरुवात घरापासून झाली पाहिजे. प्रत्येक कुटुंबाने निर्माल्य स्वतंत्रपणे जमा केले, तर त्यात प्लास्टिक, थर्माकोल आणि इतर अजैविक कचरा मिसळणार नाही. गणेशोत्सव मंडळानी, स्थानिक स्वराज्य संस्थांनी हे संकलन नियमितपणे करून पुढील प्रक्रियेसाठी स्थानिक महिला बचत गट, स्वयंसेवी संस्था, सामाजिक उद्योजक किंवा अधिकृत प्रक्रिया केंद्रांशी जोडले, तर निर्माल्याची एक व्यवस्थित मूल्यसाखळी (व्हॅल्यू चेन) तयार होऊ शकते

या मूल्यसाखळीतील पहिला टप्पा म्हणजे संकलन आणि वर्गीकरण. त्यानंतर निर्माल्यातील जैविक पदार्थांची योग्य प्रक्रिया करता येते. काही निर्माल्यापासून कंपोस्ट आणि गांडूळ खत तयार करता येते. काही फुलांपासून नैसर्गिक रंग मिळवता येतात. वाळलेल्या फुलांचा वापर अगरबत्ती, धूपकिंवा सुगंधी वस्तू तयार करण्यासाठी करता येतो. काही जैविक अवशेषांचे इतर जैविक प्रक्रियांमध्ये रूपांतर करता येते. अर्थात, प्रत्येक उत्पादनासाठी स्थानिक पातळीवरील तांत्रिक क्षमता, बाजारपेठ, गुणवत्ता आणि सुरक्षितता यांचा विचार करणे आवश्यक आहे. निर्माल्यापासून काहीही तयार करता येते असा अवास्तव दावा न करता जिथे प्रत्यक्ष आर्थिक व्यवहार्यता आहे तिथेच मूल्यवर्धन करणे महत्त्वाचे आहे

इथेच रोजगाराची मोठी शक्यता निर्माण होते. निर्माल्य गोळा करण्यापासून त्याचे वर्गीकरण, वाहतूक, वाळवणे, प्रक्रिया, उत्पादन, पॅकेजिंग आणि विक्रीपर्यंत अनेक लहान रोजगार निर्माण होऊ शकतात. विशेषतः महिला बचत गट आणि युवकांसाठी ही एक स्थानिक हरित रोजगाराची (ग्रीन जॉब्स) संधी ठरू शकते. एखाद्या शहरात वर्षभर धार्मिक कार्यक्रम, मंदिरांमधील पुष्पकचरा आणि गणेशोत्सवासारखे सण मोठ्या प्रमाणावर होत असतील, तर त्यातून सातत्यपूर्ण कच्चा माल उपलब्ध होऊ शकतो. त्यामुळे ही केवळ गणेशोत्सवापुरती मोहीम न राहता वर्षभर चालणाऱ्या सूक्ष्म उद्योगात रूपांतरित होऊ शकते. यामध्ये गणेश मंडळे अथवा स्थानिक स्वराज्य संस्था संकलनाची जबाबदारी घेऊ शकतात. स्वयंसेवी संस्था जनजागृती आणि प्रशिक्षण देऊ शकतात. महिला बचत गट प्रक्रिया आणि उत्पादन करू शकतात. स्थानिक उद्योजक विक्री आणि विपणनाची जबाबदारी घेऊ शकतात. अशाप्रकारे एकाच समस्येभोवती अनेक घटक एकत्र आले, तर स्थानिक अर्थव्यवस्थेची नवी साखळी तयार होऊ शकते

या प्रक्रियेचा सर्वांत सुंदर भाग असा आहे की, त्यातून पैसा निर्माण होतानाच पर्यावरणीय मूल्यही निर्माण होते. नदीत जाणारा जैविक कचरा कमी होतो. कचरा व्यवस्थापनावरील काही भार कमी होतो. रासायनिक खतांवरील अवलंबित्व काही प्रमाणात कमी करण्यासाठी जैविक खत उपलब्ध होते. स्थानिक रोजगार वाढतो. महिलांना उत्पन्नाचे साधन मिळते. युवकांना सामाजिक उद्योजकतेची संधी मिळते आणि नागरिकांना आपल्या उत्सवाचा पर्यावरणीय ठसा कमी करण्याचा मार्ग मिळतो. म्हणजेच आजचे निर्माल्य उद्याच्या स्थानिक संसाधन व्यवस्थापनाचा पाया बनू शकतो.

महाराष्ट्राने जलसंवर्धन, स्वच्छता आणि पर्यावरण याबरोबरच अशा परिपत्र अर्थव्यवस्थेच्या प्रयोगांमध्येही नेतृत्व करण्याची क्षमता दाखवली पाहिजे. गणपती उत्सव हा केवळ श्रद्धेचा आणि संस्कृतीचा उत्सव नाही, तर सामूहिक कृतीची प्रचंड क्षमता असलेला सामाजिक मंच आहे. या मंचाचा उपयोग आपण नदी स्वच्छ ठेवण्यासाठी, कचरा कमी करण्यासाठी आणि रोजगार निर्माण करण्यासाठी करू शकतो. निर्माल्याची खरी किंमत त्याच्या वजनात नाही. त्यातून निर्माण होणाऱ्या नव्या मूल्यामध्ये आहे. कालपर्यंत देवाच्या चरणी अर्पण केलेले फूल आपण वापरून संपलेली वस्तू मानत होतो. उद्या तेच फूल एखाद्या शेताच्या मातीत परतू शकते, एखाद्या महिलेच्या छोट्या उद्योगाचे उत्पन्न बनू शकते, एखाद्या युवकाच्या सामाजिक उद्यमाची सुरुवात करू शकते आणि एखाद्या नदीला प्रदूषणापासून वाचवू शकते.

म्हणून यंदाच्या गणेशोत्सवात आपण एक छोटा पण महत्त्वाचा बदल करूया. निर्माल्याची विल्हेवाट लावू नका. त्याचे मूल्य ओळखा. कारण, निर्माल्याचा शेवट कचऱ्यात होणे आवश्यक नाही. योग्य विचार, योग्य व्यवस्था आणि सामूहिक सहभाग असेल, तर त्याचा प्रवास निर्मितीकडे होऊ शकतो. निर्माल्यापासून निर्मितीकडे हा केवळ एका उत्सवाचा संदेश नाही. तो श्रद्धेला पर्यावरणाशी, पर्यावरणाला अर्थव्यवस्थेशी आणि अर्थव्यवस्थेला मानवी कल्याणाशी जोडणारा नवा विचार आहे आणि हे तेव्हाच होऊ शकते जेव्हा आपण स्वतः नदीशी, जलस्रोतांशी मनापासून जोडले जाऊ. आपले जलस्रोत प्रदूषणमुक्त ठेवण्यासाठी निर्माल्यापासून निर्मितीकडे जावेच लागेल.

**डॉ. मंगेश कष्यप**

# भारतीय लोकशाही आणि नागरिकांची उदासीनता

दरवर्षी १५ सप्टेंबर हा दिवस जगभरात 'आंतरराष्ट्रीय लोकशाही दिन' म्हणून साजरा केला जातो. लोकशाही ही केवळ शासनव्यवस्था नसून स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुता, मानवी प्रतिष्ठा आणि जनसहभाग यांवर आधारलेली जीवनपद्धती आहे. लोकशाहीमध्ये जनता ही सत्तेचा अंतिम स्रोत मानली जाते. नागरिकांना आपल्या प्रतिनिधींची निवड करण्याचा अधिकार असतो आणि निवडून आलेल्या प्रतिनिधींनी जनतेपुढे उत्तरदायी राहणे अपेक्षित असते. भारताने स्वातंत्र्यानंतर लोकशाही प्रजासत्ताकाचा स्वीकार करून विविधतेने नटलेल्या विशाल देशात लोकशाही व्यवस्था यशस्वीपणे रुजविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले. सार्वत्रिक प्रौढ मताधिकार, स्वतंत्र निवडणूक व्यवस्था, संविधानिक संस्था आणि कायद्याचे राज्य या आधारांवर भारतीय लोकशाहीची वाटचाल झाली. मात्र, लोकशाहीच्या या प्रवासात एक गंभीर आव्हान सातत्याने जाणवते ते म्हणजे नागरिकांची वाढती उदासीनता होय. मतदानापुरते नागरिकत्व मर्यादित राहणे, सार्वजनिक प्रश्नांकडे दुर्लक्ष करणे, शासनाच्या कामकाजाची माहिती न घेणे, चुकीच्या माहितीवर सहज विश्वास ठेवणे आणि आपल्या अधिकारांइतकीच कर्तव्येही महत्त्वाची आहेत याची जाणीव कमी होणे, या प्रवृत्ती लोकशाहीसाठी चिंताजनक आहेत. लोकशाही मजबूत करण्यासाठी सक्षम संस्था जितक्या आवश्यक आहेत, तितकाच जागरूक, विवेकी आणि सक्रिय नागरिकही आवश्यक आहे.

लोकशाहीतील नागरिकांची उदासीनता दूर करण्यासाठी शिक्षण आणि मूल्यसंस्कार यांना विशेष महत्त्व आहे. लोकशाहीचे शिक्षण केवळ पाठ्यपुस्तकातील धड्यापुरते मर्यादित राहता कामा नये. विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष चर्चेत सहभागी करून घेणे, त्यांना प्रश्न विचारण्यास प्रोत्साहन देणे, मतभिन्नतेचा आदर शिकविणे आणि संविधानिक मूल्यांचा व्यवहारात उपयोग करून दाखविणे आवश्यक आहे. घर, शाळा, महाविद्यालय आणि समाज या सर्व स्तरांवर संवादाची संस्कृती विकसित झाली तर लोकशाही वृत्ती अधिक मजबूत होईल. स्वतःचे मत मांडताना दुसऱ्याचे मत ऐकण्याची तयारी ही लोकशाहीची मूलभूत शिस्त आहे.

आंतरराष्ट्रीय लोकशाही दिनाच्या निमित्ताने त्यामुळे प्रत्येक नागरिकाने स्वतःला एक प्रश्न विचारण्याची गरज आहे की आपण केवळ मतदार आहोत की सक्रिय नागरिक? आपल्या परिसरातील सार्वजनिक प्रश्नांची आपल्याला माहिती आहे का? आपण लोकप्रतिनिधींना प्रश्न विचारतो का? शासनाच्या योजनांची माहिती घेतो का? चुकीची माहिती पुढे पाठविण्यापूर्वी तिची सत्यता तपासतो का? मतभिन्न असलेल्या व्यक्तीच्या मताचा सन्मान करतो का? संविधानाने दिलेल्या अधिकारांसोबत आपल्या कर्तव्यांची जाणीव ठेवतो का? या प्रश्नांची प्रामाणिक उत्तरे भारतीय लोकशाहीच्या वर्तमानाचे चित्र स्पष्ट करू शकतात.

घरात प्रत्येकाचे मत ऐकले जाते तेव्हा, शाळेत प्रश्न विचारण्यास प्रोत्साहन दिले जाते तेव्हा, समाजात भिन्न मतांचा आदर केला जातो तेव्हा आणि सार्वजनिक संस्थांना जबाबदार धरले जाते तेव्हा लोकशाही मजबूत होते.

**डॉ. राजेंद्र बगाटे**

# सामाजिक बांधिलकीचा प्रेरणादायी प्रवास-ॲड. आशिष लांडे

नव चैतन्यांने हिरवा शालू घालून नटलेल्या धरतीवर श्रावण सरीचा आनंद ओसरताच निसर्गाने आपली कुस बदलली. भाद्रपद महिन्याचे आगमन झाले. सर्वसृष्टी गणरायाच्या आगमनासाठी ढोल ताशाच्या गजरात सज्ज झाली. एकवीरा देवी व अंबादेवी यांच्या पावनस्पर्शाने पुनीत झालेली पुण्यभूमी अमरावतीत ऋषिपंचमीच्या पावन मुहूर्तावर आई शकुंतलाबाई व वडील कृष्णराव लांडे यांच्या संसार वेलीवर एडवोकेट आशिष लांडे यांचा सप्टेंबर १९७८ ला ऋषीपंचमी रोजी जन्म झाला.

वाढदिवस हा प्रत्येकाच्या आयुष्यातील महत्त्वाचा दिवस. वाढदिवस हा वय वाढल्याचा दिवस नसून आयुष्यातील एक वर्ष कमी झाल्याची जाणीव आहे. वाढदिवस सांगतो की वेळ वेगाने निघून जात आहे, म्हणून प्रत्येक क्षणाचा आनंद घ्या व चांगले कर्म करत राहा. ॲड आशिष लांडे कुशाग्र बुद्धीचे धनी आहेत. त्यांनी खडतर आणि संघर्षमय प्रवास करून जिवाभावाची माणसे जोडली. वकिली क्षेत्रात करिअर घडवले. घरची परिस्थिती जेमतेम, आयुष्यात लाभलेल्या काही माणसांचा सहवास आणि मार्गदर्शन हे परिस स्पर्शाप्रमाणे असते. असा सहवास लाभला तो कैलासवासी प्राध्यापक डॉक्टर रवींद्र वैद्य यांचा. वकिलीचा पहिला कोट सुद्धा या सद गृहस्थांनी घेऊन दिला. 'विद्या विनयन शोभते' या सुभाषिताप्रमाणे विनयशील, चिकित्सक न्यायाच्या टोकापर्यंत जाणारे हे हाडाचे वकील आहेत. न्यायालयात सामंजस्य करून अनेक घरांना, व्यक्तींना जोडणारा हा समुपदेशक दुवा आहे.

सामाजिक भान राखून समाजाचे काही देणे आहे या विचाराने समाजपयोगी कार्य करून सामाजिक बांधिलकी जपणारा, समाजकारणा सोबतच राजकीय नाडी ओळखून माजी खासदार अनंतराव गुढे, आनंदराव अडसूळ, माजी पालकमंत्री सुनील भाऊ देशमुख, आ.रवी राणा, खा.नवनीत राणा, खोडके दांपत्य या सर्वपक्षीय नेत्यासोबतचे असलेले सौदार्यपूर्ण संबंध आशिष च्या यशात कौतुकाचा तुरा म्हणून शोभतात. कला व सांस्कृतिक आवड म्हणून त्यांचे वकील क्षेत्रातील गुरु एडवोकेट प्रशांत भेलांडे सर यांचे मार्गदर्शन त्यांच्यासाठी मोलाचे ठरले. आजच्या युगातील श्रावण बाळ म्हणून ओळखले जाणारे हे एक व्यक्तिमत्व आहे. आई-वडिलांचा वाढदिवस भव्य दिव्य प्रमाणात साजरा केला. सामाजिक दायित्वाची जाणीव ठेवून त्यांनी रक्तदान शिबिरे वृद्धाश्रमात दान, विद्यार्थ्यांना शालेय उपयोगी वस्तूंचे वाटप करून सामाजिक ऋण फेडण्याचा प्रयत्न केला. अमरावती बार असोसिएशनचे उपाध्यक्ष पद भूषविले. महात्मा फुले को-ऑपरेटिव्ह बँक येथे तज्ञ संचालक म्हणून जबाबदारी पार पाडत आहेत. गणेशोत्सव असो की नवरात्र उत्सव अशा कार्यात तनमनाने ते भाग घेतात. प्रतिकूल परिस्थितीवर मात करून जीवनात एक एक यशाची पायरी चढत आज आपण वयाची ४७ वर्ष पूर्ण केलीत. आपल्या यशाचा आलेख असाच उंच उंच वर चढत जावो. आपण आयुष्यमान तसेच आरोग्य संपन्न व्हावे हीच या शुभ दिवशी शुभेच्छा. परमेश्वराचा वरदहस्त नेहमी तुमच्या डोक्यावर राहो. पुढील वाटचालीस शुभेच्छा! सूर्यासारखा तेजस्वी हो, चंद्रासारखा शितल हो, फुलासारखा मोहक हो, आणि कुबेरा सारखा ऐश्वर्य वान हो. वाढदिवसाच्या लाख लाख शुभेच्छा!

**ममता सुनील गोबरे**
चिटणवीस नगर, नागपूर

# 'ऋषीपंचमी' एक अवलोकन

आज भाद्रपद शुक्ल पंचमी अर्थात ऋषिपंचमी. भारतीय संस्कृतीत ऋषिपंचमी ही तिथी ऋषीं विषयी श्रद्धा, कृतज्ञता, आणि आत्मिक शुद्धीचा संदेश देणारा महत्त्वाचा धार्मिक दिवस आहे. जगातील सर्वश्रेष्ठ असलेल्या भारतीय संस्कृतीच्या जडणघडणीत ऋषीमुनींचे योगदान अत्यंत महत्तम आहे. निसर्गाला केवळ संसाधन न मानता मानवी जीवनाचे आधार मानण्याची दृष्टी सर्वप्रथम ऋषींनी दिली. वृक्ष, नद्या, पर्वत व अन्य जैवविविधतेचा आदर व पर्यावरणाचे संरक्षण ही जबाबदारी नसून आपले आध्यात्मिक कर्तव्य असल्याचा उदात्त विचार हजारो वर्षांपूर्वी समाजात ऋषींनी दिला. यातून ऋषींचे निसर्गाशी असलेले नाते स्पष्ट होते.

ऋषी केवळ तपस्वीच नव्हेतर ते अज्ञानरुपी अंध:कारात, मोह मायेने गांजलेल्या विश्वात सत्याचा शोध घेऊन ज्ञानदीप उजळून आसमंत प्रकाशित करतात. शारीरिक, मानसिक आणि वैचारिक दुर्बलतेला प्रबळतेत रूपांतर करण्याचे सामर्थ्य ऋषींच्या अंगी आहे. वेद, उपनिषदे, पुराणे, महापुराणे ही ऋषींची ज्ञानदेणगी होय. योग, ध्यान, तत्त्वज्ञान, अध्यात्म, आयुर्वेद, गणित, खगोलशास्त्र, शरीरशास्त्र, भाषाशास्त्र, कृषी अशा विविध क्षेत्रात ऋषींचे योगदान राहिलेले आहे. जगातील सर्वात प्राचीन भारतीय संस्कृतीत, महर्षी कश्यप, अत्री, भारद्वाज, विश्वमित्र, गौतम जमदाग्नी आणि वशिष्ठ या सप्तऋषींचे योगदान फार मोठे व अवर्णनीय आहे. याशिवाय ऋषीपरंपरेत स्त्री ऋषींचेही योगदान राहिले आहे. ज्यामध्ये गार्गी व मैत्रेयी सारख्या विदुषींचा उल्लेख होतो.

प्राचीन ऋषींच्या ज्ञानपरंपरेचे समीक्षा करताना आत्मा, ब्रह्म, कर्म, मोक्ष, पुरुषार्थ, सत्य आणि मानवी जीवनाच्या अर्थाचा सखोल विचार ऋषींनी मांडला आहे. शरीर, मन, चित्त यांच्यामधला चित्ताच्या संबंधाचा अभ्यास, तसेच योगसूत्राची परंपरा महर्षी पतंजलि यांच्या योगसूत्राशी जोडली जाते. आर्यभटांचे गणित व खगोल शास्त्रीय कार्य ऋषीपरंपरेत विशेष उल्लेखनीय आहे. सामाजिक आचार विचार, आहार विहार, कर्तव्य, सत्य, अहिंसा, संयम, दान, परोपकार आणि सामाजिक दायीत्वाच्या भावनेचे मार्गदर्शन ऋषी परंपरेत आढळते. ज्ञान केवळ ग्रंथापुरते सिमित न राहता प्रत्यक्ष आचरणातून पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचण्याची व्यवस्था ऋषींच्या गुरुशिष्य परंपरेतून चालत आलेली आहे. ज्ञानार्जनासोबत आदर्श चरित्र, अनुशासन आणि नीती मूल्यांवर आधारित शिक्षणासाठी गुरुकुल पद्धती सामाजिक परिवर्तनासाठी प्रभावशाली ठरली. धर्माचरणाच्या सात्विक मार्गावर चालत असताना, आदर्श राज्य व्यवस्थेसाठी ऋषींचे मौलिक कामगिरी युगानुयुगे स्मरणात राहणारी आहे. आजची ऋषीपंचमी ही ज्ञानपरंपरेचे संजीवक असलेल्या ऋषींचे स्मरण त्यांच्या कार्यप्रति कृतज्ञता आणि आत्मचिंतनाचा दिवस होय.

**शशिकांत तोटे**

## ।श्री पुण्यतिथी शेगाव।

निस्वार्थ श्रध्देने जो
होतो लीन श्री चरणा

त्यांची इडापिडा टाळण्या
तत्पर संत गजानन राणा ..!

समाधिस्त झाले जरी
भाविकांना येते प्रचीती

उगीच का संत नगरीला
होते भक्तांची तोबा गर्दी ?.. !

अध्यात्म विज्ञान सेवेचा
अप्रतिम संगम आहे इथे
असे निष्कलंक संस्थान
जगात आहे कां कुठे ? .. !

संस्थान पुरविते भक्तांना
विविध प्रकारच्या सेवा
लुट भ्रष्टाचाराचा इवलासा
इथे लवलेश नसे भावा . . !

**प्रा अशोक सारडा** मेहकर
(९४२१३९४३३९)

**लंडनच्या धुक्यात रुंजी घालणारा ढोल-ताशांचा ठेका असो वा न्यू जर्सीतील नावीन्यपूर्ण 'ड्राइव्ह-थ्रू' दर्शन; परदेशी भूमीवरही बाप्पाच्या भक्तीचा हा भावतरंग अजिबात कमी होत नाही. तिथल्या नियम चौकटीत राहून, पण अंतःकरणातील भक्तीचा तोच ठेका जपणाऱ्या अनिवासी भारतीयांच्या या अनोख्या गणेशोत्सवाची ही रसाळ सफर...**

# ग्लोबल बाप्पा....!

'नाटक बसवणं आणि गणेशोत्सव साजरा करणं हा आमचा जन्मसिद्ध हक्क आहे' ही भावना उराशी बाळगून जगाच्या पाठीवर कुठेही गेलेला मराठी माणूस आपली संस्कृती सोबत घेऊनच प्रवास करतो. लंडनच्या धुक्यात रुंजी घालणारा ढोल-ताशांचा ठेका असो वा न्यू जर्सीतील नावीन्यपूर्ण 'ड्राइव्ह-थ्रू' दर्शन; परदेशी भूमीवरही बाप्पाच्या भक्तीचा हा भावतरंग अजिबात कमी होत नाही.

आपल्या गावचा आंबा आणि आपल्या घरच्या गणेश पूजेतील मोदक हे प्रत्येकासाठी खास असतात. त्याची चव काही वेगळीच! ती चव मनात असते, जिभेवर नाही. दूरदेशी गेल्यानंतर या दोन्ही गोष्टी आता चुकणार याची हुरहूर मनाला लागून राहते. 'गणपती बाप्पा' नंतर 'मोरया' या आरोळीसाठी आसुसलेलं अस्सल मराठी मन चुकचुकतं. पण चार मराठी डोकी एकत्र आली की, 'नाटक बसवणं आणि गणेशोत्सव साजरा करणं हा आमचा जन्मसिद्ध हक्क आहे.' असं टिळकांच्या थाटात म्हणतात आणि तो मिळवल्यावर त्यांना होणारा आनंद अवर्णनीय असतो.

अमेरिकेत बहुतांश मराठी घरांमध्ये गणपतीची साग्रसंगीत पूजा होते. वाडवडिलांकडून परंपरेने चालत आलेल्या व्रतवैकल्यांमध्ये गणपती पूजन अगदी मनोभावे केलं जातं. आदल्या दिवशी आरास सजते. यूट्यूब गुरुजींचा खडा स्वर घुमत असतो. शाडूच्या छोट्याशा मूर्तीची प्राणप्रतिष्ठा होते. मग झांजा आणि टाळ्यांच्या ठेक्यावरील आरत्यांचा गजर, अथर्वशीर्षाच्या आवर्तनांचा धीरगंभीर सामूहिक स्वर, सुवासिक वरण-भात-तुपाची मूद असलेलं नैवेद्याचं ताट आणि त्यामागून येणारा एकवीस मोदकांचा दरवळ. हे सगळं अमेरिकेत शक्य होतं. कारण तिथे मराठी मंडळी पुष्कळ आहेत; त्याचबरोबर या सणासाठीची सामग्री पुरवणारी दुकानंही भरपूर आहेत. गणेश चतुर्थी शनिवार, रविवारी आली तर उत्तम, नाहीतर छोटीशी पूजा आटोपून साप्ताहिक सुट्टीच्या दिवशी त्याचा उत्सव साजरा करायचा ही तिथली पद्धत. मात्र काही हौशी मंडळींना या घरगुती पूजेव्यतिरिक्त काही सांस्कृतिक कार्यक्रम, लहानग्यांसाठी स्तोत्रपठण स्पर्धा, पारंपरिक वेशभूषा परेड, जमलं तर एखादं नाटुकलं असा खास सार्वजनिक गणेशोत्सव करण्याची हुक्की येते. स्थानिक महाराष्ट्र मंडळं तर हे काम मोठ्या प्रमाणावर करतातच; पण छोट्या छोट्या ग्रुपमध्येही हा उत्साह दिसून येतो. अमेरिकेत राहणाऱ्या दुसऱ्या आणि तिसऱ्या पिढीतील मराठी मुलांना आपल्या मूळ संस्कृतीशी जोडून ठेवण्यासाठी गणेशोत्सव हे एक प्रभावी साधन बनलेलं आहे. मुंबईत वाढलेले अमराठी लोकही आपल्या गल्लीबोळांमधले गणपती उत्सव आठवून या समारंभात सहभागी होतात.

परदेशात खरी पंचाईत होते ती गणपती विसर्जनाची. लांबलचक समुद्रकिनारे किंवा भलेमोठे नैसर्गिक तलाव असलेल्या देशांमध्ये विसर्जनाची समस्या खरं तर व्हायला नको; पण त्या देशातील जलप्रदूषणाच्या कडक नियमांमध्ये ते बसत नाही. मग त्यावर तोडगा निघाला 'टब' विसर्जनाचा. कल्पना करा, स्वित्झर्लंडच्या आल्प्स पर्वतांच्या पार्श्वभूमीवर नऊवारी साड्या, केसांचे अंबाडे आणि नाकात नथी घातलेल्या मराठी बायका नि कुर्ता- पायजमा घातलेले पुरुष वाजतगाजत आणलेली मूर्ती एका टबात विसर्जित करत आहेत. त्यावेळी त्यांच्या मनात भारतातला समुद्रकिनारा किंवा गावातील नदी, तलाव आणि 'पुढच्या वर्षी लवकर या' अशी गळ घालत गणपती बाप्पाला दिलेला निरोप नक्कीच जिवंत होऊन उठत असेल. परदेशातील ही इको फ्रेंडली पद्धत कोविडपासून आपल्याकडेही रूढ झाली आहे. शाडूच्या मूर्तीचा एकेक अवयव टबातील पाण्यात विरघळताना बघणं क्लेशदायी असलं तरी ते जीवनाच्या क्षणभंगुरतेचं मोठं तत्त्वज्ञान शिकवून जातं. 'माती सांगे कुंभाराला.. तुझाच आहे शेवट वेड्या माझ्या पायाशी..'

मात्र लंडनमधील टेम्स नदीत अगदी भारतात करतो तसं होडीतून बाप्पाला घेऊन जाऊन विसर्जन केलं जातं. अर्थात त्यासाठी पोर्ट ऑफ लंडन ॲथॉरिटी आणि स्थानिक प्रशासनाकडून रीतसर परवानगी मिळवलेली असते. भाड्याने घेतलेल्या या होडीत मूर्तीसोबत मंडळाची काही मोजकीच माणसं नदीच्या पात्रात अगदी मध्यभागी जाऊन विसर्जन करतात. मूर्ती शाडूचीच असावी आणि कुठल्याही घातक रसायनांनी रंगवलेली नसावी; त्याचबरोबर प्लास्टिक व निर्माल्य नदीत टाकण्यास मनाई अशा नियमांचं उल्लंघन न करण्याची काळजी महाराष्ट्र मंडळं घेतात.

जर्मनीसारख्या शिस्तप्रिय देशात मात्र नदीत प्रत्यक्ष विसर्जन न करता नदीकाठी विसर्जनाची सांकेतिक पूजा केली जाते. मूर्तीला केवळ नदीच्या पाण्याचा स्पर्श करून मग ती घरातील टबात विसर्जित करून त्याचे पाणी बागेतील झाडाझुडुपांना घातले जाते. 'ताल जर्मनी' सारखी स्थानिक ढोल-ताशा पथके गेल्या काही वर्षांत तिथे खूप प्रसिद्ध झाली आहेत.

गणेश उत्सवात आढळणारा मराठी माणसाचा उत्साह, गणेशावरील सहज स्फुरणारा स्नेह आणि 'गणपती बाप्पा' हे दोन शब्द ऐकताच क्षणात जागी होणारी त्यांची अस्मिता, याचं दर्शन जिथे बहुसंख्येने स्थलांतरित भारतीय आहेत त्या देशात तर होतंच; पण जिथे हाताच्या बोटावर मोजण्याइतकी भारतीय कुटुंब असतात तिथेही भाद्रपदात 'सुखकर्ता दुःखहर्ता' चा गजर अगदी हमखास ऐकू येतो.

परदेशातील या गणेशोत्सवाची रूपं वेगळी असतील, नियम-कायदे कडक असतील किंवा विसर्जनाची जागा टबमधील पाणी असेल; पण त्यामागे धडकणारं मराठी मन मात्र शंभर टक्के 'अस्सल' असतं. सात समुद्रापार राहूनही संस्कृतीची ही वीण घट्ट जपणाऱ्या आणि पुढच्या पिढीला ती अभिमानाने देणाऱ्या प्रत्येक अनिवासी भारतीयाच्या मनात, भाद्रपदात जेव्हा हा गजर घुमतो- 'गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या!' तेव्हा तिथल्या उत्तुंग इमारती आणि स्वच्छ रस्ते क्षणभरासाठी ओसरतात आणि डोळ्यांसमोर उभा राहतो तो फक्त आपला देश, आपलं घर आणि तोच जुना, आपुलकीचा अन् जिव्हाळ्याचा बाप्पा!

**मेधा आलकरी**

■ मंगळवार, १५ सप्टेंबर २०२६
paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

अकोला
जिल्हा विशेष

# महानगर काँग्रेसची मासिक बैठक
# ‘हक्काचं शहर’साठी कृती आराखडा

## नागरिकांच्या मूलभूत प्रश्नांवर थेट प्रशासनाशी पाठपुरावा ; प्रत्येक झोनमध्ये समिती स्थापन करण्याचा निर्णय

■ प्रतिनिधी | अकोला ■

अकोला महानगर काँग्रेस कमिटीची मासिक बैठक रविवार, १३ सप्टेंबर रोजी स्वराज्य भवन येथे जिल्हाध्यक्ष महेंद्र गवई यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. शहरातील नागरिकांचे मूलभूत प्रश्न, ‘हक्काचं शहर’ उपक्रम आणि आगामी निवडणुकांच्या अनुषंगाने पक्षाची संघटनात्मक तयारी यावर बैठकीत चर्चा करण्यात आली.

‘हक्काचं शहर’ या उपक्रमाच्या माध्यमातून शहरातील नागरिकांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याबाबत बैठकीत चर्चा करून त्यासाठी कृती आराखडा तयार करण्यात आला. तसेच शहरात ‘शॅडो जनरल बॉडी’ स्थापन करण्याच्या प्रक्रियेलाही सुरुवात करण्यात आली आहे. यामध्ये ज्येष्ठ नागरिक संघ, स्वयंसेवी संस्था, युवक तसेच सामाजिक क्षेत्रातील विविध घटकांचा समावेश केला जाणार आहे.

शहरातील नागरिकांच्या मूलभूत समस्या थेट जाणून घेण्यासाठी महानगर काँग्रेस कमिटीचे ब्लॉक अध्यक्ष आपल्या-आपल्या भागात सक्रिय राहणार आहेत. प्रभागातील नागरिकांशी प्रत्यक्ष संवाद साधून पाणी, रस्ते, स्वच्छता, आरोग्य, पथदिवे यासह विविध नागरी समस्यांची माहिती घेण्यात येणार आहे. या समस्या संबंधित अधिकारी तसेच महापालिका आयुक्तांसमोर मांडून त्यावर तोडगा काढण्यासाठी काँग्रेस कमिटीच्या माध्यमातून पाठपुरावा केला जाणार आहे.

### आगामी निवडणुकांची तयारी

आगामी काळात होणाऱ्या विविध निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस पक्षाची संघटनात्मक तयारी सुरू करण्याबाबतही बैठकीत चर्चा झाली. शहरातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी नागरिकांशी सातत्याने संपर्क ठेवून पक्षाची संघटना अधिक मजबूत करण्याच्या सूचना देण्यात आल्या. बैठकीला संघटन महासचिव योगेश पाटील, उत्तर ब्लॉक अध्यक्ष प्रशांत प्रधान, पूर्व ब्लॉक अध्यक्ष विनोद नालट, उपाध्यक्ष विजयकुमार तिवारी, मनिष मिश्रा, सैय्यद खुर्रम, श्रीकांत सरोदे, किशोर आरुळकर, शुभम गोळे, रफीउल्ला खान, दीपक गवई, गणेश टाले, ॲड. संतोष गोळे पाटील, इस्माईल भाई टीव्ही, रवि पाटणे, सुनील वानखडे, प्रमोद गवई, बाळासाहेब तेलमोरे यांच्यासह कार्यकारिणीतील पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

### प्रत्येक झोनमध्ये समिती

महानगर काँग्रेसच्या वतीने शहरातील प्रत्येक झोनमध्ये समिती स्थापन करण्याचा निर्णयही बैठकीत घेण्यात आला. या समित्यांच्या माध्यमातून स्थानिक नागरिकांच्या समस्या जाणून घेऊन त्या प्रशासनापर्यंत पोहोचविण्यात येणार आहेत. केवळ समस्या मांडण्यापुरते मर्यादित न राहता त्यावर प्रशासनाकडून काय कार्यवाही झाली, याचाही पाठपुरावा करण्यात येणार असल्याचे बैठकीत स्पष्ट करण्यात आले.

# टिळक राष्ट्रीय सरस्वती मंदिर शाळेत १,१५० वृक्षांचा ‘ऑक्सिजन झोन’!

- मियावाकी घनवनातून वृक्षांची लागवड व संवर्धन
- महापालिका व माजी विद्यार्थी संघाचा हरित उपक्रम

■ प्रतिनिधी | अकोला ■

शहराच्या वाढत्या प्रदूषणाला आळा घालत अकोल्याला हिरवेगार, सुंदर आणि निरोगी बनविण्याच्या उद्देशाने टिळक राष्ट्रीय सरस्वती मंदिर, मोठी उमरी परिसरात मियावाकी घनवन साकारण्यात आले. यामध्ये १ हजार १५० वृक्षांची लागवड व संवर्धन करत उभारण्यात आलेला ऑक्सिजन पार्क हरित भविष्यासाठी पाऊल ठरणार आहे.

महानगरपालिका अकोला, माजी विद्यार्थी संघ टिळक राष्ट्रीय सरस्वती मंदिर, मोठी उमरी, Adopt a Tree Campaign आणि शुभंकरोती फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवार, १४ सप्टेंबर रोजी सकाळी ९ वाजता टिळक राष्ट्रीय सरस्वती मंदिर परिसरात या वृक्षारोपण महामोहीमेला सुरुवात करण्यात आली. या वृक्षारोपण उपक्रमाला अप्पर पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी तसेच सुप्रसिद्ध व्यावसायिक भैय्यासाहेब उजवणे, माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष दिगंबर वनारे, डॉ. निलेश कोरडे, निलेश सोनी यांची प्रमुख उपस्थिती होती. या उपक्रमांतर्गत तब्बल १ हजार वृक्षांची मियावाकी पद्धतीने लागवड करण्यात आली. यामध्ये जांभूळ, आवळा, सीताफळ यांसह सुमारे १० ते १२ प्रकारच्या स्थानिक देशी वृक्षप्रजातींचा समावेश आहे. याशिवाय वड, उंबर, कडुनिंब आदी आणखी १५० वृक्षांची लागवड करण्यात आल्याने एकूण १ हजार १५० वृक्षांचे हरित आवरण निर्माण होणार आहे. मियावाकी तंत्रज्ञानामध्ये कमी जागेत विविध स्थानिक प्रजातींची सघन लागवड केली जाते. त्यामुळे झाडांची वाढ तुलनेने जलद होऊन काही वर्षांतच दाट वनराई निर्माण होण्यास मदत होते.

या माध्यमातून परिसरात ऑक्सिजनचे प्रमाण वाढविणे, तापमान नियंत्रणास हातभार लावणे, पक्षी व विविध जीवांसाठी अधिवास निर्माण करणे आणि शहरातील जैवविविधता समृद्ध करणे, हा या उपक्रमाचा उद्देश आहे. झाडे लावूया, झाडे दत्तक घेऊया आणि ती जगवूया या संदेशातून पर्यावरण संवर्धनाची चळवळ अधिक व्यापक करण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला. यावेळी संजय पळसपगार, उमेश मसने, सुभाष गायकवाड, विठ्ठल थोटे, सुनील भातुलकर, प्रकाश मालगन, अंबादास निकाळजे, शैलेश ओळंबे, रवींद्र वानखेडे, शरद इंगोले, विनायक गावंडे, विष्णू चव्हाण, गजानन धामणकर, अरुण धनभर, बानू वाकोडे आदींसह माजी विद्यार्थी संघाची उपस्थिती होती.

### झाडे लावण्याचा नव्हे; ‘झाडे जगविण्याचा संकल्प!

केवळ वृक्षारोपण करून थांबायचे नाही, तर लागवड केलेल्या वृक्षांच्या दीर्घकालीन संगोपनाची जबाबदारी टिळक राष्ट्रीय सरस्वती मंदिर माजी विद्यार्थी संघाच्या वतीने घेण्यात आली आहे. त्यामुळे लावलेली झाडे जगविण्यावर विशेष भर दिला जाणार आहे. महापालिका, माजी विद्यार्थी आणि नागरिकांच्या सहभागातून हा परिसर भविष्यात शहरातील एक आदर्श हरित पट्टा म्हणून विकसित करण्याचा प्रयत्न असून संवर्धन करून प्रत्यक्षात दाट हिरवाई निर्माण करण्याचे आव्हान आयोजकांनी स्वीकारले आहे.

### कमी जागेत दाट वनराई उभारण्याचा प्रयत्न!

या मोहिमेत जांभूळ, आवळा, सीताफळ यांसह १० ते १२ प्रकारच्या देशी वृक्षांची सघन लागवड करण्यात आली आहे. त्यासोबत वड, उंबर आणि कडुनिंबाचे १५० वृक्ष लावण्यात आले. मियावाकी तंत्रज्ञानामुळे कमी जागेत दाट वनराई उभारण्याचा प्रयत्न असून, भविष्यात हा परिसर जैवविविधता, पक्षी आणि पर्यावरणासाठी महत्त्वाचा हरित पट्टा ठरण्याची अपेक्षा आहे.

# प्रभाग १० हिरवाईने नटविण्याचा संकल्प!
## नगरसेवक दिलीप बोचे यांच्या पुढाकाराने ट्री-गार्डसह वृक्षारोपण

### नागरिकांनी स्वीकारली संगोपनाची जबाबदारी

■ प्रतिनिधी | अकोट ■

संत वासुदेव महाराजांच्या पावन वास्तव्याने पुनीत झालेल्या संत वासुदेव नगर परिसरासह प्रभाग क्रमांक १० हिरवागार व पर्यावरणपूरक करण्याचा संकल्प करण्यात आला. नगरसेवक दिलीप बोचे व सौ. विजयाताई बोचे यांच्या पुढाकाराने ट्री-गार्डसह वृक्षारोपणाचा उपक्रम उत्साहात पार पडला.

या उपक्रमांतर्गत परिसरातील विविध ठिकाणी मोठ्या वृक्षांची लागवड करण्यात आली. विशेष म्हणजे, लावण्यात आलेल्या प्रत्येक रोपाचे जतन व संगोपन करण्याची

जबाबदारी स्थानिक नागरिकांनी स्वयंस्फूर्तीने स्वीकारली. त्यामुळे केवळ वृक्षारोपण न करता त्यांचे संवर्धन करण्याचा आदर्श या उपक्रमातून निर्माण झाला आहे.

वृक्षारोपणाचा शुभारंभ ज्येष्ठ नेते नानासाहेब हिंगणकर, अकोट शहर पोलीस ठाण्याचे ठाणेदार किशोर जुनगरे, वृक्षमित्र प्राचार्य गजानन चोपडे आणि मुकुंदराव गावंडे यांच्या हस्ते करण्यात आला. प्राचार्य गजाननराव चोपडे यांनी त्यांचे वडील स्व. विश्वासराव चोपडे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ पर्यावरणपूरक १०० झाडे लावण्याचा संकल्प केला आहे. या संकल्पाचा एक भाग म्हणून त्यांनी स्वतः ट्री-गार्डसह मोठ्या वृक्षांची रोपे उपलब्ध करून दिली. त्यांच्या या सामाजिक व पर्यावरणीय उपक्रमाचे उपस्थितांनी कौतुक केले.

या वेळी सुरेशदादा कराळे, नंदकिशोर हिंगणकर, मराठा सेवा संघाचे तालुकाध्यक्ष राममूर्ती वालसिंगे, नारायणराव अनासाने, पत्रकार विजय शिंदे सहपत्नीक, विनायकराव सपकाळ, प्रदीप ओळंबे, विजय वानखडे, अमोल बोरकर, दीपक पाटील, मनोहर रेचे, विलासराव चोरे, डॉ. लाड, माधव अनासाने, ॲड. विपुल भिसे, भिकू गटकळ, अजय मोरे, प्रफुल्ल थोरात, शुभम जाधव, विक्रम सावंत, नागोराव कुलट, राजकुमार सिकजी, मंगेश हिंगणकर, ॲड. राठी, चोपडे, ॲड. वल्लभ जोत, रमेश तासतोडे, विलास जाधव, नारायण मंडले, संजय गाडगे यांच्यासह प्रभाग क्रमांक १० मधील नागरिक व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी नगरसेवक दिलीप बोचे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

### गुजराती समाजाचा एबीजीएस गौरव सन्मान

■ प्रतिनिधी | अकोल ■

गोरक्षण रोड येथील रहिवासी आणि कलाप्रेमी जिनल माटलिया यांनी मेहंदी कलेत केलेल्या विश्वविक्रमाबद्दल अखिल भारतीय गुजराती समाज संस्थेच्या वतीने त्यांना एबीजीएस गौरव सन्मान पुरस्कार २०२६ प्रदान करण्यात आला. जिनल माटलिया यांनी निर्धारित वेळेपेक्षा कमी वेळेत मेहंदी कलेचे सादरीकरण करून विश्वविक्रम केला आहे. त्यांनी कमी वेळेत अरेबिक मेहंदी लावण्याचा विक्रम नोंदविला. उपाध्यक्ष हेमेंद्र राजगुरू यांच्या नेतृत्वाखाली वालजीभाई पटेल व हरीश लाखानी तसेच मनोज भीमजीयानी आणि दिनूभाई सोनी यांनी जिनल यांच्या कामगिरीचे कौतुक करून एबीजीएस गौरव सन्मान पुरस्कार २०२६ प्रदान केला.

# आरडीजी सुप्रभात प्रांगण सर्व ग्रुपने केला प्राचार्य भट्टी यांचा सत्कार

**अकोला :** गेली अनेक वर्षे आरडीजी महिला महाविद्यालय प्रांगणात सकाळी योगा,झुंबा,मॉर्निंग वॉक,व्यायाम करणाऱ्या जेष्ठ नागरिकांच्या आरडीजी सुप्रभात प्रांगण सर्व ग्रुपच्या वतीने आरडीजी महिला महाविद्यालयाचे नवनियुक्त प्राचार्य डॉ.ललित भट्टी यांचा सत्कार केला.डॉ भट्टी यांची नुकतीच महाविद्यालयाच्या प्राचार्य पदी नियुक्ती झाली आहे. संस्थेचे अध्यक्ष दिलीपराज गोयनका यांनी महाविद्यालय परिसरात बसवलेल्या व्यायाम उपकरणांचा वापर आरडीजी सुप्रभात प्रांगण सर्व ग्रुप करीत असून यात प्राचार्य यांचे ही सहकार्य मिळत असते.

**Change In Name**
I Have Changed My Name From
**SAYEED ARIF ALI SAYEED KHURSHID ALI**
-TO-
**SAYYAD ARIF ALI SAYYAD KHURSHID ALI.**
Address: KHOKHE WALI CHAWAL DHOBI KHADAN, AKOLA, MAHARASHTRA-444001

# राष्ट्रीय लोकअदालतीत अकोटमध्ये १.५५ कोटींची विक्रमी वसुली; १,४३० प्रकरणांचा निपटारा

■ प्रतिनिधी | अकोट ■

तालुका विधी सेवा समिती, अकोटच्या वतीने शनिवारी (दि. १२ सप्टेंबर) आयोजित राष्ट्रीय लोकअदालतीत विविध प्रकरणांचा तडजोडीने निपटारा करण्यात आला. या लोकअदालतीत तब्बल १ कोटी ५५ लाख ६६ हजार ६४४ रुपयांची वसुली झाली. तसेच एकूण १ हजार ४३० प्रकरणांचा निपटारा करण्यात आल्याने अकोट येथील राष्ट्रीय लोकअदालत उल्लेखनीय ठरली.

जिल्हा न्यायाधीश-१ तथा तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष बी. एम. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली लोकअदालतीचे कामकाज पार पडले. यासाठी चार स्वतंत्र पॅनल स्थापन करण्यात आले होते. या पॅनलमध्ये दिवाणी व फौजदारी प्रकरणे, मोटार अपघात दावे, बँक प्रकरणे, दाखलपूर्व प्रकरणे, एम.ए.सी.टी. प्रकरणे तसेच ग्रामपंचायतींचे घरकर, पाणीपट्टी आणि अन्य वसुलीशी संबंधित प्रकरणांचा समावेश होता.

पॅनल प्रमुख म्हणून एस. एम. काळे (दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर), शेख आरीफ हारुन (सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर) आणि ए. ए. माळी (द्वितीय सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर) यांनी कामकाज पाहिले. विधिज्ञ

### तडजोडीतून वाद मिटविण्यास मोठे यश

व्ही. एस. लाखे, वाजीद अली अफजल अली, मोहम्मद जुनेद आणि जी. एन. तळोकार यांनीही महत्त्वपूर्ण सहकार्य केले.लोकअदालतीत ७९३ दिवाणी व फौजदारी प्रकरणांचा निपटारा, तर १ हजार २८४ दाखलपूर्व प्रकरणे निकाली काढण्यात आली. तडजोडीच्या माध्यमातून वाद मिटविल्याने पक्षकारांचा वेळ व खर्च वाचण्यासोबतच न्यायप्रक्रियेलाही गती मिळाली. यावेळी विविध बँकांचे अधिकारी व कर्मचारी, पंचायत समिती अकोटचे कर्मचारी, समाजसेवक विजय जितकर, विधी स्वयंसेवक के. एन. पंत तसेच पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सक्रिय सहभाग नोंदविला. लोकअदालत यशस्वी करण्यासाठी व्ही. पी. कावरे (अधीक्षक), अनिल यू. वानखडे (सहायक अधीक्षक) यांच्यासह सर्व न्यायालयीन अधिकारी व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. तडजोडीच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात प्रकरणे निकाली काढून लोकअदालतीने नागरिकांना जलद व सुलभ न्याय मिळवून देण्याच्या उद्देशाला बळ दिले.

# आस्की किड्समध्ये विद्यार्थ्यांचा पदग्रहण सोहळा

■ प्रतिनिधी | अकोट ■

विद्यार्थ्यांमधील सुप्त गुणांना वाव मिळावा, त्यांच्यात नेतृत्वगुण व सांघिक भावना विकसित व्हावी, तसेच निकोप स्पर्धेची भावना निर्माण व्हावी, या उद्देशाने आस्की किड्समध्ये रेड, ब्ल्यू, ग्रीन आणि येलो हाऊस या हाऊस सिस्टीमची स्थापना करण्यात आली आहे. या हाऊस सिस्टीमचा पदग्रहण सोहळा नुकताच शाळेच्या प्रांगणात उत्साहात पार पडला.

वैदिक संस्कृतीची ओळख विद्यार्थ्यांना व्हावी, या संकल्पनेतून चार हाऊसना ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद आणि अथर्ववेद अशी नावे देण्यात आली. शाळेत वर्षभर राबविण्यात येणारे विविध उत्सव, उपक्रम आणि स्पर्धांचे आयोजन या हाऊस सिस्टीमच्या माध्यमातून करण्यात येणार आहे. क्रीडा स्पर्धांसोबतच वक्तृत्व, नाटक, चित्रकला, संगीत तसेच विविध शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रमांमध्ये चारही हाऊसमध्ये गुणांसाठी चुरशीची स्पर्धा होणार आहे. अभ्यासाबरोबरच विद्यार्थ्यांचा सर्वांगीण व अष्टपैलू विकास साधण्यासाठी ही हाऊस सिस्टीम

### ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, अथर्ववेद या वैदिक संकल्पनेवर चार हाऊसची स्थापना

महत्त्वाची भूमिका बजावणार आहे.

प्रत्येक विद्यार्थ्यांची चार हाऊसमध्ये विभागणी करण्यात आली असून, प्रत्येक हाऊसला स्वतंत्र ओळख, रंग आणि ब्रीदवाक्य देण्यात आले आहे. नेतृत्वगुण व सांघिक भावनेला चालना देण्यासाठी प्रत्येक हाऊससाठी हाऊस कॅप्टन व व्हाइस कॅप्टनची निवड करण्यात आली आहे. विविध वर्गातील विद्यार्थी एकाच हाऊसमध्ये एकत्रितपणे काम करणार असल्याने मोठ्या विद्यार्थ्यांकडून लहान विद्यार्थ्यांना शिकण्याची संधी मिळणार आहे. स्पर्धांमध्ये सहभागी होताना विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढण्यासोबतच यश-अपयश खिलाडूवृत्तीने स्वीकारण्याची सवय लागेल. जिंकण्याचा आनंद आणि अपयशानंतर पुन्हा प्रयत्न करण्याची जिद्द विद्यार्थ्यांना भविष्यातील आव्हानांसाठी सक्षम करेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. या हाऊस सिस्टीमचे पॅट्रॉन म्हणून प्राचार्य नेहा झाडे, प्रमुख पवन चितोडे, समन्वयक वर्षा अग्निहोत्री व रश्मी कुलकर्णी यांची, तर मेंटॉर म्हणून आशिष पवार, मनिष सरकटे, अमित हाडोळ आणि गौरव कांडलकर यांची निवड करण्यात आली. शाळेचा हेड बॉय म्हणून समर्थ बोबडे, तर हेड गर्ल म्हणून पूर्वी राऊत यांची निवड करण्यात आली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली प्रत्येक हाऊसचे कॅप्टन उपप्रमुख म्हणून कार्य करणार आहेत. या हाऊस सिस्टीमची संकल्पना शाळेचे सचिव नितीन झाडे यांनी मांडली. संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी शिक्षकवृंद परिश्रम घेत आहेत.

# मॅराथॉन स्पर्धाला उत्स्फूर्त प्रतिसाद

**अकोला :** भीम वॉरियर ग्रुप, शिवणी यांच्या वतीने १३ सप्टेंबर २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेल्या ५ किलोमीटर मॅराथॉन स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. अकोला, बुलढाणा, वाशिम आणि अमरावती या चार जिल्ह्यांतून शेकडो विद्यार्थी व धावपटूंनी सहभाग नोंदवत शिवणीच्या रस्त्यांवर धावण्याचा रोमांच अनुभवला. स्पर्धेत अमरावती येथील पीयूष मसाने याने दमदार कामगिरी करत प्रथम क्रमांक पटकावला. त्याला ५ हजार रुपयांचे रोख बक्षीस देण्यात आले.

**जाहीर सूचना**

दि. १३/०९/२०२६

सर्वत्र लोकांना सुचविण्यात येते की आमचे पक्षकारांनी १) जयप्रकाश वसंतराव वाटूरकर, २) विवेकानंद वसंतराव वाटूरकर, १ व २ रा. वाटूरकर लेआऊट, अकोला ता. व जि. अकोला ३) राजेश दिनकर वाटूरकर, ४) रवींद्र दिनकर वाटूरकर, ३ व ४ रा. प्लॉट क्र. २, गॅलक्सी रेसिडेंसी, बळवंत कॉलनी, अकोला ता. व जि. अकोला ५) हर्षद वामनराव वाटूरकर, ६) शरद वामनराव वाटूरकर, ७) प्रफुलकुमार वामनराव वाटूरकर, ८) अनंतराव काशीरामजी वाटूरकर, ५ ते ८ रा. वाटूरकर लेआऊट, अकोला ता. व जि. अकोला ह्यांच्या मालकीचा व मालमत्ता पत्रक/ ७/१२ मध्ये त्यांचे नावाची नोंद असलेली मालमत्ता विकत घेण्याचा त्यांच्याशी सौदा कायम केलेला आहे.

**स्थावर शेतजमिनीचे वर्णन :-** मौजे मलकापूर, प्र. ता. जि. अकोला, र. स. डी. र. डी. म.न.पा. अकोला चे हद्दीतील जमीन ज्याचे सर्वे नंबर- २२/२/अ, भोगवटदार वर्ग- १, ज्याचे एकूण क्षेत्रफळ ० हे. ८९ आर शेतजमीन

**ज्यास चतुःसीमा -** पूर्वेस -मानकचंद जैन यांचे मंजूर लेआऊट मधील ९ मी. रुंद रस्ता पश्चिमेस- श्री. वाटूरकर ह्यांचे जुने मंजूर लेआऊट मधील १२ मी. रुंद रस्ता उत्तरेस- मंजूर लेआऊट मधील ९ मी. रुंद रस्ता दक्षिणेस- खंडेलवाल लॉन ते मंगरुळपीर कडे जाणारा रोड त्यातील सालीम दगडमाती, झाडझुडपासह व तदंगभूत सर्व वस्तूसह आणि वहीवाटीच्या संपूर्ण हक्कासह. तरी वर नमूद जमीन बाबत कोणाचाही कसल्याही प्रकारचा गहान बोजा, करार, बक्षीस, खरेदी, हक्क किंवा इतर कोणत्याही प्रकारचा उजर असल्यास त्यांनी माझ्या कडे सर्व संबंधित लेखी कागद पत्रांसह ४ (चार) दिवसांचे आत आपली हरकत नोंदवावी. अन्यथा आमचे पक्षकार खरेदी करून घेतील. नंतर कोणाचाही कसल्याही प्रकारचा उजर चालनार नाही ह्याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

**Adv. SAURABH S. SARDA**
Mob. 9423650505 / 9011650505 S.S Towers, 1 Floor, ITI Lane, Opp. Students Gallery, Below Sarda's Career Point, Necklace Road, Akola.

**महाराष्ट्र शासन**
**उपवनसंरक्षक (प्रादेशिक) अकोला वनविभाग अकोला यांचे कार्यालय**
**वसुंधरा हॉल, अशोक वाटीका जवळ, मंगरुळपीर रोड, अकोला**
दुरध्वनी क्रमांक ०७२४-२४१५६०० ई- मेल dycfakola@mahaforest.gov.in

ई-निविदा सुचना क्रमांक- १ (सन २०२६-२७)

उपवनसंरक्षक, अकोला प्रादेशिक वनविभाग, अकोला (दुरध्वनी क्रमांक ०७२४-२४१५६००) यांचे वतीने महाराष्ट्र शासनाच्या विविध खात्याकडे योग्य त्या वर्गातील अधिकृत पंजीबध्द पुरवठादाराकडुन खालील प्रमाणे कामाकरीता www.mahatender.gov.in ऑनलाईन प्रणालीव्दारे ई-निविदा मागविण्यात येत आहे.

**-: कामाचा तपशिल खालील प्रमाणे :-**

| अ. क्र. | कामाचे नाव | आवश्यक संख्या (अंदाजित) | बयाना रक्कम (रुपये) | मनुष्यबळ पुरवठा करण्याची कालमर्यादा | कोऱ्या निविदा नमुन्याची किमत रू. | पुरवठादाराचा वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | क्षेत्रीय अकुशल कामे करणे करिता मनुष्यबळ पुरवठा करणे बाबत | ०७३ | ५०००० | करारनाम्याचे दिनांकापासुन ५ दिवसाचे आत | ३६०० | खुला वर्ग |

**ई-निविदा प्रसिध्दीचा तपशिल**

| | |
|---|---|
| ऑनलाईन ई-निविदा विक्री करणे दिनांक | दि. १५.०९.२०२६ सकाळी ११.०० वा. |
| ई-निविदा दाखल करण्यास सुरवात दिनांक | दि. १५.०९.२०२६ सकाळी ११.०० वा. पासुन |
| ई-निविदा दाखल करण्याचा अंतीम दिनांक | दि. २३.०९.२०२६ सकाळी ११.०० वा. पर्यंत |
| ऑनलाईन तांत्रीक निविदा उघडण्याचा दिनांक | दि. २४.०९.२०२६ दुपारी १२.०० वाजता (शक्य झाल्यास) |

**टिप:-**

**१.** ई-निविदा ही कार्यप्रणाली प्रमाणे दिनांक १५.०९.२०२६ सकाळी ११.०० वा. ते दिनांक २३.०९.२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजेपर्यंत भरता येतील.

**२.** तांत्रिक निविदा शक्य झाल्यास दिनांक २४.०९.२०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता उपवनसंरक्षक, अकोला (प्रादेशिक) वनविभाग, अकोला यांच्या कार्यालयात उघडण्यात येईल. तथापि निविदा उघडण्याचा दिनांक सोईनुसार पुढे ढकलण्याचा अधिकार उपवनसंरक्षक प्रादेशिक वनविभाग, अकोला यांनी राखुन ठेवला आहे.

**३.** कोणतेही कारण न देता एक किंवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार उपवनसंरक्षक, (प्रादेशिक) वनविभाग, अकोला यांनी राखुन ठेवला आहे. व त्यांचा निर्णय सर्व निविदाधारकांसाठी अंतिम व बंधनकारक राहील

**४.** निविदा संबंधी सविस्तर अटी व शर्ती www.mahatenders.gov.in व वनविभागाचे संकेतस्थळ www.mahaforest.gov.in वर दिनांक १५.०९.२०२६ सकाळी ११.०० वाजेपासुन पहावयास मिळेल. ईच्छुक कंत्राटदारांनी वरील संकेतस्थळावर भेट देऊन निविदा भरावयाची कार्यवाही करावी.

**सुमंत एस. सोळंके (भा.व.से.)**
**उपवनसंरक्षक प्रादेशिक**
**अकोला वनविभाग, अकोला.**

वि.मा.का./अम./जाही/४९०/२०२६-२०२७

जनमाध्यम न्यूज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक २७६**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :-** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# जादूटोण्याचा संशय ठरला जीवघेणा; तलवार घेऊन शेजाऱ्यावर हल्ला

## मुलीच्या आजारपणाला जादूटोणा जबाबदार असल्याचा संशय; पती पत्नीने केली मारहाण

**विरुळ आकाजी/जनमाध्यम**
पुलगाव तालुक्यातील गुंजखेडा येथील मुलगी आजारी असल्याने तिच्यावर करणी आणि जादूटोणा केल्याचा संशय घेऊन एका व्यक्तीवर तलवार आणि काठीने प्राणघातक हल्ला करण्यात आल्याची धक्कादायक घटना रविवारी सकाळी घडली. या प्रकरणी पोलिसांनी खुनाचा प्रयत्न तसेच जादूटोणाविरोधी कायद्यानुसार गुन्हा दाखल करून आरोपीला अटक केली आहे.

मोजा गुंजखेडा येथील यशवंत बापूराव धुर्वे यांची मुलगी बऱ्याच दिवसांपासून आजारी आहे. तिच्या आजारपणामागे वासुदेव मारुतीराव केवटे यांनी करणी किंवा जादूटोणा केला असावा असा संशय यशवंत धुर्वे यांना होता. याच संशयातून रविवारी १३ सप्टेंबर रोजी सकाळी सुमारे ७ वाजता वासुदेव केवटे हे यशवंत धुर्वे यांच्या घरासमोरून जात असताना त्यांच्यावर हल्ला करण्यात आला.

यशवंत धुर्वे यांनी तलवारीने वासुदेव केवटे यांच्या डोक्यावर आणि हातावर वार केले. यावेळी यशवंत यांच्या पत्नीने काठीने केवटे यांना मारहाण केल्याचे पोलिसांनी सांगितले. या हल्ल्यात वासुदेव केवटे गंभीर जखमी झाले. त्यांची पत्नी हर्षा केवटे यांनाही काठीचा मार लागून दुखापत झाली. दोन्ही जखमींना उपचारासाठी वर्धा येथे पाठविण्यात आले आहे.

घटनेची माहिती मिळताच पोलीस उपनिरीक्षक रामेश्वर राय आणि पोलीस कॉन्स्टेबल निखिल वाडकर यांनी अवघ्या अर्ध्या तासात आरोपी यशवंत धुर्वे याला ताब्यात घेतले. त्यानंतर त्याला अटक करण्यात आली. सहाय्यक पोलीस निरीक्षक नितीन मदनकर आणि पोलीस नाईक राजू वैद्य यांनी गुन्ह्यात वापरलेली तलवार आणि काठी जप्त केली आहे.

मुलीच्या आजारपणातून निर्माण झालेला अंधश्रद्धेचा संशय थेट रक्तरंजित हल्ल्यापर्यंत पोहोचल्याने या घटनेने परिसरात खळबळ उडाली आहे. अशा अंधश्रद्धेतून कायदा हातात घेण्याचा प्रकार समाजासाठी गंभीर इशारा ठरला आहे. गुन्ह्याचा तपास ठाणेदार सदाशिव ढाकणे करीत आहेत.

# बाप्पाच्या सजावटीतून सर्जनशीलतेचा जागर

## आष्टीत 'आपले बाप्पा आपली सजावट' स्पर्धा

**आष्टी शहीद/जनमाध्यम**
गणरायाच्या आगमनाने घराघरात भक्तीचा उत्साह संचारला असतानाच आष्टी शहरात घरगुती गणपती सजावट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. 'आपले बाप्पा आपली सजावट' या संकल्पनेतून गणेशोत्सवाला सामाजिक आणि सर्जनशीलतेची जोड देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

आमदार सुमित वानखेडे आणि ॲड. डॉ. क्षितिजा वानखेडे यांच्या प्रेरणेने आयोजित या स्पर्धेत उत्कृष्ट सजावटीसाठी प्रथम क्रमांक ३३३३ रुपये द्वितीय २२२२ रुपये आणि तृतीय ११११ रुपये रोख पारितोषिक देण्यात येणार आहे. विजेत्यांना सन्मानचिन्हही दिले जाणार आहे.

तरुणांच्या कलागुणांना व्यासपीठ मिळावे यासाठी 'खास युवा सर्जनशील रील' हा विशेष गट ठेवण्यात आला असून उत्कृष्ट रीलसाठी ११११ रुपयांचे पारितोषिक आहे.१४ ते २४ सप्टेंबरदरम्यान स्पर्धा होणार आहे. सहभागी नागरिकांनी गणपती सजावटीचे फोटो आणि व्हिडिओ WhatsApp द्वारे पाठवून सोबत पूर्ण नाव आणि पत्ता देण्याचे आवाहन करण्यात आले आहे.सोनाली मनिष ठोंबरे आणि ॲड. मनिष ठोंबरे यांनी स्पर्धेचे आयोजन केले असून आष्टीकरांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

## संक्षिप्त

### भवानी मंदिरातील दानपेटी फोडून रोकड लंपास

**अल्लीपूर-** भवानी मंदिरातील दानपेटीचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्याने अंदाजे वीस हजार रुपये लंपास केल्याची घटना उघडकीस आली. मंदिर समितीचे अध्यक्ष बजरंग बळीरामजी खांड यांनी अल्लीपूर पोलिसांत तक्रार दिली. सकाळी मंदिरात आरती करण्यासाठी गेलेल्या व्यक्तीला दानपेटीचे कुलूप तुटलेले दिसले. त्याने खांड यांना माहिती दिल्यानंतर त्यांनी मंदिरात जाऊन पाहणी केली. दानपेटीत जमा असलेली रोकड गायब असल्याचे आढळले. नवरात्रोत्सवात दानपेटीत जमा होणाऱ्या रकमेची दरवर्षी मोजणी केली जाते. यंदाही नवरात्रानंतर दानपेटी उघडण्याचे नियोजन होते. मात्र त्यापूर्वीच चोरट्याने संधी साधली. रात्रीच्या सुमारास मंदिर परिसरात प्रवेश करून कुलूप तोडण्यात आले. अल्लीपूर पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदविला असून तपास सुरू केला आहे. मंदिर परिसरातील हालचाली आणि उपलब्ध पुराव्यांची तपासणी करण्यात येत आहे. पोलिसांनी मंदिर परिसरातील सीसीटीव्ही फुटेज ये जा करणाऱ्या व्यक्तींची माहिती तपासण्यास सुरुवात केली आहे. चोरीचा माग काढण्यासाठी तपास सुरू आहे

### मांडगावातील सौर प्रकल्पातील बारा किलोमीटर केबल चोरीला

**हिंगणघाट-** समुद्रपूर तालुक्यातील मांडगाव येथील सौर प्रकल्पातून सुमारे बारा दशांश आठ किलोमीटर डीसी केबल चोरीला गेल्याची घटना उघडकीस आली आहे. प्रकल्प व्यवस्थापक मनोजकुमार रामकृपाल द्विवेदी यांनी हिंगणघाट पोलिसांत तक्रार दिली. कंपनीने मांडगाव येथे अकरा एकर शेतजमीन भाड्याने घेऊन सौर प्रकल्पाचे काम सुरू केले आहे. सुरक्षेसाठी परिसराला संरक्षक भिंत असून देखरेखीसाठी स्थानिक सुरक्षा रक्षक नेमण्यात आला आहे. प्रकल्पासाठी चार चौरस मिलिमीटरची डीसी केबल आणून भूमिगत वायरिंग करण्यात आली होती. प्रकल्पातील वायर चोरीला गेल्याची माहिती सुरक्षा रक्षकाने व्यवस्थापकाला दिली. त्यानंतर पाहणी केली असता सुमारे दोन लाख रुपये किमतीची केबल गायब असल्याचे आढळले. कंपनीचे प्रकल्प नागपूर जिल्ह्यात असल्याने तक्रार दाखल करण्यास विलंब झाल्याचे फिर्यादीने सांगितले. हिंगणघाट पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे. चोरीचा तपास करताना परिसरातील सुरक्षा व्यवस्थेचीही पोलिसांकडून माहिती घेतली जात आहे.

### पत्ते खेळण्याच्या वादातून मारहाण

**हिंगणघाट-** नांदगाव चौक परिसरात पत्ते खेळणाऱ्या तरुणांमध्ये झालेल्या वादातून एका तरुणाच्या गालावर चावीने मारून धक्काबुक्की केल्याची घटना घडली. नितीन शंकरराव बेहणे रा संत कबीर वार्ड हिंगणघाट यांनी पोलिसांत तक्रार दिली. नितीन हे हमालीचे काम करतात. घटनेच्या वेळी ते पत्ते खेळत असलेल्या काही मुलांजवळ बसले होते. त्यावेळी आरोपी अभय उर्फ अब्बु जुनडे तेथे उभा होता. दोघांमध्ये काही कारणावरून वाद झाला. वाद वाढल्यानंतर आरोपीने नितीन यांच्या गालावर चावीने मारले आणि धक्काबुक्की केली. घटनेनंतर नितीन यांनी पोलिसांत तक्रार दिली. त्यांच्या तोंडी तक्रारीवरून आणि वैद्यकीय तपासणीच्या अहवालाच्या आधारे हिंगणघाट पोलिसांनी गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे. आरोपीला अद्याप अटक करण्यात आलेली नसून पोलिसांकडून त्याचा शोध सुरू आहे. पोलिसांनी आरोपीचा शोध सुरू केला असून वादाचे नेमके कारण तपासले जात आहे. व्यक्तींची माहितीही पोलिसांकडून घेतली जात आहे.

### दारूच्या नशेत शेतमजुराला मारहाण

**वडनेर-** पेरला परिसरात दारूच्या नशेत एका व्यक्तीने शेतमजुराला शिवीगाळ करून लाकडी काठीने मारहाण केल्याची घटना घडली. दिनेश साळवे रा पेरला यांनी वडनेर पोलिसांत तक्रार दिली. साळवे हे शेतमजुरीचे काम करतात. घटनेच्या वेळी ते बुटा विहाराजवळ बसले होते. त्यावेळी आरोपी दारू पिऊन तेथे आला. तू माझ्यावर का हसतोस असे म्हणत त्याने साळवे यांच्याशी वाद घातला. वाद वाढल्यानंतर आरोपीने शिवीगाळ केली आणि लाकडी काठीने साळवे यांच्या डोक्यावर खांद्यावर तसेच उजव्या पायावर मारहाण केली. यात ते जखमी झाले. घटनेनंतर साळवे यांनी पोलिसांत तोंडी तक्रार दिली. वैद्यकीय तपासणीच्या अहवालासह तक्रारीच्या आधारे वडनेर पोलिसांनी संबंधित कलमानुसार गुन्हा नोंदविला आहे. आरोपीवर पुढील कारवाई सुरू आहे. पोलिसांकडून आरोपीचा शोध घेण्यात येत असून घटनेमागील कारणाचाही तपास केला जात आहे. जखमीच्या वैद्यकीय अहवालाची नोंद घेण्यात आली आहे.

### मारहाण करून जीवे मारण्याची धमकी

**आंजी मोठी-** गावातील जुन्या वादातून शिवीगाळ करून मारहाण तसेच जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी जगदिश मन्नालालजी संवरिया याच्याविरुद्ध खरांगणा पोलिसांनी गुन्हा नोंदविला. दिलीप शंकरराव रघाटाटे रा आंजी मोठी यांनी तक्रार दिली. दिलीप हे मित्र नरेश धोंगडे आणि मोहन परांते यांच्यासोबत पानठेल्याजवळ उभे असताना जगदिश तेथे आला. त्याने अश्लील शिवीगाळ केल्याचा आरोप आहे. दिलीप यांनी जाब विचारला असता जगदिश अंगावर धावून आला आणि गालावर दोन चापट मारली.

# खडूच्या कणात साकारला गणराय

## ७०० हून अधिक खडू शिल्पांची निर्मिती; प्रफुल्ल साखरकरांच्या कलेचे सर्वत्र कौतुक

**वर्धा/जनमाध्यम**
साधा खडू म्हटला की फळ्यावर उमटणारी अक्षरे डोळ्यांसमोर येतात. मात्र याच खडूच्या छोट्याशा तुकड्यातून कलावंताने गणरायाचे सुंदर शिल्प साकारून आपल्या कल्पकतेची अनोखी झलक दाखवली आहे. संत तुकाराम वॉर्ड रामनगर येथील खडू शिल्पकार आणि शिक्षक प्रफुल्ल तुकाराम साखरकर यांनी आपल्या कलाकौशल्यातून गणेशाचे आकर्षक खडू शिल्प साकारले आहे.

अत्यंत नाजूक आणि बारकाईने काम करीत खडूला आकार देत विविध व्यक्तिमत्त्वे आणि धार्मिक प्रतिकृती साकारण्याची त्यांची कला लक्षवेधी ठरत आहे. आतापर्यंत त्यांनी तब्बल ७०० पेक्षा अधिक खडू शिल्पे कोरली आहेत. त्यांच्या या कलासाधनेमागे सातत्य, संयम आणि सूक्ष्म निरीक्षणाची जोड आहे.

प्रफुल्ल साखरकर हे डोंगरखर्डा येथील प्रफुल्ल आदर्श विद्यालयात शिक्षक म्हणून कार्यरत आहेत. अध्यापनाची जबाबदारी सांभाळतानाच त्यांनी आपली कलासाधनाही अखंड सुरू ठेवली आहे. छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, शिवलिंग आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची शिल्पेही त्यांनी खडूमध्ये कोरली आहेत.

खडूसारख्या नाजूक माध्यमातून एवढ्या बारकाईने शिल्प साकारण्यासाठी प्रचंड संयम आणि हातोटी आवश्यक असते. त्यांच्या प्रत्येक शिल्पातून ही मेहनत आणि कलात्मकता प्रकर्षाने जाणवते. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर त्यांनी साकारलेले गणेश शिल्प विशेष आकर्षण ठरत असून त्यांच्या या अनोख्या कलेचे वर्धा परिसरात सर्वत्र कौतुक होत आहे.खडू छोटा असला तरी कल्पनेला सीमा नाही, हे साखरकर यांच्या कलेने पुन्हा सिद्ध केले आहे.

# ग्रामपंचायत प्रशासकाला शिवीगाळ करून धक्काबुक्की

**आंजी मोठी -** राजीक चहा कॅन्टीन परिसरात ग्रामपंचायत प्रशासकाला शिवीगाळ करून धक्काबुक्की केल्याप्रकरणी दिलीप रघाटाटे याच्याविरुद्ध पोलिसांनी गुन्हा नोंदविला. जगादिश मन्नालालजी संवरिया रा बाजारचौक आंजी मोठी यांनी तक्रार दिली. ते मित्रासोबत कॅन्टीनवर बसले असताना दिलीप रघाटाटे नरेश धोंगडे आणि मोहन परांते तेथे आले. तिघांनी मद्यप्राशन केलेले असल्याचा आरोप आहे. त्यांनी अश्लील भाषेत शिवीगाळ केल्याचे तक्रारीत नमूद आहे. यावरून जगदिश यांनी जाब विचारला असता वाद वाढला. तिघेही अंगावर धावून आल्याने झटापट झाली. यावेळी जगदिश यांच्या अंगातील टीशर्ट फाटला.

नातेवाईक आणि नागरिकांनी मध्यस्थी करून भांडण सोडविले. त्यानंतरही शिवीगाळ सुरू राहिल्याने त्यांनी पोलिसांना माहिती दिली. पोलिस घटनास्थळी पोहोचले. या प्रकरणी खरांगणा पोलिसांनी संबंधित कलमानुसार गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. याप्रकरणी फिर्यादीने जास्त मार नसल्याने वैद्यकीय उपचार घेण्यास नकार दिला. पोलिसांनी घटनास्थळाची माहिती नोंदवून साक्षीदारांचे जबाब घेण्यास सुरुवात केली आहे.

# अंधश्रद्धेविरोधी लढ्यात वर्धेची दमदार कामगिरी

## गजेंद्र सुरकार यांचा महाराष्ट्र भूषण सन्मानाबद्दल गौरव

**वर्धा/जनमीध्यमे**
महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीची दोन दिवसीय राज्य कार्यकारिणी १२ आणि १३ सप्टेंबर रोजी अंबेजोगाई येथे मानवलोक संस्थेच्या सभागृहात पार पडली. यावेळी समितीचे राज्य प्रधान सचिव गजेंद्र सुरकार यांनी वर्धा जिल्हा शाखेचा ७ जून ते ११ सप्टेंबर २०२६ या कालावधीतील कार्याचा सविस्तर अहवाल सादर केला.

वर्धा शहरासह आर्वी आष्टी कारंजा हिंगणघाट सेलू देवळी आणि समुद्रपूर शाखांनी शाळा महाविद्यालये तसेच ग्रामीण भागात राबविलेल्या विविध उपक्रमांची माहिती त्यांनी दिली. अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिकेची सभासद नोंदणी नियमित शाखा बैठका देणगी आणि जाहिरात संकलन यांचाही आढावा मांडण्यात आला. आगामी चार महिन्यांतील उपक्रमांची रूपरेषाही सादर करण्यात आली.

वर्धा शाखेच्या उत्कृष्ट कार्याची राज्य कार्यकारिणीने विशेष नोंद घेतली. तसेच महाराष्ट्र भूषण सन्मान मिळाल्याबद्दल गजेंद्र सुरकार यांचा राज्य कार्यकारिणीच्या वतीने सत्कार करण्यात आला.राज्य कार्याध्यक्ष प्रा संजय बनसोडे राज्य अध्यक्ष माधव बावगे राज्य प्रधान सचिव विनायक सावळे डॉ ठकसेन गोराणे आणि विजय परब यांची प्रमुख उपस्थिती होती. राज्यातील ३० जिल्ह्यांतील शंभरहून अधिक कार्यकर्ते सहभागी झाले.

# साहूर मंडळात दुष्काळी पिकांची पाहणी

## महसूल कृषिमंत्र्यांच्या निर्देशानंतर प्रशासन शेतकऱ्यांच्या बांधावर

**साहूर/जनमाध्यम**
पावसाने दीर्घ खंड दिल्याने खरीप पिके संकटात सापडली असून साहूर परिसरात दुष्काळसदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर महसूल विभागाच्या पथकाने शनिवारी १३ सप्टेंबर रोजी शेतांमध्ये प्रत्यक्ष पाहणी करून पिकांच्या स्थितीचा आढावा घेतला.

महसूल व कृषिमंत्री भरणे यांनी १२ सप्टेंबर रोजी जिल्हाधिकाऱ्यांसोबत ऑनलाइन बैठक घेऊन दुष्काळसदृश्य परिस्थितीचा अहवाल तीन ते चार दिवसांत सादर करण्याचे निर्देश दिले. त्यानंतर साहूर मंडळात नायब तहसीलदार ओमप्रकाश बाळस्कर यांच्या नेतृत्वाखाली पाहणी करण्यात आली. अनेक शेतांमध्ये सोयाबीन आणि कपाशीची पिके पावसाअभावी करपलेली आणि खराब झाल्याचे आढळले.

जूनमध्ये पावसाने दडी मारली. जुलैमध्ये अल्प पाऊस झाला तर ऑगस्टमध्ये मोठा खंड पडला. त्यामुळे काही ठिकाणी पिकांची उगवण झाली नाही तर उगवलेली पिके पाण्याअभावी कोमेजली आहेत. कापूस सोयाबीन आणि तुरीचे मोठे नुकसान झाले असून शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे.

प्रत्येक मंडळातील दोन गावांमध्ये पीक पाहणी सर्वेक्षण करण्यात येणार असल्याचे बाळस्कर यांनी सांगितले. यावेळी मंडळ अधिकारी किशोर पेंदाम सहाय्यक कृषी अधिकारी मिलिंद पाटभाजे तलाठी सविता भगत कपिल गायकवाड आशिष मेटे यांच्यासह शेतकरी उपस्थित होते.

### कोचर मैदानावर गांजा सेवन करताना तरुण ताब्यात

**वर्धा-** शहरातील कोचर मैदान परिसरात गांजा सेवन करणाऱ्या १९ वर्षीय तरुणाला पोलिसांनी ताब्यात घेतले. तुषार अमित वाघमारे रा स्टेशन फैल वर्धा असे आरोपीचे नाव आहे. पोलिसांना कोचर मैदानातील कडुनिंबाच्या झाडामागे काही जण अमली पदार्थाचे सेवन करीत असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी पंचांसह घटनास्थळी जाऊन पाहणी केली असता तुषार हा गांजा सेवन करताना आढळला. पोलिसांना पाहताच तो निघून जाण्याच्या तयारीत होता. पोलिसांनी त्याला घेराव घालून ताब्यात घेतले. अंगझडतीत गांजा पिण्याची चिलम त्यातील अर्धवट जळालेली राख चिलमीत टाकण्याचा खडा माचिस आणि पांढरे कापड असा मुद्देमाल आढळला. पोलिसांनी हा मुद्देमाल जप्त केला. आरोपीची वैद्यकीय तपासणी करण्यात आली असून नमुना घेण्यात आला आहे. पोलिसांनी एनडीपीएस कायद्यानुसार गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू केला आहे. कारवाईची व्हिडिओग्राफी करण्यात आली. पंचनामा करून मुद्देमाल सीलबंद केला आणि परीक्षणासाठी पाठविला आहे.

### एलओसी कॅफेसमोरून मोपेड चोरीला

**वर्धा -** न्यू आर्ट कॉलेज रोडवरील एलओसी कॅफेसमोर उभी केलेली मोपेड अज्ञात चोरट्याने लंपास केली. विष्णुदास कार्तीक केळझरकर रा चौधरी चौक वर्धा यांनी रामनगर पोलिसांत तक्रार दिली. केळझरकर हे सलूनमध्ये काम करतात. त्यांनी सुमारे दीड महिन्यापूर्वी ॲक्सेस १२५ मोपेड एक लाख तीन हजार रुपयांना खरेदी केली होती. रात्री बहिणीला आणण्यासाठी ते कॅफेजवळ गेले होते. मोपेड बाहेर उभी करून ते बहिणीला बोलावण्यासाठी कॅफेत गेले. काही वेळाने दोघे बाहेर आले असता मोपेड दिसून आली नाही. परिसरात शोध घेऊन नागरिकांकडे चौकशी केली असता वाहनाचा ठावठिकाणा लागला नाही. अखेर त्यांनी पोलिसांत तक्रार दाखल केली.

# पोषणाचा जागर अन् संस्कृतीचा जल्लोष

## आष्ट्यात 'एवनिथ'च्या उन्नती उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद

**वर्धा/जनमाध्यम**
आष्टा गावात आरोग्यदायी जीवनशैली आणि सकस आहाराचा संदेश देत आष्टा येथील जिल्हा परिषद शाळेत 'एवनिथ' पुरस्कृत उन्नती जनजागृती कार्यक्रम उत्साहात पार पडला. पोषण आहार प्रदर्शन आणि दहीहंडी सोहळ्यामुळे कार्यक्रमाला सामाजिक आणि सांस्कृतिक रंगत लाभली. परिसरातील १०० हून अधिक नागरिकांनी उपस्थित राहून उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

पोषण आहार प्रदर्शनात गावातील ३० महिलांनी सहभाग घेतला. महिलांनी घरच्या घरी तयार केलेले विविध पौष्टिक आणि स्थानिक खाद्यपदार्थ प्रदर्शनात मांडले. उत्कृष्ट प्रदर्शन करणाऱ्या तीन महिलांना 'Best of Three' पुरस्कार देण्यात आला.

अन्य सहभागी महिलांनाही प्रोत्साहनपर बक्षिसे देण्यात आली. समुदाय आरोग्य अधिकारी वीणा वासनिक यांनी प्रदर्शनाचे परीक्षण केले.

दहीहंडी आणि वेशभूषा स्पर्धेने कार्यक्रमात उत्साह भरला. मुख्याध्यापक रमधम यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी राधा कृष्णाच्या वेशभूषेत सादरीकरण केले. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना उपस्थितांनी दाद दिली. उत्कृष्ट सादरीकरण करणाऱ्या विद्यार्थ्यांना शाळेच्या वतीने बक्षिसे देण्यात आली.

प्रकल्प व्यवस्थापक पिंकी निमजे आणि मुख्याध्यापक रमधम यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी अंगणवाडी सेविका पोर्णिमा लांगुडे. आशा कार्यकर्त्या ज्योत्स्ना कुपजवार. सी आर पी ज्योत्स्ना लाहुरे आणि वंदना चौधरी यांनी विशेष परिश्रम घेतले. शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष पंकज घुमे आणि उपाध्यक्ष सतीश भेंडारे यांनी सहकार्य केले.

प्रियांका निकोडे आणि ज्योत्स्ना लाहुरे यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रम समन्वयक प्रदीप कोल्हे यांनी उपस्थितांचे आभार मानले. पोषण. आरोग्य आणि स्थानिक खाद्यसंस्कृती यांचा संगम घडवून आणणाऱ्या या उपक्रमाचे परिसरात कौतुक होत आहे

# वसुंधरेच्या रक्षणासाठी पायी वारी

## नागपूर ते वाणिजधाम पर्यावरण संरक्षणाची पायदळ वारी पवनार येथे दाखल

**पवनार/जनमाध्यम**
वसुंधरेचे रक्षण आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्याच्या संकल्पाने श्री क्षेत्र नागपूर ते श्री क्षेत्र वाणिजधाम अशी पर्यावरण संरक्षणाची पायदळ वारी सुरू करण्यात आली आहे. ही वारी पवनार येथे दाखल झाली. वारीतील सहभागींकडून पर्यावरणाचे महत्त्व नागरिकांना पटवून देत वृक्षसंवर्धन आणि निसर्गरक्षणाचा संदेश दिला जात आहे. वाढते प्रदूषण वृक्षतोड आणि बदलते हवामान यामुळे पर्यावरणाचा समतोल धोक्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर धार्मिक भावनेसोबत पर्यावरण संवर्धनाचा विचार समाजात रुजविण्याचा प्रयत्न या वारीतून केला जात आहे. पवनार येथे नागरिकांनी वारीचे स्वागत केले. पर्यावरण रक्षणाचा संकल्प प्रत्येकाने कृतीत उतरविण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले. वारीच्या माध्यमातून हरित आणि निरोगी भविष्यासाठी जनजागृती करण्याचा संदेश देण्यात आला.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज ॲन्ड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक २८९
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३

मुख्य कार्यालय- अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

# जिप उच्च प्राथमिक मराठी शाळा कठोरा येथे इको फ्रेंडली गणपती मेकिंग कार्यशाळा

## विद्यार्थ्यांनी साकारल्या पर्यावरणपूरक गणेशमूर्ती; पर्यावरण संवर्धनाचा दिला संदेश

**अमरावती/प्रतिनिधीः-** पर्यावरणपूरक गणेशोत्सवाबाबत विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने कल्पतरू बहुउद्देशीय संस्था व रायझिंग कोचिंग क्लासेस यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा परिषद शाळा, कठोरा येथे इको फ्रेंडली गणपती मेकिंग कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत पर्यावरणपूरक गणेशमूर्ती साकारल्या.

कार्यशाळेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शाडू माती व पर्यावरणपूरक साहित्यापासून गणेशमूर्ती तयार करण्याचे प्रशिक्षण देण्यात आले. यावेळी गजानन पारडकर सर यांनी विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रात्यक्षिकाद्वारे इको फ्रेंडली गणपती बनविण्याचे प्रशिक्षण दिले.

संस्थेच्या अध्यक्षा शारदा विधळे अढाऊ यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना पर्यावरणपूरक गणेशमूर्तींचा वापर करणे का आवश्यक आहे, तसेच पारंपरिक व पर्यावरणास घातक मूर्तीमुळे होणारे जलप्रदूषण व पर्यावरणावरील परिणाम याबाबत माहिती दिली. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी प्रत्येकाने पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करावा, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेच्या मुख्याध्यापिका अपर्णा सोनटक्के मॅडम, शिक्षक राजेंद्र दिक्षित सर, रामचंद्र चव्हाण सर व प्रणिता काळे (निमकर )मॅडम यांचे मोलाचे सहकार्य लाभले. संस्थेच्या सदस्या पल्लवी पांडे यांनी सूत्रसंचालन केले.

संस्थेचे सचिव अमोल विधळे व उपाध्यक्ष आदित्य विधळे यांनी कार्यक्रमाचे नियोजन व आयोजन केले. विद्यार्थ्यांचा उत्साह वाढविण्यासाठी उत्कृष्ट सहभाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांना बक्षीस व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. यावेळी मुख्याध्यापिका अपर्णा सोनटक्के मॅडम यांनी विद्यार्थ्यांना पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व पटवून देत पर्यावरण रक्षणाचा संदेश दिला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणपूरक गणेशोत्सवाबाबत सकारात्मक दृष्टिकोन निर्माण झाला असून, कार्यशाळेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला

# घरफोडी करणारी टोळी वर्षभरासाठी तडीपार

## अंजनगाव सुर्जीतील तिघांवर एसपी कदम यांची कारवाई

**अमरावती/प्रतिनिधीः-** अंजनगाव सुर्जी परिसरात दहशत निर्माण करून घरफोडीसारखे गुन्हे करणाऱ्या गुन्हेगारी प्रवृत्तीच्या टोळीतील तिघांना अमरावती ग्रामीणचे पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांनी जिल्ह्यातून एक वर्षासाठी तडीपार केले. आगामी सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर गुन्हेगारी प्रवृत्तीच्या इसमांविरुद्ध प्रतिबंधात्मक कारवाईचा पोलिसांचा धडाका सुरू असून, त्याचाच एक भाग म्हणून ही कारवाई करण्यात आली. तडीपार करण्यात आलेल्यांमध्ये जुबेरोदिदन कलीमोददीन (वय २५, रा. उस्माननगर), नुरोददीन उर्फ मुक्का नजमोदिदन (वय २४, रा. काझीपुरा) आणि अजिमोददीन ग्यासोददीन (वय २८, रा. अजिजपुरा), राहणार तिघेही अंजनगाव सुर्जी यांचा समावेश आहे. अंजनगाव सुर्जी परिसरात या इसमांकडून घरफोडीसारखे गुन्हे केले जात असल्याचे तसेच त्यांच्या कथित गुन्हेगारी कारवायांमुळे सार्वजनिक शांतता व कायदा-सुव्यवस्थेला बाधा निर्माण होत असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. त्यामुळे अंजनगाव सुर्जी पोलिसांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ मधील कलम ५५ अन्वये तडीपार कारवाईचा प्रस्ताव सादर केला. या प्रस्तावावर पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांनी कायदेशीर प्रक्रिया राबवून उपविभागीय पोलीस अधिकारी सुनील हुड यांच्याकडे चौकशी सोपविली. चौकशीदरम्यान संबंधितांना बचावाची संधी देण्यात आली. प्रस्तावासोबत सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांची

पडताळणी करून चौकशी अहवाल सादर करण्यात आला. अहवालाच्या आधारे सक्षम प्राधिकारी म्हणून पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांनी ८ सप्टेंबर २०२६ रोजी तिघांना अमरावती जिल्ह्याच्या हद्दीतून एक वर्षाच्या कालावधीसाठी तडीपार करण्याचा आदेश पारित केला. आदेशाची अंमलबजावणी करण्यात आली असून, तडीपार आदेशाचे उल्लंघन केल्यास कारवाईला सामोरे जावे लागेल, अशा सक्त सूचना संबंधितांना देण्यात आल्या आहेत. दरम्यान, आगामी सण-उत्सवांच्या काळात कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी तसेच गुन्हेगारी प्रवृत्तीच्या इसमांवर वचक निर्माण करण्यासाठी अमरावती ग्रामीण पोलिसांकडून प्रतिबंधात्मक कारवाया अधिक तीव्र करण्यात येणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

# नियमांचे उल्लंघन केल्यास कारवाई

## गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर ग्रामीण पोलिसांचे आदेश

**अमरावती/प्रतिनिधीः-** जिल्ह्यात १४ सप्टेंबरपासून सुरू होणाऱ्या गणेशोत्सव आणि २१ सप्टेंबरपासून सुरू होणाऱ्या विसर्जन मिरवणुकांच्या काळात जिल्ह्यातील शांतता व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी अमरावती ग्रामीण पोलिसांनी विशेष दक्षता घेतली आहे. कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांनी 'महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१' च्या कलम ३६ अन्वये विशेष आदेश जारी केले आहेत.

हे आदेश १४ सप्टेंबरपासून ३० सप्टेंबरपर्यंत अमरावती ग्रामीण पोलीस क्षेत्रासाठी लागू राहतील. यात मिरवणुकीचे मार्ग,

वेळा आणि शिस्त निश्चित करण्याचे अधिकार पोलीस अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. सार्वजनिक ठिकाणी अडथळा निर्माण होणार नाही याची काळजी घेण्याचे निर्देश आहेत. रस्त्यांवर किंवा सार्वजनिक ठिकाणी ढोल-ताशे, इतर वाद्ये बजावणे आणि कर्कश लाऊड स्पीकरच्या वापरावर पोलीस अधिकाऱ्यांचे पूर्ण नियंत्रण असेल. परवानगीशिवाय जाहीर सभा, मोर्चे, मिरवणुका किंवा पदयात्रा आयोजित करता येणार नाहीत. तसेच शांतता भंग होईल अशा प्रक्षोभक घोषणा देण्यावर पूर्ण बंदी आहे. हे आदेश लग्नसमारंभ आणि अंत्ययात्रांना लागू नसतील.

आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तींवर महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम १३४ नुसार कायदेशीर कारवाई केली जाईल, असे पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांनी कळविले आहे.

# सोमेश्वर संस्थानमध्ये श्रावणमासानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रम

## -मुसळधार पावसातही भाविकांची उत्स्फूर्त उपस्थिती

**अमरावती/प्रतिनिधीः-** सालाबादप्रमाणे यंदाही श्री सोमेश्वर संस्थान, भाजीबाजार, अमरावती येथे पवित्र श्रावणमासानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रम भक्तिभावाने व उत्साहात पार पडले.

श्रावणमासाच्या कालावधीत सव्वा लाख 'ॐ नमः शिवाय' जप, सव्वाकोटी मंत्रजप, भजन, शिवमहिम्न स्तोत्र पठण, महिला अभिषेक व पुरुष अभिषेक, तसेच चारही श्रावणी सोमवारनिमित्त विशेष महाआरती अशा विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

श्रावणमासाची सांगता व समारोपानिमित्त रविवार, दि. १३ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ८ वाजता यज्ञ, त्यानंतर सकाळी ११ वाजता महाआरती आणि महाआरतीनंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. महाप्रसादाचा कार्यक्रम दुपारी ५ वाजेपर्यंत सुरू होता.

या धार्मिक सोहळ्यात भाविकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन यज्ञ, महाआरती व महाप्रसादाचा लाभ घेतला. विशेष म्हणजे, मुसळधार पाऊस सुरू असतानाही भक्तांच्या लाटा महाप्रसाद ग्रहण करण्यासाठी सातत्याने सोमेश्वर मंदिराकडे येत होत्या. प्रतिकूल वातावरणातही भाविकांच्या चेहऱ्यावरील श्रद्धा, उत्साह आणि भगवान सोमेश्वरांवरील अढळ भक्ती यांचा जणू प्रत्यक्ष साक्षात्कार यावेळी झाला.

या यज्ञ, महाआरती व महाप्रसादाच्या धार्मिक सोहळ्यास माजी मंत्री जगदीश गुप्ता, नगरसेवक श्री रतवा तसेच नगरसेविका पांडे वहिनी यांची विशेष उपस्थिती लाभली. मान्यवरांनी भगवान सोमेश्वरांचे दर्शन घेऊन महाआरती व महाप्रसाद कार्यक्रमात सहभाग नोंदविला.

मुसळधार पावसातही कोणत्याही भक्ताने जागा सोडून जाण्याची घाई केली नाही तसेच कोणतीही नाराजी अथवा उद्रेग व्यक्त केला नाही. सर्व भाविकांनी अत्यंत शांततेने, संयमाने व शिस्तीने रांगेत राहून महाप्रसाद ग्रहण केला. सतत व सुरळीतपणे महाप्रसादाचे वितरण करण्यात आले. महिला भाविकांची उपस्थिती विशेष लक्षणीय होती.

या संपूर्ण धार्मिक उपक्रमात शंकर बुटे व उल्हास बपोरीकर यांनी हिरिरीने सहभागी होत विविध कार्यक्रमांची जबाबदारी पार पाडली.

मंदिर परिसराची महिनाभर स्वच्छता व देखभालीची जबाबदारी श्री विजय पांडे, श्री राजाखारकर व श्री सुरेंद्र बुरंगे यांनी जबाबदारीने पार पाडली. तसेच सतीश देशपांडे यांनी 'ॐ नमः शिवाय' सव्वाकोटी मंत्रजप करणाऱ्या भाविकांसाठी आवश्यक व्यवस्था केली.

मंदिर परिसरातील रांगोळी व सजावटीमध्ये मनोज झळके व नरेंद्र दोडके यांनी विशेष सहभाग घेऊन जबाबदारीने कार्य केले. शिवमहिम्न स्तोत्र पठण, भजन तसेच अभिषेक कार्यक्रमाची संपूर्ण जबाबदारी उल्हास बपोरीकर व योगेंद्र उपाध्ये यांनी पार पाडली.

या सर्व भव्य धार्मिक आयोजनाच्या यशामागे अजय पिंपळगावकर यांनी विशेष पुढाकार घेऊन अथक परिश्रम घेतले. तसेच प्रशांत महाजन, समस्त विश्वस्त मंडळ व सर्व भक्तगणांनी यज्ञ, महाआरती व महाप्रसादाच्या आयोजनाची संपूर्ण सूत्रे सांभाळत कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मोलाचे योगदान दिले.

**४००० भाविकांसाठी महाप्रसाद-**

विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे, भाविकांच्या प्रबळ इच्छाशक्ती, अपार श्रद्धा तसेच त्यांच्या आर्थिक व शारीरिक सहकार्यामुळे सुमारे ४००० भाविकांसाठी महाप्रसादाचे भव्य आयोजन अवघ्या ३६ तासांत यशस्वीपणे पूर्ण करण्यात आले. या महाप्रसादाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रशांत महाजन व अन्य भक्तगण गुप्ता बंधू, उमेश आसरकर, मंगेश साऊरकर, सतीश बेंबळकर तसेच बहुसंख्य भक्तगणांनी अथक परिश्रम घेतले. सर्वांच्या सामूहिक प्रयत्नांमुळे महाप्रसादाचा हा भव्य उपक्रम अत्यंत यशस्वीरीत्या पार पडला.अल्पावधीत एवढ्या मोठ्या प्रमाणावर महाप्रसादाची व्यवस्था करणे हे सर्वांच्या सामूहिक प्रयत्नांचे आणि भगवान सोमेश्वरांच्या कृपेचे प्रतीक ठरले. अनेक भाविकांनी या यशस्वी आयोजनाला 'सोमेश्वरांचा दैवी आशीर्वाद' असे संबोधले. या अभूतपूर्व आयोजनाची मंदिर परिसरात तसेच शहरातील विविध भागांत उत्सुकतेने चर्चा होत होती. श्रावणमासाच्या निमित्ताने महिनाभर चाललेल्या या धार्मिक उपक्रमामुळे सोमेश्वर मंदिर परिसरात भक्तिमय व चैतन्यमय वातावरण निर्माण झाले. विशेषतः मुसळधार पावसातही हजारो भाविकांनी दाखविलेली श्रद्धा, संयम व भगवान सोमेश्वरांवरील अटूट भक्ती ही या सोहळ्याची विशेष वैशिष्ट्ये ठरली.

## राष्ट्रीय चर्मकार महासंघातर्फे

# सीआरपीएफमधून सेवानिवृत्त गजानन खंडारे यांचा सत्कार

**अमरावती/प्रतिनिधी** केंद्रीय राखीव पोलीस दलात (सि.आर.पी.एफ) प्रदीर्घकाळ उल्लेखनीय सेवा बजावून सेवानिवृत्त झालेले नवसारी , अमरावती येथील गजानन मोतीरामजी खंडारे यांचा राष्ट्रीय चर्मकार महासंघातर्फे शाल, पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

देशाच्या सुरक्षिततेसाठी प्रतिकूल व आव्हानात्मक परिस्थितीत कर्तव्य बजावत गजानन खंडारे यांनी सीआरपीएफच्या माध्यमातून केलेली प्रदीर्घ देशसेवा ही अभिमानास्पद व प्रेरणादायी आहे. त्यांच्या उल्लेखनीय कार्याचा गौरव करण्याच्या उद्देशाने राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या वतीने सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला.

यावेळी राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे जिल्हाध्यक्ष निलेश जामठे यांनी गजानन खंडारे यांच्या देशसेवेचे कौतुक करताना सांगितले की, 'देशाच्या रक्षणासाठी आपले आयुष्य समर्पित करणाऱ्या जवानांचा सन्मान करणे ही समाजाची जबाबदारी आहे. गजानन खंडारे यांनी सीआरपीएफमध्ये प्रामाणिकपणे, निष्ठेने आणि धैर्याने बजावलेली सेवा समाजातील युवकांसाठी निश्चितच प्रेरणादायी आहे.' सेवानिवृत्तीनंतरच्या पुढील सामाजिक व कौटुंबिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

गजानन मोतीराम खंडारे यांनी केंद्रीय राखीव पोलीस दलात प्रदीर्घकाळ सेवा बजावली. आपल्या सेवाकाळात त्यांनी देशाच्या विविध भागांमध्ये कर्तव्य बजावले. यामध्ये पंजाब, आसाम, नागालँड, मणिपूर, त्रिपुरा, मेघालय, बिहार, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, जम्मू-काश्मीर, गुजरात, राजस्थान, झारखंड, छत्तीसगड, केरळ, कर्नाटक, तेलंगणा, आंध्र प्रदेश तसेच हैदराबाद या विविध राज्यांचा व भागांचा समावेश आहे.

# रसिकांच्या साक्षीने रंगला 'दे मनाचा रिता कोपरा'

## नितीन भट आणि उज्वल बारंगे यांच्या कविता, गीत, गज़लांचा सुरेल उत्सव

**अमरावती/प्रतिनिधीः-** प्रेम, विरह, दुरावा व्यक्त करणाऱ्या कविता...सामाजिक आशय मांडणाऱ्या गज़ल...गायकीचे स्वर आणि सोबतीला बासरी, व्हायोलिन आणि सिंथसायझरची सुरेल सोबत... असा शब्द-स्वरांचा उत्सव 'दे मनाचा रिता कोपरा' शनिवारी संध्याकाळी श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या स्व. सोमेश्वर पुसतकर सभागृहात रंगला. प्रख्यात गज़लकार आणि निवेदक नितीन भट आणि व्यावसायाने सर्जन आणि कवीमनाचे व्यक्तिमत्त्व असलेले डॉ. उज्वल बारंगे यांच्या काव्यरचनांवर आधारित या कार्यक्रमाचा अमरावतीकरांनी मनसोक्त आस्वाद घेतला. विविध भावभावनांचे आविष्करण करणाऱ्या मुक्तछंद, गेय कविता आणि गज़ल सादर करून त्यांनी रसिकांच्या मनावर गारुड केले. काव्याचा आशय गडद करणारी वाद्यवृंदाची संगत आणि लखलखीत प्रकाशयोजना कार्यक्रमाच्या देखणेपणात भर घालणारी होती. नितीन भट यांनी तरन्नुममध्ये सादर केलेल्या 'पुन्हा खोटे खरे झाले', 'कधी ओवाळणी केली' आणि 'तुटत असलो जरी आतल्या आत मी' या गज़लांनी रसिकांच्या मनाला आनंद देऊन गेल्या. डॉ. उज्वल बारंगे यांनी गायलेल्या 'हातातले तू हात', 'दिवा विझलेला होता' आणि 'दगड होऊन मन मोडले पाहिजे' गीतांनी कार्यक्रमाचे रंग अधिक गडद केले. काव्यवाचनात सिंथसायझरवर रामेश्वर काळे, बासरीवर चेतन वानखडे आणि व्हायोलिनवर हरीश लांडगे पिलू, शुद्ध सारंग, मिया मल्हार, मिश्र पहाडी, चारुकेशी, भूपेश्वरी, गोरख कल्याण, झिंजोटी अशा रागातील सुरवटी समर्पकपणे पेरून मैफिल अधिक सुश्राव्य केली.

डॉ. उज्वल बारंगे यांनी सादर केलेल्या 'डॉक्टर असलेला माणूस' आणि 'एक दिवस आपण सगळे जाणार आहोत इथून' या दोन अर्थगर्भ कवितांनी रसिकांची दमदार दाद घेतली.

सादरकर्ते आणि निवेदक अशा दुहेरी भूमिकेत असलेल्या नितीन भट यांच्या बहारदार निवेदनाला नवी उंची बहाल केली. आकर्षक प्रकाश योजनेची जबाबदारी विराग जाखड आणि सौरभ शेंडे यांनी पार पाडली. तर ग्राफिक्सचे काम ऋषिकेश मोहोळे, हर्ष शर्मा आणि चमूने सांभाळले.

**मान्यवरांच्या उपस्थितीत उद्घाटन-** कार्यक्रमाच्या उद्घाटन सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून जी. एच. रायसोनी विद्यापीठ, अमरावतीचे कुलगुरू डॉ. विनायक देशपांडे, सायकोथेरपिस्ट डॉ.मोहना कुलकर्णी, पोलिस उपायुक्त यशवंत सोळंके, धामणगाव रेल्वेचे आमदार प्रताप अडसड, धामणगाव रेल्वेच्या नगराध्यक्ष अर्चना रोठे, वर्धा येथील राजकीय नेते राणा रणनवरे, 'कृषकराज सोलर'चे संचालक राजेंद्र जवळकर, शिवमल्हार लॅबोरेटरीजचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. वैभव ढवळे, वर्धा येथील गॅस्ट्रोइंटेस्टाइनल सिस्टीम तज्ज्ञ डॉ. पवन भांदककर आणि कॉटन किंग' प्रतिष्ठानचे संचालक अमोल चवणे उपस्थित होते. आयोजनाची धुरा नेत्ररोगतज्ज्ञ डॉ. सचिन बगडे, मनीष नांदूरकर आणि सारंग हरणे यांनी सांभाळली. उद्घाटन सोहळ्याचे सूत्रसंचालन तेजस्वीनी बगडे आणि डॉ. पायल रोकडे यांनी केले. तब्बल अडीच तास चाललेला हा सोहळा अमरावतीकर रसिकांच्या साक्षीने रंगला.

अमरावती : अमोल पाटील भारसाकळे अध्यक्ष जिजाऊ प्रतिष्ठान अंबा कॉलनी अमरावती यांच्या कड गणपती बाप्पाचे उत्साहात आगमत झाले.

# महावितरण ग्राहक तक्रार निवारण मंच अमरावती अध्यक्षपदी रमेश मावस्कर

**धारणी/प्रतिनिधीः-** मेळघाटातील वीज समस्या सर्वांसाठी परिचयाची आहे. अनेक वर्षापासून काही गावात परंपरागत विद्युती प्रवाह नाही. अनेक गावात सौर ऊर्जेद्वारे वीज उपलब्ध करण्यात आली पण अडचणी नेहमी येतातच. आता शासनाने महावितरणच्या ग्राहक तक्रार निवारण समितीच्या अध्यक्षपदी रमेश मावस्कर ह्यांची नियुक्ती केली आहे. आता वीज समस्येच्या कायम निदानाचा मार्ग मोकळा झालेला आहे.

माजी पुरवठा उपायुक्त आणि आदिवासींच्या सेवेसाठी शासकीय नोकरी सोडून सरळ राजकारणात आलेले अनुभवी रमेश पटल्या मावस्कर ह्यांना महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने अमरावती ग्राहक तक्रार निवारण मंचाचे अध्यक्षपदी नियुक्त दिली आहे. रमेश यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. रमेश मावस्कर हे २०१९ विधानसभा निवडणुकीत मेळघाटातून भाजपाचे उमेदवार होते. आयोगाचे संयुक्त संचालकांनी अमरावती परिमंडळाच्या अध्यक्षपदाची धुरा रमेश मावस्कर यांना देतानाच प्रभार सुद्धा दिलेला असल्याने जबाबदारी वाढलेली आहे. रमेश मावस्कर हे भेलचे संचालक पण आहेत, त्यांच्या प्रशासकीय अनुभवाचा लाभ आदिवासी जनतेला मिळावा या उद्देशाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ह्यांनी या नियुक्तीला प्राधान्य दिल्याची माहिती आहे.

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे

संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अमरावती आवृत्ती वर्ष - ३८ अंक १२
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

मुख्य कार्यालय :- अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६९

ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## संक्षिप्त

### सुरज तेलगोटे यांना भावपूर्ण निरोप तर सतीश खेडकर नवे ठाणेदार

**आसेगाव पूर्णा-** पोलीस ठाण्याचे ठाणेदार सुरज तेलगोटे यांची अमरावती येथे बदली झाल्यानंतर त्यांच्या जागी अमरावती येथील पोलीस कार्यालयातील सतीश खेडकर यांनी आसेगाव पूर्णा पोलीस ठाण्याच्या ठाणेदारपदाचा पदभार स्वीकारला. यावेळी पोलीस ठाण्यात छोटेखानी निरोप समारंभ घेऊन ठाणेदार सुरज तेलगोटे यांना भावपूर्ण निरोप देण्यात आला.नवनियुक्त ठाणेदार सतीश खेडकर यांच्या हस्ते सुरज तेलगोटे यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी उपस्थित पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी त्यांच्या अकरा महिन्यांच्या कार्यकाळातील उल्लेखनीय कार्याचा गौरव करीत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. कर्तव्यनिष्ठा, शिस्त आणि माणुसकीची जपणूक यामुळे तेलगोटे यांनी नागरिकांच्या मनात आपली वेगळी ओळख निर्माण केली. संवेदनशील प्रश्न असलेल्या परिसरात सामाजिक सलोखा कायम ठेवण्यासाठी त्यांनी केलेले प्रयत्नही उल्लेखनीय ठरले. त्यांच्या कार्यकाळात आसेगाव पूर्णासह परिसरातील गावांमध्ये कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यास पोलिस प्रशासनाला यश आले. यावेळी सुनील केवतकर,सचिन सालफळे, विजय गायकवाड, रुपेश घोळकर तसेच पोलीस ठाण्यातील अधिकारी, वाहतूक पोलीस विभागातील कर्मचारी तसेच पोलीस ठाण्याचा सर्व कर्मचारी वर्ग उपस्थित होता.

### विद्यापीठात ज्ञानयोगी डॉ. श्रीकांत जिचकार यांची जयंती साजरी

**अमरावती-** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील डॉ. श्रीकांत जिचकार स्मृती संशोधन केंद्रामध्ये ज्ञानयोगी डॉ. श्रीकांत जिचकार यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी विद्यापीठ आय.क्यू.ए.सी. चे संचालक डॉ. संदिप वाघुळे यांनी ज्ञानयोगी डॉ. श्रीकांत जिचकार यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पार्पण करुन विद्यापीठाच्यावतीने अभिवादन केले. जयंती कार्यक्रमाला आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील, डॉ. श्रीकांत जिचकार स्मृती संशोधन केंद्राचे संचालक डॉ. एस. पी. जोशी तसेच विद्यापीठातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. जयंती कार्यक्रमाचे संचालन डॉ. एस. पी. जोशी यांनी केले. ज्ञानयोगी डॉ. श्रीकांत जिचकार यांच्याबद्दल माहिती डॉ. संदिप वाघुळे यांनी दिली.

### जिल्हा परिषद शाळेत सर्वज्ञ चक्रधर स्वामी जयंती साजरी

**लेहेगाव-** घोडगव्हाण येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी यांची जयंती तसेच तान्हा पोळ्याचे आयोजन करण्यात आले होते यामध्ये गावातील बालगोपाळांनी रंगबिरंगी सजवून मातीने बनवलेले बैल या तान्ह्या पोळ्यात आणले होते. या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष घोडगव्हाण ग्रामपंचायतीचे सरपंच विजयराव टेकाडे तसेच अतिथीचे स्थान सौ सारीका टेकाडे यांनी भूषविले.चक्रधर स्वामींच्या जयंतीनिमित्त मुलांची भाषणे झाली. कार्यक्रमाचे संचालन चापके यांनी केले. आभार माधुरी टेकाडे यांनी केले खाऊ वाटप करण्यात आला अशा प्रकारे कार्यक्रमाची सांगता झाली.

### विद्यापीठात श्रीचक्रधरस्वामी अवतार दिन

**अमरावती-** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील महानुभाव अध्यासन केंद्रामध्ये श्रीचक्रधरस्वामी अवतार दिनानिमित्त अभिवादन कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. व्ही.एम. मेटकर यांनी श्रीचक्रधरस्वामी यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पार्पण करुन विद्यापीठाच्यावतीने अभिवादन केले. अभिवादन कार्यक्रमाला विद्यापीठातील महानुभाव अध्यासन केंद्राचे संचालक डॉ. महंत सोनपेठकर, तसेच विद्यापीठातील आणि महानुभाव अध्यासन केंद्रातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन व माहिती महानुभाव अध्यासन केंद्राचे संचालक डॉ. महंत सोनपेठकर यांनी दिली.

# मुख्यालयी न राहिल्याच्या कारणावरून वेतनवाढ रोखली

## १०८६ शिक्षकांवर कारवाईची टांगती तलवार, शिक्षक समितीचा तीव्र निषेध

**अमरावती/का.प्र.**

मुख्यालयी न राहण्याच्या कारणावरून छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील गंगापूर पंचायत समितीतील ७५३ आणि खुलताबाद पंचायत समितीतील ३३३ अशा एकूण १०८६ शिक्षकांची तीन वर्षांसाठी एक वेतनवाढ रोखण्याची शिक्षा शिक्षण विभाग, जि.प. छत्रपती संभाजीनगर यांनी केली आहे. ही कारवाई अन्यायकारक आणि शिक्षकांची मानसिक प्रताडना करणारी असल्याचा तीव्र निषेध महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीने केला आहे.

यासंदर्भात समितीचे राज्याध्यक्ष विजय कोंबे आणि राज्य सरचिटणीस राजन कोरगावकर यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. छत्रपती संभाजीनगर तसेच शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांना निवेदन देऊन ही कारवाई तात्काळ मागे घेण्याची मागणी केली आहे.आरोग्य व पोलीस यांसारख्या आपत्कालीन स्वरूपाच्या अत्यावश्यक सेवांमध्ये कार्यरत कर्मचाऱ्यांसाठी अनेक ठिकाणी शासकीय निवासाची सुविधा उपलब्ध असते.

**'द्वेषमूलक हट्ट पुरविण्यासाठी कारवाई'**

शिक्षकांच्या बाबतीत अत्यंत आकस ठेवून, कुणाचा तरी द्वेषमूलक हट्ट पुरविण्यासाठी ही कारवाई करण्यात आल्याचा आरोप शिक्षक समितीने केला आहे. १०८६ शिक्षकांवर एकाच वेळी करण्यात आलेली ही कारवाई अयोग्य, अन्यायकारक आणि मानसिक त्रास देणारी असल्याचे समितीने स्पष्ट केले आहे.

**आज काळी फीत आंदोलन**

या कारवाईच्या निषेधार्थ १५ सप्टेंबर रोजी गंगापूर येथे आयोजित मोर्चाला महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीने सक्रिय पाठिंबा जाहीर केला आहे. त्याच दिवशी राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांमधील शिक्षकांनी काळी फीत लावून दिवसभर निषेध व्यक्त करावा, असे आवाहन समितीने केले आहे. १०८६ शिक्षकांवरील ही अन्यायकारक कारवाई तात्काळ मागे घ्यावी, अन्यथा यापेक्षा अधिक तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही समितीने दिला आहे. या निवेदनाच्या प्रती मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, राज्यमंत्री योगेश कदम गोरे, सचिव (ग्राम विकास) डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार तसेच विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांना देण्यात आल्या आहेत. शाळांमधील भौतिक सुविधांची कमतरता तसेच अध्यापनावर परिणाम करणाऱ्या विविध कामांकडे दुर्लक्ष करून केवळ मुख्यालयाच्या नावाखाली शिक्षकांचे प्रतिमाभंजन करण्याच्या विरोधात सर्वांनी एकजुटीने व्यक्त व्हावे,' असे आवाहन महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीने केले आहे.

# दर्यापूर येथिल लोकन्यायालयात १२६ प्रकरणे निकाली

**खल्लार/वार्ताहर**

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण यांचे निर्देशानुसार व अमरावती जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांचे मार्गदर्शनाखाली दर्यापूर तालुका विधी सेवा समितीच्या वतीने दर्यापूर न्यायालयात राष्ट्रीय लोक न्यायालयाचे आयोजन करण्यात आले होते. प्रलंबित असलेली १०९ दिवाणी व फौजदारी प्रकरणात आपसांत समझोता झाला तसेच १७ दाखलपूर्व प्रकरणांमध्ये तडजोड करण्यात आली. अशा प्रकारे एकुन १२६ प्रकरणे लोकन्यायालयात निकाली करण्यात आली. त्यामुळे दोन्ही बाजुंच्या पक्षकारांचा वेळ, पैसा व श्रम यांची बचत होवुन त्यांचा मानसिक त्रास वाचला व एकाच दिवसात एकाच निकालात त्यांची कायमची कोर्टबाजीतुन कायमची सुटका झाली. तालुका विधि सेवा समितीचे अध्यक्ष तथा जिल्हा न्यायाधिश-१ सत्यवान डोके यांच्या मार्गदर्शनाखाली सदर लोकन्यायालयासाठी एकुण पाच पॅनलची निर्मिती करण्यात आली होती. पॅनल प्रमुख न्यायाधिश म्हणुन जिल्हा न्यायाधिश -२ मनिलकुमार लोकवानी, दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर उदलक पाटील, आशिष जोशी, समिर कमलाकर व प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी पुष्पम दास यांनी काम पाहीले. पॅनलचे सदस्य म्हणुन ॲड. विवेक इंगळे, ॲड. बनसोड, ॲड. कृपाली आठवले, ॲड. चौरपगार व ॲड. कोरडे यांनी काम पाहीले.

### श्री हनुमान व्यायाम गणेशोत्सव मंडळ साकारणार श्री. छत्रपती शिवरायांच्या राज्याभिषेकाचा देखावा

**खल्लार/वार्ताहर**

दर्यापूर शहरातील भवानी वेश परिसरातील श्री हनुमान व्यायाम गणेशोत्सव मंडळाची ८६ वर्षांची गणेशोत्सवाची गौरवशाली परंपरा यंदाही कायम राहणार असून गणेशोत्सवानिमित्त छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेक सोहळ्याचा भव्य ऐतिहासिक देखावा साकारण्यात आला आहे. शिवकालीन वैभवाची अनुभूती देणारा हा देखावा गणेशभक्तांसाठी विशेष आकर्षण ठरणार आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळात १९२१ मध्ये श्री हनुमान व्यायामशाळेची स्थापना झाली तर सन १९४० पासून सार्वजनिक गणेशोत्सवाला सुरुवात झाली. स्वातंत्र्यसंग्राम सैनिक स्व.भगवानसिंहजी ठाकूर यांनी लोकमान्य टिळकांच्या सार्वजनिक गणेशोत्सवाच्या संकल्पनेतून युवकांना संघटित करण्याच्या उद्देशाने या गणेशोत्सवाची मुहूर्तमेढ रोवली. त्याकाळात व्यायामशाळेतील युवकांनी एडवर्ड हायस्कूलवर केलेल्या हल्ल्यामुळे इंग्रज प्रशासनाची मोठी धावपळ उडाली होती.

त्यामुळे मंडळाला गणेशोत्सवाच्या परंपरेसोबतच सामाजिक आणि स्वातंत्र्यलढ्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभली आहे. यंदाच्या गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मंडळाच्या नविन कार्यकारिणीची नुकतीच सर्वानुमते निवड करण्यात आली. अध्यक्षपदी समाजसेवक शरद ठाकरे तर उपाध्यक्षपदी ऋषिकेश पाटील जळमकर व समाजसेवक प्रदीप बोरेकर,कार्याध्यक्षपदी आदित्य पाटील गावंडे व सुरजसिंग ठाकूर यांची निवड करण्यात आली असून सचिवपदी रोहित इंगळे तर सहसचिवपदी प्रतिक नाकट व सौरभ अनिल जळमकर यांची निवड करण्यात आली. कोषाध्यक्षपदी प्रथम पाटील रायपुरे व सौरभ देशमुख यांची निवड करण्यात आली. कार्यकारी सदस्य म्हणून भूषण विठ्ठलराव खंडारे,पवन काठोळे, सौरभ रहाटे,रोहित कोल्हे,ऋषभ कुटाफळे, शुभम खंडारे व वेदांत चौधरी यांची निवड करण्यात आली. यावेळी मंडळाचे पदाधिकारी, सदस्य व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# स्टार हेल्थकडून महाराष्ट्रात आरोग्य विमाबाबत जनजागृती अभियान

**अकोला-** वैद्याकीय आणीबाणीच्या प्रसंगी कुटुंबांसमोर दोन मुख्य चिंता तातडीने उभ्या असतात: दर्जेदार उपचारांची उपलब्धता आणि त्यानंतर येणारा आर्थिक ताण सांभाळण्याची क्षमता. अलिकडच्या वर्षांत भारतात आरोग्य विम्याचा विस्तार लक्षणीयरित्या झाला असला, तरी अनेक कुटुंबांना अजूनही आरोग्यावरील उपचारांसाठी स्वतःच्या खिशातून मोठा खर्च करावा लागत आहे. यामुळे आर्थिक सज्जता हा संपूर्ण आरोग्य सुरक्षेचा एक अत्यंत महत्त्वाचा भाग बनला आहे.

याच उद्देशाने, स्टार हेल्थ अँड अलाईड इन्शुरन्स कंपनी लिमिटेड या भारतातील पहिल्या

स्वतंत्र आरोग्य विमा कंपनीने संपूर्ण महाराष्ट्रात महिनाभर राबवलेला आरोग्य विमा जागरूकता रोड शो यशस्वीरित्या पूर्ण केला. विशेष डिझाइन केलेल्या जागरूकता व्हॅनने पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भ, उत्तर महाराष्ट्र आणि पुणे विभागात प्रवास केला. या मोहिमे दरम्यान ५० हून अधिक शहरांचा आणि नगरांचा प्रवास करत तीन लाखांपेक्षा जास्त व्यक्तींशी प्रत्यक्ष संवाद साधण्यात आला.

या उपक्रमाबद्दल मत व्यक्त करत स्टार हेल्थ इन्शुरन्सचे बिझनेस हेड विजय अरोरा म्हणालेङ 'भारताचा आरोग्य विम्याचा प्रवास आता केवळ विमासंरक्षणाचा विस्तार करण्यापुरता मर्यादित राहिलेला नसून व्यक्तींमध्ये समज, विश्वास आणि आत्मविश्वास निर्माण करण्याविषयी आहे. या रोड शो च्या माध्यमातून, आम्ही शंकांचे निरसन केले आणि आरोग्य विम्यातील काही गुंतागुंतीच्या गोष्टी सोप्या करून सांगण्यास मदत केली. या संवादांमध्ये आरोग्य विम्याच्या महत्त्वाच्या पैलूंचा समावेश होता; जसे वेळेत विमा खरेदी करण्याचे महत्त्व, पुरेशी विम्याची रक्कम, कॅशलेस हॉस्पिटलायझेशन, प्रतिबंधात्मक आरोग्यसेवा आणि अनपेक्षित वैद्यकीय खर्चांसाठी आर्थिक सज्जता. या उपक्रमाने आरोग्य विम्यासंदर्भातील सर्वसामान्य प्रश्नांचे ही निरसन केले, ज्यामुळे व्यक्तींना त्यांच्या विम्याचे संरक्षण अधिक चांगल्या प्रकारे समजून घेण्यास आणि स्वतःसाठी व कुटुंबासाठी माहिती पूर्ण निर्णय घेण्यास मदत झाली.

# भगवंतराव शिवाजी पाटील महाविद्यालयात नशामुक्त युवा कार्यक्रम

**परतवाडा/प्रतिनिधी**

भगवंतराव शिवाजी पाटील महाविद्यालय, परतवाडा येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने 'नाशमुक्त युवा' या विषयावर मार्गदर्शनपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी व्यसनांपासून दूर राहून निरोगी, सुसंस्कारी व जबाबदार जीवन जगावे, असा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल खांडेकर होते. प्रमुख वक्ते म्हणून प्रा. डॉ. प्रमोद गारोडे, सुधाकर धामणकर आणि डी. के. अविनाशभाई यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. दयाश्री कोकाटे यांनी केले. सूत्रसंचालनही प्रा. डॉ. दयाश्री कोकाटे यांनी केले, तर उपस्थितांचे आभार प्रा. डॉ. प्रिया सगणे यांनी मानले.

प्रा. डॉ. प्रमोद गारोडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, 'विद्यार्थ्यांनी जीवन उध्वस्त करणाऱ्या व्यसनापासून स्वतःला दूर ठेवले पाहिजे. व्यसन ही केवळ व्यक्तीची समस्या नसून त्याचा परिणाम कुटुंब आणि संपूर्ण समाजावर होतो. तरुणाई ही राष्ट्राची शक्ती असून तिची ऊर्जा विधायक कार्यासाठी वापरली पाहिजे. व्यसनाला नकार देऊन शिक्षण, संस्कार, साहित्य, कला आणि सामाजिक कार्याशी

जोडले गेले तर युवा पिढी देशाच्या विकासात महत्त्वपूर्ण योगदान देऊ शकते.' प्रा डॉ गारोडे यांनी युवकांनी व्यसनांना नकार देऊन समाजाच्या सकारात्मक परिवर्तनाचे दूत बनावे, असे आवाहन केले.

प्राचार्य डॉ. अनिल खांडेकर यांनी अध्यक्षीय मनोगतात विद्यार्थ्यांना व्यसनमुक्त जीवनाची शपथ घेण्याचे आवाहन केले. ते म्हणाले की, महाविद्यालयीन जीवन हे व्यक्तिमत्त्व घडविण्याचे महत्त्वाचे पर्व आहे. या काळात लागलेल्या चांगल्या सवयी आयुष्यभर उपयोगी पडतात, तर व्यसनांच्या आहारी गेल्यास शैक्षणिक, सामाजिक आणि कौटुंबिक जीवनावर गंभीर परिणाम होतो. विद्यार्थ्यांनी स्वतः व्यसनांपासून दूर राहण्याबरोबरच आपल्या मित्रांनाही व्यसनमुक्त जीवनासाठी प्रेरित करावे.

सुधाकर धामणकर यांनी व्यसनांचे शारीरिक, मानसिक आणि सामाजिक दुष्परिणाम विद्यार्थ्यांसमोर मांडले. व्यसनाची सुरुवात अनेकदा केवळ कुतूहल किंवा मित्रांच्या आग्रहातून होते; मात्र त्याचे रूपांतर पुढे गंभीर सवयीत होऊ शकते, असे त्यांनी सांगितले. तरुणांनी चुकीच्या संगतीपासून सावध राहून आपल्या भवितव्याचा विचार करावा. निरोगी शरीर, सकारात्मक विचार आणि आत्मविश्वास हीच यशस्वी जीवनाची खरी संपत्ती असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. डी. के. अविनाशभाई यांनी व्यसनामुळे व्यक्तीची कार्यक्षमता, आर्थिक स्थिती, आरोग्य आणि कौटुंबिक संबंध यांचे नुकसान होते. त्यामुळे युवकांनी आपल्या वेळेचा उपयोग शिक्षण, क्रीडा, कला, सामाजिक सेवा आणि कौशल्यविकासासाठी करावा.

प्रत्येक युवकाने स्वतः व्यसनमुक्त राहण्याचा निर्धार केला, तर 'नाशमुक्त युवा' ही संकल्पना प्रत्यक्षात साकार होऊ शकते, असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक डॉ खंडेराव, प्रा डॉ सतीश भागवत, प्रा प्रीती नवरे, प्रा भोयर मॅडम आणि शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी व्यसनमुक्त जीवनाचा संकल्प करून समाजात जनजागृती करण्याचा निर्धार व्यक्त केला.

# मेळघाटात ३०० गावांत होणार ८०० बाप्पा विराजमान

## १० दिवस आदिवासी नृत्य आणि गरब्याची धूम

**मेळघाट/वार्ताहर**

बाप्पाच्या आगमनाने संपूर्ण मेळघाट परिसर भक्तिमय झाला आहे. धारणी व चिखलदरा या दोन्ही तालुक्यात मिळून जवळपास ३०० गावे वसलेली असून, प्रत्येक गावात कमीत कमी दोन ते तीन सार्वजनिक गणपती मंडळे गणपती बाप्पाची स्थापना करतात.

एका अंदाजानुसार संपूर्ण मेळघाटात जवळपास ७०० ते ८०० ठिकाणी सार्वजनिक गणपती बाप्पा बसवण्यात येणार आहेत.यामध्ये चिखलदरा तालुक्यातील टेंब्रुसोंडा, जामली, गौरखेडा बाजार, वस्तापूर, चुर्णी, काटकुंभ, सेमाडोह आणि धारणी तालुक्यातील हरिसाल, दुनी, कलमखार, साद्राबाडी,

सावलीखेडा, टिटांबा, बिजूधावडी ही मोठी गावे आहेत. या मोठ्या गावांमध्ये प्रत्येकी ४ ते ५ ठिकाणी गणपती मंडळे आहेत.सर्वात जास्त गणेश मंडळे ही तालुक्याचे मुख्यालय असलेल्या धारणी आणि चिखलदरा शहरात असल्याने तालुक्यातील सर्व भाविक भक्त दर्शनासाठी येथेच गर्दी करतात.येणाऱ्या १० दिवसात संपूर्ण मेळघाटात विविध मंडळांच्या वतीने विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. यामध्ये आदिवासी पारंपरिक नृत्याबरोबरच प्रत्येक गावात गरब्याची धूम पाहायला मिळनार आहे. उत्सव काळात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी स्थानिक पोलीस विभाग व होमगार्डचे जवान प्रत्येक गावात, प्रत्येक मंडळाला रोज भेटी देऊन आवश्यक सूचना देतात त्यामुळेच आजपर्यंत मेळघाटच्या इतिहासात गणेशोत्सव काळात कोणतीही अप्रिय घटना घडलेली नाही. यावर्षीचा बंदोबस्त देखील ठाणेदार अवतार सिंग चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कर्मचारी व होमगार्ड अत्यंत चांगल्या प्रकारे पार पाडतील, अशी आशा व्यक्त केली जाते.

# अधिकाऱ्यांच्या सोयीसाठी नागरिकांना पडतो २८ किमीचा फेरा

## १९९९ पासून कार्यालय स्थलांतराची मागणी प्रलंबित

**अंमरावती/का.प्र.**

नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील नागरिकांच्या दैनंदिन प्रशासकीय कामकाजाशी निगडित सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यालय तालुक्याच्या ठिकाणी नसून तब्बल २८ किलोमीटर अंतरावर बडनेरा येथे सुरू असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. तालुक्यातील बहुतांश प्रमुख शासकीय कार्यालये नांदगाव खंडेश्वर येथे असताना सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यालय मात्र बडनेरा येथेच का, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

रस्ते, पूल, शासकीय इमारती तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाशी संबंधित विविध कामांसाठी नागरिकांना वारंवार बडनेऱ्याची चक्कर मारावी लागते. कार्यालयात गेल्यानंतर संबंधित अधिकारी उपलब्ध नसल्यास पुन्हा माघारी फिरण्याची वेळ येते. त्यामुळे एका कामासाठी किती वेळा २८ किलोमीटरचा प्रवास करायचा, असा संतप्त सवाल नागरिक विचारत आहेत.

सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यालय नांदगाव खंडेश्वर येथे सुरू करावे, यासाठी सन १९९९ पासून सातत्याने पाठपुरावा करण्यात येत आहे. तब्बल २७ वर्षांचा कालावधी उलटूनही या मागणीवर शासनस्तरावर ठोस निर्णय झालेला नाही. या काळात अनेक अधिकारी बदलले, अनेक लोकप्रतिनिधी निवडून आले; मात्र नांदगावकरांची गैरसोय कायम राहिली आहे.

नागरिकांचा वेळ, पैसा आणि श्रम वाचविण्याऐवजी कार्यालय बडनेरा येथेच सुरू ठेवण्यामागे नेमके कारण काय, असा प्रश्न आता उपस्थित होत आहे. प्रशासनाची यंत्रणा नागरिकांच्या सोयीसाठी असताना नागरिकांनाच २८ किलोमीटरचा हेलपाटा मारावा लागत असल्याने ही व्यवस्था नेमकी कोणाच्या सोयीसाठी, असा सवाल नागरिकांकडून केला जात आहे.सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यालय बडनेरा येथेच ठेवण्यामागे नागरिकांच्या सोयीपेक्षा अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या सोयीला प्राधान्य दिले जात असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. हा आरोप वस्तुस्थितीला धरून आहे की नाही, याबाबत प्रशासनाने स्पष्ट भूमिका मांडणे गरजेचे आहे.

एकीकडे १९९९ पासून कार्यालय नांदगाव खंडेश्वर येथे आणण्याची मागणी होत असताना दुसरीकडे तालुक्यातील लोकप्रतिनिधी हा प्रश्न शासन दरबारी प्रभावीपणे का मांडत नाहीत, याबाबतही नागरिकांमध्ये नाराजी आहे. जनतेच्या मूलभूत प्रश्नांसाठी निवडून दिलेले लोकप्रतिनिधी नेमकी कोणती भूमिका घेत आहेत, असा सवाल उपस्थित होत आहे.नागरिकांची गैरसोय तातडीने दूर करण्यासाठी

सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यालय नांदगाव खंडेश्वर येथे सुरू करावे आणि सन १९९९ पासून प्रलंबित असलेल्या मागणीवर शासनाने तातडीने अंतिम निर्णय घ्यावा, अशी मागणी तालुक्यातून होत आहे. अन्यथा या प्रश्नावर नागरिकांचा असंतोष आणखी तीव्र होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# अमरावतीत गणेशोत्सवाला जल्लोषात सुरुवात

## 'गणपती बाप्पा मोरया'चा जयघोष

**अमरावती/प्रतिनिधी:-**
शहर व संपूर्ण अमरावती जिल्ह्यात सोमवारी, १४ सप्टेंबर रोजी अत्यंत भक्तिमय, धार्मिक आणि उत्साही वातावरणात श्रीगणेशाची विधिवत स्थापना करण्यात आली. सकाळपासूनच शहराच्या गल्लोगल्लीत 'गणपती बाप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरया'चा जयघोष, मंत्रोच्चार आणि ढोल-ताशांचा गजर गुंजत होता.

यंदा अमरावती जिल्ह्यात एकूण २,०९९ सार्वजनिक गणेश मंडळांमध्ये बाप्पाची प्रतिष्ठापना करण्यात आली असून, यात अमरावती शहरातील ५९० सार्वजनिक मंडळांचा समावेश आहे. याशिवाय हजारो घरांमध्ये आकर्षक सजावट करून कौटुंबिक ☞(पान २ वर)

### कडक सुरक्षा व्यवस्था:

कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून पोलीस प्रशासनाने चोख बंदोबस्त ठेवला आहे. शहरात १३५ पोलीस अधिकारी, १,४०० पोलीस कर्मचारी आणि जिल्ह्याभरात एकूण ३,५०० हून अधिक पोलीस, होमगार्ड व ऐंइइ च्या तुकड्या तैनात करण्यात आल्या आहेत. सुरक्षेसाठी ड्रोन आणि सुमारे २,५०० CCTV कॅमेऱ्यांद्वारे लक्ष ठेवले जात आहे.

# अमरावती जिल्ह्यात दुष्काळ जाहीर करा

## किसान सभेचा १६ सप्टेंबरला एल्गार

**अमरावती/प्रतिनिधी:-**
अत्यल्प पावसामुळे अमरावती जिल्ह्यात शेतीपिकांची अवस्था बिकट झाली असताना शासनाने शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडल्याचा आरोप करत महाराष्ट्र राज्य किसान सभेने आक्रमक आंदोलनाचा इशारा दिला आहे. जिल्ह्यात तातडीने दुष्काळ जाहीर करावा, शेतकरी व शेतमजुरांना भरीव आर्थिक मदत द्यावी, या मागण्यांसाठी बुधवार, दि.१६ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंत जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती येथे भव्य निदर्शने करण्यात येणार आहेत.

कमी पावसामुळे सोयाबीन, कापूस, तूर, उडीद, मूग, ज्वारी, बाजरी, मका व भुईमूग आदी पिके करपण्याच्या स्थितीत आहेत. उत्पादन घटण्याची भीती निर्माण झाल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. सरकारने घोषणांचा फार्स थांबवून तातडीने प्रत्यक्ष मदत करावी, अन्यथा शेतकऱ्यांचा संघर्ष अधिक तीव्र केला जाईल, असा इशारा किसान सभेने दिला आहे.

अमरावती जिल्ह्यात दुष्काळ जाहीर करणे, संपूर्ण कर्जमाफी, शेती कर्जाचे पुनर्गठन करून नवीन कर्ज उपलब्ध करणे, हेक्टरी ५० हजार रुपये ☞(पान २ वर)

# शेतात विजेचा करंट लागून वृद्धाचा मृत्यू

## -गणेशोत्सवाच्या पूर्वसंध्येला येवदा येथील घटना घटना

**खल्लार/प्रतिनिधी:-**
गणेशोत्सवाचा आणि हरतालिका सणाचा आनंद असतानाच दर्यापूर तालुक्यातील येवदा येथे एक अत्यंत दुर्दैवी घटना घडली आहे. सणासाठी पूजेला फुले व बेलपत्री आणण्याकरिता गेलेल्या ७० वर्षीय वृद्धाचा शेतात विजेचा करंट लागून जागीच मृत्यू झाला. रमेश बाळकृष्ण निर्मळे (वय ७०) रा. आंबेडकर नगर येवदा असे मृत वृद्धाचे नाव असून, या दुर्घटनेमुळे येवदा परिसरात गणेशोत्सवाच्या पहिल्याच दिवशी शोकाकूल वातावरण पसरले आहे.

गणेश चतुर्थी व हरतालिका साजरी करण्यासाठी फुले आणण्याकरीता येवदा येथिल रमेश बाळकृष्ण निर्मळे हे काल (दि.१३) सकाळी घरून निघाले होते.सायंकाळी ते घरी न परतल्याने त्यांची शोधा शोध सुरू झाली.दिपक देशमुख हे घोडचंदी रोडवरील सकाळी आपल्या शेतात गेले असता त्यांना रमेश निर्मळे यांचा मृतदेह आढळला आणि त्यांनी तात्काळ ही माहिती घरच्या लोकांना दिली. रमेश निर्मळे हे दिपक देशमुख यांच्या शेतामध्ये फुलांसाठी गेले होते. शेतातील फुले तोडत असताना नकळतपणे तिथे असलेल्या जिवंत विज तारेचा त्यांना स्पर्श झाला. विज प्रवाह तीव्र असल्याने त्यांना जोरदार झटका बसला आणि त्यात त्यांचा जागीच मृत्यू झाला. या घटनेची माहिती येवदा पोलिसांना मिळताच पोलिस कर्मचारी तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी उपजिल्हारुग्णालय,दर्यापूर येथे पाठविला. त्यांच्या मागे पत्नी एक मुलगा ☞(पान २ वर)

मृतकाच्या मुलाच्या सांगण्यावरून सदर प्रकरणात मर्ग दाखल करण्यात आला आहे. सध्या या घटनेचा तपास सुरू असून, शवविच्छेदन अहवाल तसेच महावितरणचा तांत्रिक अहवाल प्राप्त झाल्यानंतर मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होईल. त्यानंतर अहवालाच्या निष्कर्षानुसार पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येईल.
**-प्रफुल गाडेकर, ठाणेदार, येवदा**

प्रथमदर्शनी उपलब्ध माहितीनुसार संबंधित इसमाचा मृत्यू शेतातील कुंपणात विजेचा प्रवाह सोडल्याने झाल्याचे दिसून येत आहे. मात्र मृत्यूचे नेमके कारण विद्युत निरिक्षक कार्यालय , अमरावती यांचा अहवाल आणि शवविच्छेदन अहवाल प्राप्त झाल्यानंतरच स्पष्ट होईल. त्यानंतरच घटनेबाबत अंतिम निष्कर्ष काढता येईल.
**-तुषार मुन्हेकर,** सहाय्यक अभियंता-महावितरण, येवदा

# अमरातीत घरोघरी श्री ची स्थापना

**अमरावती :** गणेश चतुर्थीच्या शुभ पर्वावर आज सर्वत्र विघ्नहर्ता श्री. गणरायाचे आगमन झाले. अमरावतीच्या आमदार सुलभा संजय खोडके यांच्या गाडगे नगर स्थित निवासस्थानी श्री गणेशाची विधिवत स्थापना करण्यात आली. 'गणरायाच्या आशीर्वादाने सर्वांच्या जीवनात सुख, समृद्धी, आरोग्य आणि यश नांदो,' अशी भावना आमदार महोदयांनी व्यक्त केली असून शुभेच्छा दिल्या आहे. यावेळी गणेशोत्सवात सहभागी विधान परिषद आमदार संजय खोडके, यश खोडके, डिम्पल खोडके व परिवार.

**अमरावती :** गणेशोत्सवाच्या मंगलमय पर्वानिमित्त आमदार प्रविण पोटे पाटील यांच्या निवासस्थानी श्री गणरायाची विधिवत स्थापना करण्यात आली. गणपती बाप्पाच्या आगमनाने पोटे पाटील यांच्या निवासस्थानी भक्तिमय आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले. यावेळी आमदार प्रविण पोटे पाटील यांच्यासह संपूर्ण परिवाराने मनोभावे श्री गणरायाचे पूजन व दर्शन घेतले. विधिवत पूजा-अर्चना करून परिवाराच्या सुख-समृद्धीसह अमरावतीकरांच्या आरोग्य, सुख-शांती आणि सर्वांगीण विकासासाठी श्री गणरायाकडे प्रार्थना केली.

अमरावती : साहित्यकार पवन नयन जायसवाल, किशोर नगर, अमरावती यांच्याघरी श्री ची स्थापना करण्यात आली.

अमरावती : संस्कार भारती तथा विश्व मांगल्य सभेच्या प्रांतीय समितीत कार्यरत सीमा राजेंद्र पेलागडे रा. न्यू गणेश कॉलनी रवी नगर यांच्या घरी श्री गणेश विराजमान झाले.

**अमरावती :** गणेश चतुर्थी व गणेशोत्सवानिमित्त आमदार राजेश श्रीरामजी वानखडे यांच्या निवासस्थानी लाडक्या गणरायाचे भक्तिमय वातावरणात आगमन झाले. यावेळी विधिवत पूजा-अर्चना करून श्री गणरायाची आरती करण्यात आली. यावेळी आमदार राजेश वानखडे यांच्यासह त्यांच्या पत्नी आरती राजेश वानखडे, आई विमल श्रीरामजी वानखडे, शशिकांत वानखडे, प्रीती शशिकांत वानखडे, हिमांशू भुयार, धरती हिमांशू भुयार, चैतन्य शशिकांत वानखडे व चिन्मय शशिकांत वानखडे यांच्यासह परिवारातील सदस्य उपस्थित होते. गणरायाच्या आगमनाने वानखडे परिवाराच्या निवासस्थानी उत्साहपूर्ण व भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. यावेळी सर्वांनी विघ्नहर्त्या श्री गणेशाच्या चरणी सुख, समृद्धी, उत्तम आरोग्य व सर्वांच्या जीवनात आनंद नांदावा, अशी प्रार्थना केली.

# संत अच्युत महाराज हॉस्पिटलचे कॅन्टीन सील

## -विनापरवाना आणि अस्वच्छतेप्रकरणी अन्न व औषध प्रशासनाची कारवाई



**अमरावती/प्रतिनिधी:-**
येथील प्रसिद्ध संत अच्युत महाराज हॉस्पिटलमधील कॅन्टीन अन्न व औषध प्रशासनाकडून कारवाई करत तातडीने बंद (सील) करण्यात आले आहे. हे कॅन्टीन आवश्यक परवान्याशिवाय चालवले जात असल्याचे आणि तेथे मोठ्या प्रमाणावर अस्वच्छता असल्याचे तपासणीत आढळून आले.

अन्न सुरक्षा अधिकारी अदिती देशमुख यांच्या नेतृत्वाखालील पथकाने हॉस्पिटल परिसरातील या कॅन्टीनची अचानक पाहणी केली. तपासणीदरम्यान अन्न सुरक्षेचे आणि स्वच्छतेचे मूलभूत नियम धाब्यावर बसवल्याचे समोर आले. रुग्णांच्या आरोग्याशी थेट खेळणाऱ्या या निष्काळजीपणाची ☞(पान २ वर)

# तडीपार इसम चाकूसह गुन्हे शाखेच्या ताब्यात

**ऑक्सिजन पार्कजवळ नागरिकांना धमकावत दहशत**

**अमरावती/प्रतिनिधी:-**
तडीपार असतानाही शहरात वावरून हातात चाकू घेऊन नागरिकांना धमकावत दहशत निर्माण करणाऱ्या इसमाला शहर गुन्हे शाखेच्या पथकाने रंगेहात ताब्यात घेतले. ही कारवाई सोमवारी (दि.१४ सप्टेंबर) फ्रेजरपुरा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील ऑक्सिजन पार्कजवळ करण्यात आली. आरोपीकडून एक धारदार लोखंडी चाकू जप्त करण्यात आला.

गुन्हे शाखेचे पथक फ्रेजरपुरा पोलीस ठाण्याच्या हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना गोपनीय बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, भातकुली पोलिसांनी तडीपार केलेला महेन्द्र भगवान चेंडकापुरे (वय ३२, रा. शांतिनगर, भातकुली) हा ऑक्सिजन पार्कजवळ हातात चाकू घेऊन ये-जा करणाऱ्या नागरिकांना धमकावत आहे.

माहिती मिळताच गुन्हे शाखेचे पथक तातडीने ऑक्सिजन पार्क परिसरात पोहोचले. त्यावेळी महेन्द्र चेंडकापुरे हा हातात चाकू घेऊन आढळून आला. पोलिसांनी त्याला घेराव घालून ताब्यात घेतले. त्याच्याकडील अंदाजे एक हजार रुपये किमतीचा धारदार लोखंडी चाकू जप्त करण्यात आला. तडीपार असताना शहरात प्रवेश करून शस्त्र बाळगल्याप्रकरणी चेंडकापुरेविरुद्ध फ्रेजरपुरा पोलीस ठाण्यात कलम ४/२५ आर्म्स ॲक्टसह कलम १४२, १३५ महाराष्ट्र पोलीस कायद्यान्वये गुन्हा दाखल ☞(पान २ वर)

# दोन गुंड प्रवृत्तीचे इसम सहा महिन्यांसाठी तडीपार

## चांदूर रेल्वे पोलिसांची कारवाई

**अमरावती/प्रतिनिधी:-**
मारामारी, धमकी, शिवीगाळ आणि दहशत निर्माण करण्यासह गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्यांमध्ये सहभागी असलेल्या दोन गुंड प्रवृत्तीच्या इसमांविरुद्ध चांदूर रेल्वे पोलिसांनी तडीपारची कारवाई केली. सागर पांडुरंग गाढवे (वय ३८, रा. सरदार चौक, चांदूर रेल्वे) आणि संदीप प्रभाकर शेंडे (वय ३६, रा. संताबाई यादव नगर, चांदूर रेल्वे) यांना सहा महिन्यांसाठी अमरावती जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आले आहे.पोलिसांच्या माहितीनुसार, सागर गाढवे याच्याविरुद्ध यापूर्वी मारामारी, धमकी, दहशत निर्माण करणे, शिवीगाळ तसेच गंभीर स्वरूपाचे एकूण पाच गुन्हे दाखल आहेत. तर संदीप शेंडे याच्याविरुद्ध याच स्वरूपाचे सहा गुन्हे दाखल आहेत. त्यांच्या कथित गुन्हेगारी कारवायांमुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

गुन्हेगारी कारवायांना आळा घालून परिसरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी चांदूर रेल्वे ☞(पान २ वर)

# सोशल मीडियावर हत्यारांचे प्रदर्शन; चौघांवर कारवाई

## पाच चाकू आणि कारसह १०.०३ लाखांचा मुद्देमाल जप्त

**अमरावती/प्रतिनिधी:-** सोशल मीडियावर चारचाकी वाहनात बसून हातात प्राणघातक शस्त्रे घेऊन सार्वजनिक ठिकाणी दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न करणाऱ्या चौघांविरुद्ध राजापेठ पोलिसांनी कारवाई केली. पोलिसांनी आरोपींकडून पाच लोखंडी चाकू आणि गुन्ह्यात वापरण्यात आलेली किया सेल्टॉस कार असा एकूण १० लाख ३ हजार ९०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

राजापेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीत काही इसमांनी चारचाकी वाहनात बसून हातात चाकूसारखी घातक हत्यारे घेऊन त्याचा व्हिडीओ तयार केला. हा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर पोलिसांनी त्याची गांभीर्याने दखल घेतली. सार्वजनिक ठिकाणी अशाप्रकारे हत्यारांचे प्रदर्शन करून नागरिकांमध्ये दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न करणाऱ्यांविरुद्ध कारवाई करण्याचे निर्देश वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांनी दिले. त्यानुसार सहाय्यक पोलीस निरीक्षक नितीन शिंदे यांच्या नेतृत्वाखाली डीबी पथकाने आरोपींचा शोध सुरू केला. तपासादरम्यान आदित्य संतोष लडे (वय २१, रा. पुष्पक कॉलनी), आदित्य पुरुषोत्तम कडू (वय ३१, रा. पोस्टमन कॉलनी, साईनगर), सम्मक सुरेश ढोके (वय २१, रा. फॉरेस्ट कॉलनी) आणि भावेश किशोर गोंडाणे (वय २१, रा. शिवाजी संकुलजवळ, ☞(पान २ वर)

# सचिन रोडे पाटील यांच्या 'आनंदी पिक्चर्स'ची दमदार वाटचाल

## अमरावतीच्या मातीतून मराठी सिनेसृष्टीत नवी पहाट

**अमरावती/प्रतिनिधी:-**
अमरावतीतील व्यवसायविश्वात स्वतःची वेगळी ओळख निर्माण करणारे सचिन रोडे पाटील आता मराठी चित्रपटसृष्टीत नवी ओळख निर्माण करण्यासाठी सज्ज झाले आहेत. व्यवसायाने वकील असलेल्या सचिन रोडे पाटील यांचा बांधकाम व्यवसायही आहे. मात्र, चित्रपटांविषयी असलेली जुनी ओढ आणि सिनेमाच्या माध्यमातून काहीतरी वेगळे करण्याची सुप्त इच्छा असल्याने त्यांची पावले मनोरंजनविश्वाकडे वळली आहेत. याच चित्रपटप्रेमातून त्यांनी आता निर्मिती क्षेत्रात दमदार पाऊल ठेवले असून, 'आनंदी पिक्चर्स अमरावती' या बॅनरखाली सिनेनिर्मितीची मुहूर्तमेढ रोवली आहे.

देवघर ऑन रेंट' हा सचिन रोडे पाटील यांच्या 'आनंदी पिक्चर्स अमरावती' या बॅनरखाली निर्मितीचा पहिला मराठी चित्रपट आहे. अध्यात्म, रहस्य आणि ॲक्शनची अनोखी सांगड घालणाऱ्या या चित्रपटातून त्यांनी आपल्या निर्मिती प्रवासाची सुरुवात केली आहे. केवळ व्यावसायिक गणितांचा विचार न करता आशयपूर्ण, वेगळ्या धाटणीचे आणि प्रेक्षकांच्या मनात कुतूहल निर्माण करणारे चित्रपट करण्याचा ☞(पान २ वर)

# गणेश मंडळावर ध्वनिप्रदूषणाची कारवाई

**अमरावती/प्रतिनिधी:-**
गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर ध्वनिप्रदूषणाच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या गणेश मंडळाविरुद्ध राजापेठ पोलिसांनी कारवाई केली. रवीनगर परिसरातील माऊली गणेश उत्सव मंडळाच्या गणपती स्थापना कार्यक्रमात निर्धारित नियमांचे उल्लंघन करून मोठ्या आवाजात बॅन्जो वाजविण्यात आल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. याप्रकरणी पोलिसांनी बॅन्जो जप्त करून पोलीस ठाण्यात जमा केला आहे.

रविवार, १३ सप्टेंबर रोजी माऊली गणेश उत्सव मंडळ, रवीनगर येथे गणपतीची स्थापना करण्यात आली. ☞(पान २ वर)

**-राजापेठ पोलिसांकडून बॅन्जोसह ध्वनिवर्धक यंत्रणा जप्त**
**-मंडळ पदाधिकारी व मालकावर गुन्हा दाखल**